म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र.

# रतीय नगरे



म बिवलकर

REFBK-0015036
REFBK-0015036

हा माझा भारत : ७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
75036

# भारतीय नगरे

REFBK-0015036
REFBK-0015036

लेखक
प्रा. राम बिवलकर

सुविचार प्रकाशन मंडळ

भारतीय नगरे
पहिली आवृत्ती
मार्च १९६५

मूल्य दोन रुपये

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक
शामकान्त बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१।४ सदाशिव, पुणे २
धनतोली, नागपूर १

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
४६१।४ सदाशिव, पुणे २

# लेखकाचे थोडेसे

भारतीय नगरांविषयी लिहावे असे खूप दिवस मनात होते. अनेक नगरे प्रत्यक्ष पाहिली होती. माहिती जमविली होती. पण हे लेखन प्रत्यक्षात उतरण्याचा व प्रसिद्ध होण्याचा योग आला श्री. राजेंद्र बनहट्टी यांच्यामुळे. 'हा माझा भारत' ही पुस्तकमाला प्रसिद्ध करण्याचे त्यांनी ठरविले आणि मला या मालेत लिहायची विनंती केली. ही संधी मी लगेच पकडली. पण माझ्यासारख्या आळशी माणसाकडून महिन्या दीड महिन्यात पुस्तकाची मुद्रणप्रत मिळविण्याचे कसब श्री. राजेंद्र बनहट्टींसारख्या कसलेल्या प्रकाशकाचेच.

आता 'रमणीय भारत' या आणखी एका पुस्तकाचे काम श्री. बनहट्टींनी माझ्याकडे सोपविले आहे. मार्च अखेरपर्यंत तीही मुद्रणप्रत मी त्यांना देणार आहे. मनीची इच्छा अशी सफल करणाऱ्या श्री. बनहट्टींना म्हणूनच धन्यवाद.

पुस्तक कसे आहे हे रसिक वाचकांवरच सोपविणे योग्य. ते त्यांनीच ठरवायचे आहे. पण रसिक वाचक, प्रकाशक, वृत्तपत्रकार यांचा लोभ मला नेहमीच लाभला आहे. त्यांना या वेळीही 'लोभ ठेवावा ही विनंती.'

महाड, (कुलाबा)
दि. २५-३-१९६५

**रा. म. बिवलकर**

## ‘ हा माझा भारत ’

भारताची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, औद्योगिक इत्यादी सर्व बाजूंनी कुमारांना मनोरंजक भाषेत ओळख करून देण्यासाठी ‘ हा माझा भारत ’ ही पुस्तकमाला प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे. ‘ भारतीय नगरे ’ हे या मालेतील सातवे पुस्तक असून भारताच्या विविध वैशिष्ट्यांची माहिती अत्यंत रसाळपणे कुमारांना देणारी एकूण दहा पुस्तके या मालेत प्रसिद्ध होतील. ही पुस्तके भारतभर प्रवास केलेल्या, तसेच भारतीय अस्मितेचे व्यापक ज्ञान असलेल्या अधिकारी लेखकांनी लिहिलेली आहेत. ही सर्व पुस्तके शक्य तितक्या लवकर उत्कृष्ट चित्रे आणि सजावट यांसह आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ‘ हा माझा भारत ’ या मालेतील पुस्तकांचा संच विद्यार्थ्यांनी वाचल्यावर आपल्या देशाची सर्वांगपूर्ण ओळख त्यांना व्हावी आणि भारत देश हा एक आहे, ही एकात्मतेची भावना त्यांच्या मनात रुजावी हा या मालेचा उद्देश आहे.

—प्रकाशक

## अर्पण पत्रिका


माझ्यावर पितृमातृवत् प्रेम करणाऱ्या
व माझ्यातला लेखक जोपासणाऱ्या
**पं. महादेवशास्त्री जोशी**
आणि
**सौ. सुधाताई जोशी**
या प्रेमळ दंपतीस सादर—

रा. म. बिवलकर

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मुम्बाईची मुंबापुरी | १ |
| २ | कलकत्ता | १३ |
| ३ | हैद्राबाद | २६ |
| ४ | बंगलोर | ३५ |
| ५ | मद्रास | ४३ |
| ६ | पुणे | ५२ |
| ७ | जयपूर | ५९ |
| ८ | दिल्ली | ६७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५०३६



# मुम्बाईची मुंबापुरी

मूळची मुंबाईची—महा अंबेची ही मुंबई, त्या अंबेला भजणाऱ्या कोळ्यां-चीच सत्ता इथे वर्षानुवर्षे चालली होती. आपल्या त्या स्वायत्त राज्यावर हे कोळी खूष होते. मुंबाई, वरळीची महालक्ष्मी आणि प्रभु रामचंद्राने स्थापिलेला 'वालुकेश्वर' (वाळकेश्वर) या देवतात्रयांच्या कृपाछत्राखाली त्यांना काही कमी पडत नव्हते.

सात बेटांचे त्यांचे हे साम्राज्य. भरती आली की, ती सारी बेटे वेगळी पडत. ओहोट झाली की, दोन बेटांमधल्या प्रदेशात दलदल माजे. डास पोसले जात. त्यामुळे कोळ्यांबरोबरच या सात बेटांवर हिवताप सत्ता गाजवी. साती बेटांवरील ताडा-माडांच्या गर्द राईमुळे, पश्चिम समुद्रातून जाणाऱ्या प्रवाशाला हा प्रदेश पाचूच्या बेटासारखा भासे. मोहित होऊन त्याने आपल्या जहाजाचे सुकाणू या बाजूला फिरवलेच तर डासांच्या पहिल्या हल्ल्याने 'हुडहुडी' भरून तो नांगर उचलून पसार होई. कोळी मात्र हिवतापाला पुरून उरले होते. त्याच्या सांगातीच त्यांच्या जीवनाची 'भरती ओहोटी' चालायची. गुजराथच्या कुणा सुलतानाचे राज्य या प्रदेशावर होते पण त्यालाही कदाचित त्याची जाणीव नसावी.

१५३४ साली गुजराथच्या सुलतान बहादुरशहाने साष्टी, वसई आणि मुंबई धर्मवेड्या पोर्तुगीजांच्या स्वाधीन केली. पोर्तुगीजांचा अंमल जारी झाला आणि

त्यांच्या प्रार्थनालयांचे क्रूस हळूहळू कोळ्यांच्या मंदिरांना मागे टाकू लागले. धर्मप्रसाराच्या त्यांच्या जाळयात सापडू नये म्हणून कोळ्यांचीच माशांसारखी तडफड चालू झाली. शंभर वर्षे पोर्तुगीज सत्ता इथे टिकून राहिली. पण त्यानंतर त्यांनी मुंबईचा नाद सोडला असावा. पोर्तुगालच्या राजाच्या मुलीचे, कॅथरीन ऑफ ब्रॅगान्झाचे, लग्न निघाले आणि पोर्तुगालच्या राजाने ही हिवतापाची बेटे आपल्या ब्रिटिश जामाताला हुंडा म्हणून देऊन टाकली. सतराव्या शतकातील प्रवासी म्हणत, 'मुंबई बेटांवर माणसांचे आयुष्य दोन पावसाळ्यांएवढेच आहे.' त्यामुळे त्या ब्रिटिश जावयाने, सुरतेला वखार घालून बसलेल्या ईस्ट इंडिया कंपनीला वार्षिक दहा पौंड भुईभाडयाने मुंबई देऊन टाकली.

मुंबई अशी कुणालाच नको होती. हिवतापाला घाबरून माणसे तिथे जायला घाबरत. मुंबईतली ती दलदल, ते डास, ती झाडी, ते दारिद्र्य कुणालाच नको होते. मुंबईला कुणीच त्राता नव्हता!

भारतातील पहिल्या क्रमांकाचे नगर म्हणून ज्या मुंबईची कीर्ती आज दिगंत गाजते आहे, ते नगर त्यानंतर अनेक हातांनी उभे झाले ही गोष्ट खरी, पण आजच्या मुंबईचे पितृपद अर्पण करायला हवे ते 'जेराल्ड ऑंगियर' नामक ईस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षाला. मुंबई म्हणजे 'गिधाडाएवढाले!' डास असे जसे समीकरण होते तद्वत मुंबई म्हणजे पोर्तुगीजांचा क्रूस! तिथे गेले म्हणजे आपल्या गळयात क्रूस पडलाच असेही मानले जाई. ऑंगियरने महत्त्वाची गोष्ट केली ती ही की, त्याने पारसी, बनिये, बोहोरी आदि व्यापारी जमातींना ब्रिटिश संरक्षण देऊन, मुंबईत वस्ती करून राहण्याचे आवाहन केले. पारशी मुंबईच्या किनाऱ्यावर उतरले ते १६७० साली.

आता मुंबई आकार घेऊ लागली. तिथे इमारती उठू लागल्या. दलदली बुजू लागल्या. तट, तोफा, जहाजांचे ताफे व हजारो सैनिक असा संरक्षक साज तिथे मिरवू लागला. भारताच्या पश्चिम किनाऱ्याला उत्तरदक्षिण पसरलेली ही बेटे एकसंध होऊ लागली. या बेटांच्या पूर्व कुशीला निसर्गानेच इतके सुंदर, सुरक्षित बंदर बहाल केले होते की, त्याने लवकरच सुरतेची मिजास उतरून टाकली. १७०८ साली ईस्ट इंडिया कंपनीचे, पश्चिम किनाऱ्यावरील मुख्य व्यापारी ठाणे, या पदवीला मुंबई पोचली. बंदर विभागातील छोट्याशा फोर्ट सेंट जॉर्जबाहेर वसत असलेल्या नगरात १७२० मध्येच पन्नास हजार लोकवस्ती होती.

चीन देशाशी मुंबईचा व्यापार वाढल्यानेच मुंबईला झपाट्याने उर्जितावस्था येऊ लागली. १७५५ साली नाविकदलाची जहाजे दुरुस्त करण्याचा कारखाना इथे उभा झाला. आंग्रे, मराठे, जंजिऱ्याचे हबशी या सर्वांबरोबर कंपनी सरकारच्या ज्या थोड्याबहुत चकमकी त्या काळात घडल्या त्यांनी मुंबईचे महत्त्व अधिकच वाढले.

मुंबईच्या 'टोपीकरांनी' हळूहळू साष्टी व वसई भागही आपल्या अंमलाखाली आणला. १७८३ साली सालबाईचा तह झाला, आणि साष्टी, वसई कंपनीच्या स्वाधीन झाली. लॉर्ड नेल्सन ( १७७५ ), जनरल वेल्स्ली (१८०४) अशा नामवंत ब्रिटिश योद्ध्यांनी मुंबईला भेट देऊन तिच्या वाढीबांधणीमध्ये विविध गोष्टी सुचविल्या.

मुंबईला शासनाच्या दृष्टीने आकार दिला तो 'इस्टुर फाकड्याने.' ( माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने ). आता हळूहळू मुंबईत चेंबर ऑफ कॉमर्स उभी झाली ( १८३६ ). बँक निघाली ( १८४० ). विद्यापीठ स्थापिले गेले ( १८५७ ). लेजिस्लेटिव्ह कौन्सिल आले ( १८६२ ). १८७२ साली मुंबई-म्युनिसिपॅलिटी जन्माला आली. १८७३ मध्ये पोर्ट ट्रस्ट निर्माण झाले. सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट स्थापन झाले १८९८ साली.

तत्पूर्वी १५६२ सालापासूनच मुंबईचे लंडनशी 'पोष्टी नाते' जुळले होते. १८५३ साली पहिली आगगाडी मुंबई ते ठाणे धावू लागली होती. सुती कापड गिरणी आपल्या चिमणीद्वारे धूर ओकू लागली होती. मानवी प्रयत्नाने पुष्कळशी जमीन समुद्राच्या आक्रमणातून मुक्त करण्यात आली. मुंबईच्या बंदरात गोदी-विभाग बांधला गेला. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या उत्तेजनाने व मदतीने मुंबईत प्रचंड वास्तु भराभरा उभ्या होऊ लागल्या. अमेरिकन यादवी युद्धामुळे, मुंबईच्या कापूसनिर्यातीला जो जोर चढला त्यामुळे मुंबई श्रीमंत बनू लागली. तिच्या वाढीला जुन्या किल्ल्याच्या भिंती आता अडथळ्यासारख्या वाटू लागल्या. त्यामुळे किल्ल्याचे तट पाडण्यात आले. पण मुंबईच्या दक्षिण विभागाला 'फोर्ट' हे नाव मात्र कायम राहिले. बंदराच्या बाजूचे, सेंट जॉर्ज हॉस्पिटलच्या परिसरातले काही तट-अवशेष संशोधकाच्या दृष्टीला आजही दिसू शकतील. चर्चगेट, बझार गेट, अपोलो गेट ही आजची रस्त्यांची नावे किल्ल्याच्या त्या बाजूच्या महाद्वारांची होती हे निराळे सांगायला नको. टाऊनहॉलजवळ आज जिथे

' एल्फिन्स्टन सर्कल ' आहे तो मुंबईच्या किल्ल्याचा मध्यभाग होता.

मुंबईची लोकवस्ती वाढू लागली आणि तिच्याबरोबरच मुंबईचा उभा, आडवा विस्तार होऊ लागली. वाढत्या लोकवस्तीमुळे मुंबईत राहत्या घराची टंचाई उत्तरोत्तर भासू लागला. १८०० साली दीड लाखाची असलेली मुंबई आज पन्नास लाखाची झाली आहे. ही अफाट वस्ती सामावण्याकरता मुंबई म्युनिसिपालिटीला आणि सिटी इम्प्रुव्हमेंट ट्रस्टला पडिक, ओसाड, वालुकामय, डोंगराळ भागांचा विकास साधावा लागला. समुद्राला मागे रेटून जमीन मिळवावी लागली. लॉर्ड लॉईड हे मुंबईचे गव्हर्नर असताना मरीन ड्राइव्ह नामक ' लॉईड रेक्लेमेशन ' निर्माण झाले. कुलाबा विभागातील कोळ्यांची वस्ती बांद्र्यापलिकडे खार–पाली–दांडा–वरसोवा या उत्तरभागात फेकली गेली. आजच्या बोरीबंदराच्या ठिकाणी असलेली त्यांची ' मुंबाई ' सुद्धा उत्तरेला सरकली.

आज बृहन् मुंबईने मुंबई, साष्टी, धारावी, तुर्भे या चार बेटाची सारी जमीन आपलीशी म्हटली आहे. विमानमार्गाने, समुद्रमार्गाने वा रेल्वेमार्गाने मुंबईत प्रवेश करणारा माणूस बावचळून जावा असा हा अफाट विस्तार आहे.

ही मुंबई भारतीय नगरांच्या गणनेत ' अनामिका सार्थवती ' करणारी ठरली आहे. या खंडप्राय देशाचा खूपसा व्यापार इथून चालतो. सर्वार्थाने भारताचे प्रवेशद्वार ठरण्याचा मान मुंबईचाच. ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याची मेरुमणी तीच. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महत्त्वाची भूमिका बजावणारी तीच. या देशाचे प्रबोधन साधले ते इथेच. पश्चिम घाटाच्या निळ्यानिळ्या सह्यकड्यांच्या पार्श्वभूमीवर, पाचूच्या हारामध्ये रत्ने बसवावीत तशा सुंदर इमारती लगडलेली, उत्कृष्ट रीतीने आखलेली, सुव्यवस्थित प्रशासनाकरिता प्रसिद्ध असलेली मुंबई ती हीच. तिच्याजवळ संपत्ति आहे. नैसर्गिक सौंदर्य आहे. पूर्व पश्चिमेचा संगम करून जमविलेले यंत्र–तंत्रज्ञान आहे. वाढत्या लोकवस्तीला सामावण्याकरिता आज चार भिंतीची अनेक खुराडी तिथे निर्माण झाली असली तरी आपल्या स्थापत्याने, उंचीने, रुबाबाने दुसऱ्या कुठल्याही शहरांना लाजवतील अशा भव्य इमारती इथेच आकाशरेषा भेदताना दिसतात.

ही मुंबई म्हणजे कुणा एका जमातीची मिरासदारी कधीच नव्हती. हिंदु,

मुस्लिम, ज्यू, पारशी, ख्रिश्चन अशी धार्मिक गटवारी बाजूला ठेवली तर जगातील प्रत्येक देशाचा निदान एकतरी माणूस मुंबईत नक्कीच सापडेल. भारतातील १६ राज्यातील अठरापगड जातींना व १५ भाषांना इथे प्रतिनिधित्व मिळालेले दिसेल.

मुंबईचा फोर्ट विभाग म्हणजे सचिवालयासुद्धा सर्व प्रादेशिक व केंद्रीय सरकारी कचेऱ्या, बँकाची व विमा कंपन्यांची कार्यालये, मोठमोठी दुकाने, मोठमोठ्या कंपन्यांच्या पेढ्या, परदेशी बोटी लागणारे धक्के, मध्य व पश्चिम रेल्वे यांची मुख्य कार्यालये, विमान कंपन्यांची ऑफिसे, आयात-निर्यातीचा धंदा करणाऱ्या दलालांच्या पेढ्या व स्टॉक मार्केट यांनी गजबजलेला भाग आहे. तो दिवसा जेवढा गजबजलेला दिसतो तितकाच रात्री शांत आढळतो. मुंबईची २५ ते ३० टक्के लोकवस्ती दिवसा फोर्टमध्ये सापडेल. फोर्ट म्हणजे, प्रशस्त डांबरी रस्ते, दुतर्फा उभ्या असलेल्या टोलेजंग इमारती, काळा घोडा, राणीचा पुतळा, संयुक्तमहाराष्ट्र चळवळीत ' धारातीर्थी ' पडलेल्यांचे स्मारक म्हणून उभारलेला भव्य पुतळा, मुंबईच्या बांधणीमध्ये ज्या अनेकांचे हात लागले त्यांचे पुतळे, मुंबई विद्यापीठाच्या इमारती, आणि त्या सगळ्यावरुन डोकावणारा प्रेमचंद रायचंदाने आपल्या मातेच्या स्मरणार्थ उभारलेला, २६० फुटी राजाबाई टॉवर, ज्यावरून कुतुबमिनाराचे डोके न्याहाळावे! हायकोर्ट, तार ऑफिस, रिझर्व्ह बँक, टाकसाळ, पोर्ट ट्रस्ट, कस्टम हाऊस, मोल स्टेशन, बोरीबंदर, जी. पी. ओ. मुंबई म्युनिसिपालिटी, चर्चगेट स्टेशन, ब्रेबॉर्न स्टेडियम या व अशा विविध वास्तूंनी दुथडी भरून वाहणारा मुंबईचा विभाग म्हणजे फोर्ट. यात मोडणाऱ्या टाकसाळीप्रमाणेच मुंबईचा फोर्टविभाग म्हणजेच अलोट संपत्ती निर्माण करणारी एक भली मोठी टाकसाळ आहे. मोठमोठ्या इमारतींचे आकाशरेषा भेदणारे मनोरे म्हणजे त्या त्या शहराची शान वाढविणारे स्तंभच म्हटले तर शेदीडशे फुटांहून उंच सुळकांडी मारणारे १०-२० तरी मनोरे मुंबईच्या फोर्ट भागात दाखविता येतील.

वझारगेट रस्त्यालगत असणारे सेंट थॉमस कॅथेड्रेल जेराल्ड ऑंगीरने बांधायला घेतले. पण १७१८ साली त्याची बांधणी पुरी झाली. १८१६ साली त्या प्रार्थनालयाला विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. या चर्चच्या परिसरात भारतीय लढायात धारातीर्थी पडलेले कितीतरी खिस्ती सैनिक आणि अधिकारी विसावले

आहेत. सर जेम्स मॅकिन्टॉश याने १८०४ साली स्थापना केलेली रॉयल एशियाटिक लायब्ररी आपल्या एक लाखावर असलेल्या ग्रंथांसह टाऊन हॉलमध्ये संसार थाटून बसली आहे. रॉयल एशियाटिकमध्ये आता सामावलेल्या जीऑग्राफिक सोसायटीचा नकाशांचा संग्रह उल्लेखनीय आहे.

मुंबईच्या बंदराची नेपल्सच्या उपसागराशी तुलना करण्यात येते. इतके सोईस्कर, निसर्गसुंदर बंदर 'एकमेवाद्वितीयम्'च म्हटलें पाहिजे. पूर्वेला दूरवर पसरलेल्या निळ्या सह्यकड्यांची क्षितिजरेषा तर उत्तरेला छोट्या छोट्या बेटांच्या समूहामुळे दंतुर झालेली भूरेषा. डाव्या हाताला असंख्य इमारतींच्या कौलारा-मनोऱ्यांनी निर्माण केलेली नागमोडी आकाशरेषा तर दक्षिणेला घोंघावणारा पश्चिमसागर. मुंबई बंदरात पदार्पण करणारा कुठलाही प्रवासी वा नाविक हे सारे पाहून मोहोरून जातो. संरक्षित बंदरविभागामुळे आणि हव्यातेवढ्या पातळीच्या भरतीमुळे मुंबई बंदरात गोद्यांनी गर्दी केलेली आढळते. एवढा मोठा गोदी विभाग जगातील दुसऱ्या कुठल्याही बंदरात आढळेल की नाही याची शंकाच आहे. पश्चिमसागरात वादळाने तांडव आरंभले, तरी मुंबईच्या बंदरात नांगरून पडलेल्या नावाबोटींना डचमळायचे कारण पडत नाही. अलेक्झांड्रा डॉक, प्रिन्सेस डॉक, ससून डॉक, व्हिक्टोरिया डॉक, माझगाव डॉक अशा लहानमोठ्या जवळ जवळ ५८ गोद्या याच बंदरात उभारलेल्या दिसतील. १८९२ साली मुंबई भारतीय नौदलाचे मुख्य ठाणे बनली. तेव्हापासून भारताची 'नौदली ध्वजनौका' इथेच फडकत आहे. तरत्या गोद्या, निर्जल गोद्या, सजल गोद्या, नौबांधणी करणाऱ्या गोद्या व धक्के, आगबोटींचे धक्के इत्यादी सर्व प्रकारच्या सोई इथे आहेत. बंदरातील आणि गोद्यातील अनेक कामे यांत्रिकी हाताने इथे चालतात. लाखो टन मालाची चढउतार व लाखो उतारूंची ये-जा इथे चालते.

मुंबईच्या कुठल्याही विभागांची विशिष्ट तऱ्हेने वर्गवारी करणे आता कठीण झालें आहे. पण एकेकाळीं मशीदबंदर, काळबादेवी, भुलेश्वर, नळबझार म्हटले की ते व्यापारी, उलाढालींचे विभाग आहेत असे सहज ध्यानात येई. 'परळी वैजनाथामुळे' ज्या भागाला 'परळ' म्हणू लागले तो परळ भाग व लालबाग विभाग मुंबईचा 'गिरणगाव' म्हणायला हवा. परळी वैजनाथाच्या पुरातन मंदिरावर १६७३ साली जेसुइटांनी आपले प्रार्थनालय बांधले. पुढे तिथेच

बून ( Boone ) नामक मुंबईच्या गव्हर्नराने १७१९ साली आपले निवासस्थान उभारले. मुंबईचे आजचे गव्हर्मेंट हाऊस वा राजभवन मलबार टेकडीवर आहे. हे जुने गव्हर्मेंट हाऊस. पण धर्मलोभाने व राजसत्तेने जे केले ते परळी वैजनाथाला जणु मान्य नसावे. त्यामुळे १८८५ साली या राजभवनात लेडी फर्ग्युसन यांचा प्लेगने मृत्यू झाल्यापासून ते ओसाड पडले. मग तिथे निघाले प्लेग रुग्णालय. हाफकिन साहेबाने नंतर तिथे प्लेगसंशोधन संस्था उभारली आणि त्याच संस्थेचे आता 'हाफकिन इन्टिट्यूट' नामक विराट सूक्ष्मजंतूसंशोधन-केंद्रात रूपांतर झाले आहे. परळीवैजनाथाच्या वास्तूत मानवसंरक्षणी कार्य सुरू झाले आणि एका निराळ्या अर्थी एक नवे देवस्थान इथे निर्माण झाले.

मलबार टेकडीचा वर उल्लेख केला. इथून मुंबईच्या प्रसिद्ध 'राणीच्या कंठ्या'चे दर्शन घडते. त्या टेकडीच्या–गिरीच्या पायथ्याशी जो मुंबईचा भाग वसला तो 'गिरिगांव' वा 'गिरगाव.' धोबीतलाव खरोखरच धोबीघाट होता, त्याला आता महालक्ष्मीकडे सरकावे लागले. आणि धोबीतलाव नाममात्रच उरला. 'मेट्रो', 'लिबर्टी' सारखी उत्तम सिनेमागृहे, झेवियर कॉलेज, एलफिन्स्टन टेक्निकल, हायस्कूल आदी वास्तूंमुळे तो भाग आता ओळखला जातो.

मलबार हिल, वाळकेश्वर, मरीन ड्राइव्ह, नेपियन्सी रोड, पेडर रोड म्हणजे मुंबईच्या धनपतींचे, मंत्र्यांचे, राज्यपालांचे, सिनेनटनटींचे निवासस्थान. गांवदेवी, ताडदेव आदी विभाग आणि दादर-माटुंग्यापासून पश्चिम रेल्वेवर बोरिवलीपर्यंत आणि मध्यरेल्वेवर मुलुंड, चेंबूर, तुर्भ्यापर्यंत जिथे जागा मिळेल तिथे लोकवस्तीची व 'उद्योगवस्तीची लागवड' करण्यात आली आहे.

मुंबई अशी भरमसाठ वाढत जाण्याची कारणे अनेक आहेत. पण त्यातले प्रमुख कारण म्हणजे मुंबई म्हणजे या देशाची 'उद्योग राजधानी' आहे सुती कापडाच्या गिरण्याचा धंदा तर इथला मूळचाच. भारतातील पहिली कापडगिरणी जशी १८५३ साली इथे स्थापन झाली तद्वत या गिरण्यांच्या संख्येबाबतही ( ६४ ) मुंबईने आपला पहिला नंबर कधी सोडला नाही भांडवली बाजार, वाहतुकीच्या सोई, उत्कृष्ट बंदराचे सान्निध्य या इथल्या गोष्टी अशा महत्त्वाच्या आहेत की, त्यांच्यामुळे मुंबईत कुठलाही उद्योग सहज रुजतो. आज अनंत उपभोग्य वस्तू, रसायने, औषधे, यंत्रे व यंत्रसाधने

इ. गोष्टी बनविणारे छोटेमोठे कारखाने मुंबईत व तिच्या उपनगरात रुजले आहेत कारखान्यांप्रमाणेच मुंबईत चालणाऱ्या व्यापारी उलाढाली, राजकीय सांस्कृतिक व सामाजिक चळवळी यांमुळे गुळाच्या खड्याकडे डोंगळे ओढले जावेत तशी भारताच्या विविध भागातून माणसे मुंबईत धावत असतात. तिथे जाईल त्याचे मुंबई मायपोट आहे. इथे कुणी उपाशी मरत नाही.

मुंबईच्या भव्य वास्तूंच्या मनोऱ्यांप्रमाणे मुंबईच्या काही गोष्टींच्या कीर्तीचे कळस अवकाशात उंच घुसले आहेत. तुर्भ्याच्या 'अप्सरा', 'झेरोलिना' व 'कॅनडा इंडिया' नामक अणुभट्टयांचा उल्लेख या संदर्भात प्रथम करायला हवा. भारताचे हे एकमेव अणुसंशोधन केंद्र. 'शांततेसाठी अणुशक्तिवापर' असे धोरण ठेऊन ते चालविण्यात येते. मुंबईची अशी दुसरी वास्तू म्हणजे 'आरे गौळीवाडा' मुंबईच्या दूधपुरवठ्याचा बराचसा भाग ही योजना पुरविते.

मुंबईत साऱ्याच गोष्टी मोठ्या प्रमाणावर चालतात. एका मुंबईत विविध प्रकारची ३५ महाविद्यालये आहेत. त्यातली एल्फिन्स्टन, झेवियर, व्ही. जे टी. आय्., विल्सन ही नावे ऑक्सफर्ड केंब्रीजच्या आदराने उच्चारावी अशी. रॉबर्टमनी, छबिलदास, किंग जॉर्जसारख्या शेकडो शाळा इथे आहेत. तरीही प्रतिवर्षी शाळा-कॉलेजांतील प्रवेशाकरता पालकांना व पाल्यांना 'हरहर महादेव' च्या अवसानात शाळाकॉलेजांवर तुटून पडावे लागते.

मुंबईचे विविध क्षेत्रातील निर्माते अनेक आहेत. त्यांतल्या काहींचा उल्लेख करणे म्हणजे इतरांवर अन्याय केल्यासारखे होईल. म्हणूनच कुणाचाच नामोल्लेख न करता वर एवढेच म्हटले; अनेक धर्मीयांनी, अनेक प्रांतीयांनी, अनेक देशीयांनी व अनेक जातीयांनी ही मुंबई घडविली आहे. त्यामुळे व्यापारी पेठ म्हणून, उद्योग राजधानी म्हणून, भांडवली बाजार म्हणून, उत्कृष्ट बंदर म्हणून, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घडामोडींचे केंद्र म्हणून, भारताची ही प्रतिराजधानी गाजते आहे. म्हणूनच भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न निघाला तेव्हा 'मुंबई कुणाची ?' या प्रश्नावर रणे माजली. तो प्रश्न आता महाराष्ट्राच्या बाजूने निकालात निघाला असला तरी मुंबई कुणाची ? असा प्रश्न समोर उभा राहताच मुंबई मुंबईकरांची असे उत्तर ओठी उभे राहते. कारण कुठलेही नगर, त्याचे व्यक्तिमत्व, त्याचे महत्व, त्याची शासनयंत्रणा या साऱ्या गोष्टी त्या नगराला आपले मानणाऱ्या माणसांनीच घडविलेल्या असतात.

भारताच्या केंद्रीय करांच्या उत्पन्नापैकी अर्धे उत्पन्न मुंबईत जमा होते. इथेच पंचवार्षिकी योजनांकरिता भांडवल व कर्जे उभारली जातात. त्यामुळे दिल्लीकरांवर खरी सत्ता चालते ती या मुंबईची. एकेकाळी स्वातंत्र्यचळवळींचे केंद्र म्हणून माणसे भक्तीने इथे येत. 'जिवाची मुंबई' करायलाही काही मंडळी येत! पण आज 'झटपट पैसा' करण्याकरता माणसे इथे येतात. भुलेश्वर, वाळकेश्वर, बाबुलनाथ, महालक्ष्मी, मुंबादेवी ही इथली सारी दैवते मागे पडून, पैसा हाच परमेश्वर मानणारी मंडळी इथे वाढली आहेत. या माणसांना मुंबईच्या परंपरेविषयी, सर्वांविषयी सारखा भाव राखणाऱ्या मानवी उदारतेशी, निसर्ग-सौंदर्याशी, शैक्षणिक व सांस्कृतिक दर्जाशी काही कर्तव्य नाही. ही सगळी माणसे उपरी आहेत. वाटेल त्या मार्गांनी पैसा मिळवावा, इस्टेटी कराव्या, पागड्या घेऊन त्यात खुराडी बांधून काढावीत, होटेले चालवावीत; हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता! आपल्या पूर्वसूरींनी ज्या नगरात सुंदर उद्याने, प्रशस्त मैदाने निर्माण केली, हिमालयाशी तुलना करता यावी अशी धवल किर्ती संपादिलेल्या सार्वजनिक संस्था उभ्या केल्या, प्रचंड वास्तू बांधून काढल्या, इतिहासाला ज्यांची दखल घ्यायलाच हवी अशा परंपरा निर्माण केल्या याची जाणीव न ठेवता आजचे हे मुंबईकर त्या साऱ्यांची पाळेमुळे खणून मोकळी करीत आहेत. ती खणून काढण्याइतका वेळ वा तितकी इच्छा त्यांना नाही! कारण जे होते आहे ते जुने मोडून नवे उभारण्याकरता आहे असाही दृष्टीकोन त्यात दिसत नाही. दिसतो तो आसुरी पैशाचा सोस! त्यामुळे 'सिटी ब्युटिफुल' म्हणून ज्या शहराचे एकेकाळी वर्णन करण्यात येत असे; जिथली प्रशस्त घरे, सुंदर बंगले, त्याभोवतालच्या रमणीय बागा, प्रचंड वास्तुशिल्पे, जयविजयासारख्या वृक्षराजांनी रेषांकित असलेले प्रशस्त व स्वच्छ रस्ते, एवढीशीही घाण कुठे दिसू न देणाऱ्या लोकवस्त्या, जुहू, मरीन ड्राइव्ह, बीच कँडी, चौपाटी या नावानी ओळखले जाणारे वैशिष्ट्यपूर्ण समुद्रकिनारे, मलबार-हिल आणि कंबाला हिल यासारख्या टेकड्यांनी जिथल्या सौंदर्यात विशेष भर टाकली आहे असे हे नगर. पण इथली दोन लाखांपेक्षा अधिक लोकवस्ती आज पत्र्यांच्या, बांबूच्या, डब्यांच्या वा सिनेमापोस्टरांच्या धुरकट झोपड्यांतून राहते. पाच लाखांपेक्षा अधिक लोकांना पदपक्षांचाच तेवढा आसरा सापडतो. जवळ जवळ दहा लाख लोक 'दहा बाय दहाच्या' एका वा दोन खोल्यांच्या

खुराड्यातून राहतात—नव्हे जगतात. एकेका खोलीत पाच, सहा, आठ वा दहा माणसांनी राहणे, म्हणजे का राहणे आहे? जगणेच ते! तिथे नाही शांतता, नाही एकांत, नाही प्रतिष्ठा!

पण या साऱ्या प्रकारात 'मुंबईची माणुसकी मेली' ही सगळ्यात दुःखाची गोष्ट आहे. त्यामुळे मुंबईकर 'बघ्या' बनला आहे. कुठल्याही गोष्टीची जबाबदारी त्याला नको आहे. कुणी मोटारखाली चेंगरला तर 'च् च्' करून खरा मुंबईकर आपली वाट धरतो! स्वतःच्या दारचा कचरा दुसऱ्याच्या दारी टाकण्यात आपण स्वच्छता राखल्याचा दावा करतो. कुठे ड्रेनेजचे 'मॅनहोल' चोरीला गेले असल्यास दुसरा कुणी त्यात कसा पडतो हे पाहण्यात त्याला आनंद वाटतो. कुठेही पिचकारी टाकण्यात, कुठेही कसलीही घाण करण्यात त्याला गैर वाटत नाही!

नगर म्हणजे काही घरांचा वा खुराड्यांचा समूह नव्हे! त्याला व्यक्तिमत्व असते. आत्मा असतो. साधारणतः कुठल्याही नगरात सारख्या ध्येयधोरणाची माणसे, 'एकाच नावेत बसून' एकाच परिस्थितीचा जास्तीत जास्त सदुपयोग करण्याचा प्रयत्न करीत असताना दिसतात. प्रत्येक शहरात झोपडपट्ट्या असतातच. पण त्या आहेत याची नगराला रुखरुख लागते. हे अवघड जागचे आपले दुखणे दुसऱ्या कुणी पाहू नये अशी त्या नगरवासीयांची इच्छा असते. मुंबईला तसे वाटत नाही! झोपडपट्ट्या म्हणजे जणु मुंबईनगरीच्या गळ्यातील विजयमालाच! प्रत्येक शहरात उद्याने वा बागा असतात; लहान मुले जिथे स्वच्छंदपणे बागडू शकतात; वार्धक्य जिथे आपल्या शैशवाकडे पाहात नवी स्वच्छ हवा भरून घेत असते, यौवन जिथे शरीरसौष्ठव वाढवीत असते. मुंबई शहर वर, खाली, आजूबाजूला सारखे वाढतेच आहे. गर्दीमुळे रस्ते निरुंद होत आहेत! फेरीवाल्यांमुळे स्वनातीत युगात बैलगाडीचे युग चालू झाले आहे! उद्योग व लोकवस्ती या गोष्टी शहराच्या भिन्न भागात असाव्यात. शाळा व तबेले यात काही अंतर असावे! राहती घरे व गोठे हे ओळखता यावेत. उद्यान व गिरणी या तशा भिन्न दिसणाऱ्या गोष्टी आहेत असे सर्वसाधारण मानले जाते! पण मुंबईत राहते घर आकाशात केव्हा उडेल याचा नेम नसतो. कारण खालच्या मजल्यावर राहणारा 'आदमी' आपल्या घराचा उपयोग फटाक्यांचे गोडाऊन म्हणून करीत असतो! इथल्या शाळांचे मेंढवाडे

झालेच आहेत, हे मनावर ठसविण्याकरिताच की काय शाळेच्या कंपौंडला लागून एखाद्या भय्याचा म्हसरुडांचा गोठा दिसतो! पश्चिम समुद्राच्या काठावरले हे पाचूचे बेट, त्याची मानवाने काय अवस्था केली पाहा! पण तरीही एकोणिसाव्या शतकमध्यास सोन्याकरिता कॅलिफोर्नियाकडे जशी साऱ्यांची धाव होती, तशी स्वातंत्र्योत्तर काळात या मुंबईकडे आज सारे धाव घेत आहेत. मुंबई मोहमयी, मोहिनी आहे! हेच खरे.

मुंबईत पैशाची विषमता आहे पण वागण्यात समता आहे. मुंबईत रुळलेला माणूस बाहेरगावी मोठा 'व्ही. आय्. पी.' सारखा वागेल पण इथे तो कितीही मोठा असला तरी मोठा नाहीही! कर्जत, कसाऱ्यापासून वा विरार, वसईपासून माणसांचे लोंढे भरभरून आणून मुंबईत ओतणाऱ्या लोकल गाड्या, त्यांना उंबरासारखी लगडलेली माणसेच माणसे, त्यांची दिवसभर चालणारी ये-जा पाहिली, कुणालाच दुसऱ्याकडे पाहायला वेळ नाही ही सत्यस्थिती निरीक्षिली की वाटते, मुंबईत समता आहे, तसा 'गर्दीतला एकान्त' ही आहे! तुम्ही काय करता, कुठे जाता, उद्या लखोपती होता की बेवारशी म्हणून म्युनिसिपल ॲम्ब्युलन्समधून सोनापुरी दाखल होता, काहीच पाहायला कुणालाच वेळ नाही. शेजारी कोण राहतो हे मुंबईकराला ठाऊक नसते. उपनगरात राहणाऱ्या गृहस्थाला एखाद्या रविवारी तो घरी राहिलाच तर 'मी तुमचा पिता' म्हणून आपल्याच मुलांना ओळख करून द्यावी लागते! ही परिस्थिती आतिथ्यशील नसेल कदाचित, पण दुसऱ्याच्या भानगडीत नाक न खुपसणारी आहे. वागण्यातील उदारता दाखविणारी आहे.


इतके गडबडीचे यांत्रिक जीवन असूनही, मुंबईकर आजूबाजूच्या रम्यस्थळी ट्रिपा काढतात. क्रिकेट खेळतात. गाण्याच्या मैफली रंगवतात. नाटके, चित्रपट, बहुरूपी, एकरूपी प्रयोग काय वाटेल ती चूष निघते त्यात रस घेतात. सभा-संमेलनांना मोठ्या हौसेने हजर राहतात. लाखालाखांच्या सभा पाहाव्यात तर त्या मुंबईलाच. प्रत्येक मुंबईकर कुठल्या ना कुठल्या तरी छंदात असतोच! मुंबईकर रमणी, नोकरीही करील, संसारही करील. प्रेम करील, रेशनशॉपपुढे रांगही धरून उभी राहील. पाण्याकरिता नळावर वयूही लावील, पुरुषाबरोबर खेळी-मेळीने वादही करील. कुणी बडा पाहुणा आला की त्याला पाहायला व त्याच्या जंगी स्वागताला 'सरकारी हुकुमान्वये' मुंबईकरांना वेठीला धरायला नको.

स्वभावतःच उत्सवप्रेमी ही मंडळी क्रुश्चव्ह येवो वा राणी एलिझाबेथ येवो, जॅक्युलिन केनेडी येवो की पोप पॉल हजर होवो. कुणाचेही इथे ' न भूतो न भविष्यति ! ' स्वागत होणारच ! कारण हे सारे त्या व्यक्तीच्या प्रेमापोटी नसते. मुंबईकरांच्या उत्सवप्रियते पोटी ते होते ! त्यामुळे ही स्वागते धर्म, जात, देश वा इझम-निरपेक्ष केली जातात. तो पाहुणा बिचारा या प्रचंड स्वागताने भारावून जातो ! खुशीत गाजरे खात असतो !

मुंबई अशी विविध रंगी, विविध ढंगी आहे. त्यामुळेच रोज मुंबईच्या जीवनाला शिव्या मोजणारी माणसे मुंबईला वर्षानुवर्षे चिकटून बसतात. मुंबई अजूनही आपले राजकीय, सामाजिक अन् सांस्कृतिक स्थान सांभाळून आहे. मुंबईच्या वाढत्या वस्तीची व उद्योगांच्या खिचडीची सरकारला व शासकांना जाणीव आहे. त्यामुळे उरण-मुंबई जोडण्याचे, भुयारी रेल्वे नाहीतर अंतराळी पूल बांधण्याचे, ' रोप ' रेल्वे ताणण्याचे मनसुबे रचले जात आहेत. मोठमोठे राजरस्ते बांधून काढण्याच्या योजना प्रत्यक्षात उतरत आहेत. उद्योग वसाहती निराळ्या करून देशाच्या अंतर्भागांत पसरून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. चौदा लाख वस्तीकरिता आखून बांधून काढलेले पाण्याचे नळ वा ड्रेनेज पन्नास लाखांच्या वस्तीला कसे तोंड देणार ? ते रस्ते, ती घरे, त्या बागा एवढ्या जन-समुदायपुढे काय टिकाव धरणार ? म्हणून आजची ही दुरवस्था आहे. पण वरील साऱ्या योजना जर प्रत्यक्षात उतरल्या तर मुंबई पुन्हा ' सुंदर नगरी ' ठरेल यात शंका नाही. याच आशेवर माणसे जिथे गर्दी करतात व समस्या बिकट करतात ! पण याची जाणीव साऱ्यांनाच होऊ लागली आहे हे सुचिन्हच !

मुंबईच्या आजच्या दुःखस्थितीतही इथल्यासारखे वाहतूक-नियंत्रण इतरत्र आढळणार नाही. इथल्यासारखा शिस्तबद्ध जनसमुदाय कुठल्याही भारतीय शह-रात दिसत नाही. इथल्याइतकी रसिकता कुठे प्रत्ययाला येत नाही. इथल्या-इतकी एकात्मकता सापडायची नाही. म्हणूनच जशी आहे तशीही मुंबई प्रत्येकाला प्यार असते. आणि प्रत्येकजण एकमुखाने बोलत असतो,

" मुंबई आमची आहे. "



# बंकिमचंद्रांची पुण्यभूमी कलकत्ता

रात्री अकरा वाजताच्या अंधारात गाडीने कुठले तरी आडवळणी स्थानक सोडले आणि मी बर्थवरील माझ्या बेडिंगवर अंग टाकले. उद्या सकाळी कलकत्ता येणार. बंकिमचंद्राच्या त्या सस्य-शामल, मलयज शीतल, सुजल-सुफल भूमीचे दर्शन घडणार म्हणून रात्रीपासूनच माझे मन हरपून गेले होते. धडाड धडाड खडाड खडाड करीत गाडी अंधारातून आपला मार्ग आक्रमीत होती आणि मी उद्या दिसणाऱ्या वंगभूमीची स्वप्ने आसुसलेल्या मनाने पाहत होतो.

का कोण जाणे पण वंगभंगाच्या चळवळीपासून महाराष्ट्र आणि बंगाल या दोन राज्यात एकमेकाबद्दल एक निराळीच आत्मीयता निर्माण झाल्याचा प्रत्यय साऱ्यांनाच येतो. तसे दोन्ही राज्यात मानसिक साम्य नसताही, हे विशेष. बुद्धिवादी, तर्ककर्कश, सडेतोड असणारा महाराष्ट्र, भावनाप्रधान, कविमनी वंगाशी भावनिक ऐक्य पावला कसा हे आश्चर्य मानायला नको. कारण अन्यायाची चीड दोन्ही जनमनात इतकी दृढमूल आहे की, या एकाच सम-भावनेतून महाराष्ट्रीय माणसाला बंगाली जवळचा वाटू लागला. त्यामुळे कलकत्त्यासारख्या भारताच्या एकेकाळच्या राजधानीत संप, दंगे आदी धुळवड माजली, विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचे दर्शन घडले, १९४३ सालासारखा महा-भयंकर दुष्काळ संभवला, वा महापुरासारखी अगर वादळासारखी मोठी आपत्ती गुदरली की, सर्वांआधी हलते, दुःखी होते ते, मराठी मन.

पहाटेपूर्वीच्या स्वप्नात बंकिमचंद्र, शरच्चंद्र, सेन, दास, पाल, चतर्जी, मुखर्जी, टागोर, बोस यांची ती पुण्यनगरी आणि वंगीय पाचूवर्णी भूमी मला सारखी दिसत होती. तीन चार तासच मी झोपलो असेन, तोच फटफटीत उजाडले. जागा होऊन, बर्थवरून खाली उतरून गाडीच्या खिडकीतून बाहेर पाहिले तो इतके छान ऊन पडले होते की, वाटले, आपण आज फारच झोप काढली. आठ आठ वाजेपर्यंत झोपा ताणायची सवय नसल्याने गुन्हेगारी केल्यासारखे वाटले. म्हणून घड्याळात पाहिले तो सारे साडेपाच वाजलेले ! घड्याळ बंद तर पडले नाही म्हणून कानाशी लावले तर ते विश्वासू नोकराप्रमाणे पळे मोजीत होते. म्हणून सहप्रवाशांची घड्याळे पाहिली तर, कधी नव्हे ती एकवाक्यता त्यांनी दाखविली ! मग माझ्या लक्षात आले, 'अरे आपण कलकत्याच्या आसपास पोहोचलो आहोत !' माझ्या भूगोली ज्ञानाचा पडताळा इथे मिळाला. कलकत्याला आपल्या मुंबईपुण्यापेक्षा तास दीड तास आधी उजाडते तर ! गाडीच्या दोन्ही बाजूला पाहिले तर ती पाचूच्या बेटातून चालत होती. नारळी, पोफळी, गर्द हिरवी झाडी, मंद मंद वाहणाऱ्या वायु-लहरीमुळे हेलावणारी पिवळीहिरवी भाताची शेते, आजूबाजूच्या बागामधून दिसणारी छोटी छोटी घरे, त्या घरांच्या परसावात, आभाळाला आपला मुखडा पाहण्याकरिता मांडलेली छोटी छोटी तळी. वंगदेशाची ती निसर्गसंपदा पाहता पाहता क्षणभर मी माझी आन्हिके विसरून गेलो. मैलोगणती हा देखावा बदलत नव्हता. बंगल्यातच गुरुदेव रविंद्रनाथ टागोर का निपजावेत याचा उलगडा झाल्यासारखा वाटला. समोर उलगडत जाणारे वंगीय खेडेगावाचे ते दर्शन संपूच नये असे वाटत होते. तेवढ्यात बांदेल स्टेशन आले. मूळचे पोर्तुगीजांचे हे गाव मग आले चिनसुरा. ते ब्रिटिशांनी डचांकडून विकत घेतले असा इतिहास, तिथले डच चर्च सांगते. चिनसुऱ्यापाठोपाठ हुगळी आली. इथून पोर्तुगिजांना १६३२ साली हुसकून काढले शहाजहानच्या बादशाही फौजांनी. शहाजहानचा द्वितीयपुत्र शुजा या भागाचा सुभेदार झाला. डॉ. बॉटन नामक एका अश्विनीकुमाराने शहाजहानच्या कन्येचा प्राण एका दुर्धर रोगातून बचावल्यामुळे बादशाही फर्मानाने हुगळीला ब्रिटिशांचे ठाणे निर्माण झाले. १६५१ साली ईस्ट इंडिया कंपनीने तिथे आपली वखार टाकली. करामत अली नामक मोगली सरदाराची 'इमामबारा' नावाची करामत पाहायची असली

तर हुगळीला उतरावे. आम्ही पुढे निघालो. चंद्रनगर आले आणि या फ्रेंच ठाण्यासंबंधीचा इतिहास माझ्या मनी जागा झाला. फ्रेंच गव्हर्नर डुप्ले याच्या अमदानीत चंद्रनगर म्हणजे केवढी मोठी व्यापारी पेठ होती किती. वेळा तिथल्या फ्रेंच व ब्रिटिश अमलाची अदलाबदल झाली. पण भारत स्वतंत्र झाला तेव्हाही चंद्रनगर फ्रेंचांच्या ताब्यात होते. १९५१ साली फ्रेंचांनी ते भारत सरकारच्या हवाली केले. चंद्रनगर मागे पडले आणि पाच मिनिटातच सेरामपूर आले. ही पूर्वीची डॅनिश वसाहत. पूर्वाश्रमींचे त्याचे नाव फ्रेड्रिकनगर. खिश्चनधर्माचा बंगालात जो प्रसार झाला त्याचे मूळपीठ हे सेरामपूर. जवळच पुरीच्या खालोखाल महत्त्व असणारे जगन्नाथाचे मंदिर बाळगणारे महेश नावाचे छोटे गाव आहे. नंतर रिश्रा, बाली, वेलूर, लिलूआ, आणि मग सकाळी ७॥–८ वाजता आले हावडा. हे कलकत्त्याचे सिआल्दाप्रमाणेच मोठे स्टेशन. हावडा हुगळी नदीच्या (गंगेलाच इथे हुगळी म्हणतात) पश्चिम तीरावर, तर कलकत्त्याची खरी वस्ती पूर्व तीरावरील विशाल नगरीत सामावलेली आहे. पण हावडा, पद्मपुकूर, शिवपूर, सालकिया या भागातही कलकत्त्याची ७–८ लाख वस्ती आहे. हावड्याहून जगप्रसिद्ध हावडा पुलावरून नदीच्या पूर्व किनारी आले की, मैलोगणती दक्षिणोत्तर पसरलेले कलकत्ता शहर दिसते.

हावड्याहून पलीकडे जायचे ते जगप्रसिद्ध हावडा ब्रिजवरून. कॅन्टिलेव्हर पद्धतीवर उभारलेला तो अजस्त्र पोलादी पूल म्हणजे एक आश्चर्यच आहे. त्याची लांबी १५०० फूट आहे. १९४३ साली हा बिनखांबी व हवेत तरंगता ‘लक्ष्मण झूला’ तयार झाला. त्या आधी १८७४ साली उभारलेल्या ‘पॉन्टून ब्रिजने’ गंगापार व्हावे लागे. तो थिटा होता. अरुंद होता. त्यामुळे हुगळीतील आगबोटींच्या वाहतुकीस अडथळ्यासारखाच होता. पण त्याचा विशेष हा की, रहदारी कमी असेल तेव्हा तो उघडून बोटींना वाट देता येत असे. पण ते रात्रीच करावे लागे. कारण दिवसा पुलावरून रहदारी इतकी असायची की, अर्ध्यातासाचा खोळंबा झाल्याखेरीज मोटारवाल्या मंडळींना पैलथडी पोचता येत नसे. पुलाच्या खांबांनीही हुगळीतला गाळ काढण्याची शक्यता आहे हे हेरून हावडा ब्रिज तरंगता बांधला गेला. पण त्या प्रचंड पुलाचा तोल सांभाळण्याकरिता पुलाच्या वरच्या बाजूला सिडनेच्या पुलासारखा एवढा मोठडोलारा उभारावा लागला की, त्याने नदीच्या दोही थडीच्या साऱ्या नव्या

जुन्या इमारतींना खुजे ठरविले. आता स्ट्रॅन्ड रस्त्यावर उभे झालेले तेरा मजली सचिवालय आणि डलहौसी चौकातील नवे दूरवाणी केंद्र सोडले तर हावडा-पुलाला ' परतेसर ' म्हणणारी वास्तु कलकत्यात नाही.

हावडा पूल ओलांडताना हुगळीचे दर्शन घडले. हुगळीच्या पात्रात लहान-मोठ्या होड्या, नावा, लॉंची, आगबोटींचा एवढा गदारोळ रात्रंदिवस चालू असतो की, वाटते हरद्वारची वा प्रयागचीच का ही गंगामाई ? तिचे ' अमृता-नेही पैजा ' जिंकणारे मधुर जल इथे खारे बनले आहे. दोही थडीच्या ज्यूटच्या गिरण्यांनी हा सारा परिसर धूसर बनविला आहे. सारे कसे उद्योगी संस्कृतीने धुरकटलेले. हा संपत्तीचा धूर असेल पण त्याने गंगेचे पावित्र्य, वंगदेशाचे निसर्गसौंदर्य, माणसांतली माणुसकी या साऱ्याच गोष्टी खाऊन टाकल्या आहेत. म्हणूनच इथे थोर कवी झाले, लेखक झाले, देशप्रेमी क्रांतिकारकही झाले, मोठमोठे कलावंतही निपजले पण त्यांच्याबरोबरच कुळांच्या माना मुरगळणारे जमीनदारही उपजले आणि दुसऱ्याच्या घामावर आपल्या हवेल्या उठविणारे गिरणीवालेही जन्माला आले. कलकत्त्याने स्वातंत्र्य चळवळीत आत्यंतिक त्याग व देशभक्ती जशी दाखविली तद्वत् ब्रिटिशांच्या अमदानीत अत्यंत लाचारी पत्करणारी माणसेही इथेच प्रकर्षाने दिसली. सदाचाराबरोबर भ्रष्टाचार बरोबरीने जोपासणारे दुसरे भारतीय नगर दाखविणे कठीण. त्यामुळे कलकत्ता म्हणजे कुठल्याही गोष्टीत दोन टोके गाठणारे शहर आहे. श्रीमंतांच्या सुंदर हवेल्यांच्याबरोबरीने झोपडपट्ट्या तुमचे लक्ष इथे वेधतील. प्रशस्त, आखीव, स्वच्छ, गजबजलेल्या चौरंगी वा डलहौसी चौकाप्रमाणेच गलिच्छ भिकार वस्त्या, फुटलेले ड्रेनेज वाहणारे रस्ते, धुरकट कोंदट घरे सांभाळणारे चौकही तुम्हांला अनेक भेटतील. कलकत्त्याची ही विविध दर्शने काही काळ कलकत्त्यात राहिल्यावाचून लक्षात येत नाहीत. पण कलकत्त्याची ही दर्शने भावुक अंतः-करणाने रविंद्रांचे, बंकिमचंद्राचे, बोस, चतर्जी, पाल, मुखर्जींचे कलकत्ता नगर पाहू जाणाऱ्या माणसाला सुखवीत नाहीत.

कलकत्त्याचा विस्तार, रस्ते, इमारती, बाजारपेठा, पुतळे, ऐतिहासिक वास्तु, ट्रॅम्स्, बसेस, क्लब्ज्, मैदाने, तलाव, पूल, उतारुवाहू बोटी–सारे पाहिल्या-बरोबर पहिल्यानेच कलकत्त्यात येणारा माणूस चाट पडतो. मनातल्या मनात मुंबईची शान उतरविणारे हे शहर आहे असे तो कबूलही करून टाकतो. पण

हळूहळू कलकत्त्यात फिरू लागले की, कलकत्त्याच्या बकालपणाची जाणीवच मनाला होऊ लागते आणि मन खिन्न होते.

१६९० साली, २४ ऑगस्ट या दिवशी, हुगळीकाठच्या सुतानती, कालिकाटा आणि गोविंदपूर या खेड्यांच्या परिसरात जॉब चारनॉक नामक ईस्ट इंडिया कंपनीच्या एजंटाहाती आजच्या कलकत्त्याची कोनशीला रोवली गेली. पण सतरावे शतक संपेपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचे दुय्यम ठाणे म्हणूनच हे नगर ओळखले जाई. मुख्य ठाण्याचा मान मद्रासच्या फोर्ट सेंट जॉर्जकडे होता. १६९८ साली औरंगजेबाच्या नातवाच्या हातून वरील तिन्ही खेड्यांचा परिसर भाडेपट्ट्याने कंपनीच्या ताब्यात आला. आज जिथे कलकत्त्याचे जी. पी. ओ. आहे तिथे १६९६ साली कलकत्त्याच्या जुन्या फोर्ट वुइल्यमची उभारणी केली होती. १७ व्या शतकात ब्रिटिशांच्या भारतीय व्यापाराचे आणि राजकीय हालचालींचे केंद्र बनण्याचा मान कलकत्त्याला मिळवून दिला तो याच किल्ल्याने. १७५६ साली सिराज उद्दौलाने ब्रिटिशांच्या या ठाण्यावर हल्ला करून, तिथल्या ब्रिटिश गव्हर्नरासुद्धा साऱ्यांना 'पळता हुगळी थोडी' केली आणि २० जून १७५६ रोजी हाती लागलेल्या १४६ गोऱ्या स्त्रीपुरुषांना २२ फूट लांब, १४ फूट रुंद व १६ फूट उंच अशा खोलीत कोंबून ठेवले. असे म्हणतात की या १४६ पैकी फक्त २३ माणसांनी २१ जूनची सकाळ पाहिली. खोलीचा एकच एक दरवाजा बंद केल्याने १२३ माणसे गुदमरून मरण पावली. हेच कुप्रसिद्ध 'ब्लॅकहोल'. लॉर्ड कर्झनच्या अमदानीत काळ्या संगमरवरी दगडांनी आतून अस्तरून त्या खोलीला खरोखरीच 'काळे रूप' देण्यात आले. कुणी म्हणतात 'ब्लॅकहोल'ची कथा म्हणजे गोऱ्या ब्रिटिशांची कपोलकल्पित 'गप्प' आहे. जालियनवाला बागेतील 'डायर–दुष्कृत्यावर' ताण करणारी घटना दाखवून आपण केलेल्या कृत्यावर रंगसफेती करण्याचा हा प्रयत्न आहे.

१७५७ च्या जून महिन्यात प्लासीच्या लढाईत लॉर्ड क्लाईव्हने सिराजचा पुरा पाडाव केला, त्याचा वध केला आणि ईस्ट इंडिया कंपनीची पाळेमुळे या भूमीत खोल रोवली. सिराजनंतर क्लाईव्हने नबाब बनविलेला मीरजाफर म्हणजे कंपनीच्या हातातले बाहुलेच होता २४ परगण्यांची जमीनदारी, कलकत्ता शहराची मालकी आणि क्रोडो रुपयांची नुकसानभरपाई कंपनीला मिळणे व गोविंदपुरातील भारतीय रहिवाशांची हकालपट्टी करून ते गाव गोऱ्या वस्तीकरता

मोकळे करून घेणे ही प्लासीच्या लढाईची फलश्रुति !

१७५८ साली आजच्या फोर्ट वुइल्यमूची पायाभरणी झाली. २० लक्ष पौंड खर्च करून हा मजबूत किल्ला ब्रिटिशांनी बांधला. वीस-बावीस वर्षे ते काम चालले होते. त्यानंतर कलकत्त्यातील अनेक वास्तु उभ्या झाल्या. आजचे राजभवन १८०२ साली, तर टाऊन हॉल १८१३ साली, स्ट्रॅन्ड रस्त्यातील जुनी टाकसाळ १८३० साली तर नदीच्या पलिकडच्या ( पश्चिम ) काठावरील शिवपुरातील प्रसिद्ध वनस्पति बाग १७८६ सालीच आखली गेली. १८५७ च्या राणीच्या जाहीरनाम्याने कंपनीसरकारच्या जागी ब्रिटिश राजसत्ता आली; आणि कलकत्ता भारतातील ब्रिटिश साम्राज्याची राजधानी बनली. १८५७ साली कलकत्ता विद्यापीठ स्थापन झाले. १८७६ च्या सुमारास म्युनिसिपॅलिटी अस्तित्वात आली. १८७० मध्ये पोर्ट ट्रस्ट स्थापन झाले. चेंबर ऑफ कॉमर्स तर १८३४ पासूनच निर्माण झाले होते.

व्यापार, उद्योग, शासनयंत्रणेचे केंद्र अशा त्रिविध उपाधींमुळे कलकत्ता ‘ वाढता वाढता वाढे ’ अशा थाटात इतके पसरले, इतके श्रीमंत झाले, इतके महत्त्व पावले की, ब्रिटिश साम्राज्यात लंडन खालोखाल त्याचा ढोल वाजू लागला. १९११ साली ब्रिटिशांनी आपली राजधानी दिल्लीला हलविली तरी कलकत्त्याचे व्यापारी व औद्योगिक महत्त्व एवढे होते की, राजधानी गेली तरी कलकत्त्याची शान अणुमात्र कमी झाली नाही.

उत्तरेच्या कोन-नगरापासून दक्षिणेच्या बजबजपर्यंत २०–२२ मैलांचे हुगळीचे पात्र म्हणजेच कलकत्ता बंदराची हद्द. पण पोर्ट ट्रस्टची हद्द शेदीडशे मैलांची आहे. उत्तरेस ६० मैलांवर असलेल्या कालना बंदरापासून नदीमुखापर्यंतच्या दीडशे मैलांच्या प्रदेशात पोर्ट ट्रस्टची सत्ता चालते. एक उत्तम बंदर, व्यापारी केंद्र, आयाती–निर्यातीबाबत चोख व्यवस्था ठेवणारे ठाणे अशी कलकत्त्याची ख्याती आहे. भारताची जवळ जवळ निम्मी आयात–निर्यात कलकत्ता बंदराद्वारे केली जाते एवढे सांगितले की, हुगळी वाटे वर शंभर मैल असलेल्या कलकत्त्यात किती संपत्ती भरतीच्या लाटांसारखी भरत असेल याची कल्पना यावी. ज्यूट, चहा, लाख आणि दगडी कोळसा यांची निर्यात, मुख्यत्वेकरून कापड, तेल, पेट्रोल व इतर अनेक प्रकारचा पक्का माल व साग, तांदूळ यांची आयात कलकत्त्याद्वारे होते. कलकत्त्याच्या अनेक भागात माल पोचविणाऱ्या लॉंचिसची ये जा दिवसभर

चालू असते. वाहतुकीच्या साधनांतील हा वेगळेपणा कलकत्त्यात लगेच जाणवतो. या लॉंचिसद्वारा हुगळीमधून दक्षिणोत्तर प्रवास केला की, कलकत्त्याच्या अनेक वास्तूंच्या दर्शनाचा लाभ होतो. त्या प्रवासात किदेरपूर व सेंट जॉर्ज अशा नावांनी ओळखल्या जाणाऱ्या कलकत्त्याच्या अवाढव्य गोद्या पाहिल्या की कलकत्त्याचे मोठेपण मनावर ठसते.

यात्रिक म्हणून कलकत्त्यात फिरणाऱ्या माणसाच्या लक्षात भरतात ती इथली विस्तीर्ण मैदाने, १५-१६ तलाव, आलिशान सिनेमागृहे व नाट्यगृहे, सबंध आशिया खंडात उत्तम म्हणून समजला जाणारा रेसकोर्स, ' ईडन गार्डन ' म्हणून ओळखले जाणारे कसोटी सामन्यांचे रणक्षेत्र, आणि आडव्या, उभ्या कितीतरी रस्त्यांचे जाळे.

फोर्ट वुइल्यमच्या उत्तरेला हायकोर्ट आणि टाऊनहॉल आहे व त्यांच्या पूर्वेला येते राजभवन. भरवस्तीत ६ एकरांच्या परिसरात उभारलेली ही वास्तु. या राजभवनात म्हणे टिपू सुलतानाचे सिंहासन ठेवले आहे. राजभवन असे भरवस्तीत पाहून मुंबईकराला आश्चर्य वाटते. कलकत्त्याचे वस्तूसंग्रहालय वा म्युझिअम म्हणजे एक अजब चीज आहे. स्थानिक माणसे त्याला ' जादुचे घर 'च म्हणतात. चौरंगी रस्त्यावरील प्रवेशद्वाराने या भव्य इमारतीत प्रवेश केला आणि एकेक विभाग आपण पाहू लागलो की, मती गुंग होऊन जाते, भूस्तर शास्त्राच्या दालनात शिवालिक टेकड्यांच्या परिसरातील शिलीभूत झालेल्या प्राण्यांचे अवशेष आहेत. किड्याचे दालन, माशाचे दालन, चतुष्पाद प्राण्याचे दालन, पक्ष्यांचे दालन, चित्र विभाग, सांस्कृतिक विभाग असे कित्येक विभाग व दालने सावकाशीने बघायला काही महिने लागतील. कुठे पांढरा वाघ आपले लक्ष वेधतो, तर कुठे ' बर्ड ऑफ् पॅरेडाइझ 'चे रंग आपल्याला मोहवितात. कुठे सात इंची दात असलेल्या शिलीभूत वाघाचे वा वाघाएवढ्या असलेल्या शिलीभूत मांजराचे दर्शन घडते. काही काचघरातून भारतातील विविध राज्यांतील खेड्यांच्या मातीच्या प्रतिकृति दिसतील तर काही मधून भारतातील विविध आदिवासी स्त्रीपुरुषांचे, त्यांच्या कपड्यालत्त्याचे दागिन्याचे, गाड्यामडक्याचे मातीच्या प्रतिमाद्वारे दर्शन घडेल. कलकत्त्याचा म्युझियम पाहिल्यावर आपल्या मुंबईच्या काळ्याघोड्याजवळचा म्युझियम अगदीच ' सपक ' आहे असे वाटू लागते.

चौरंगीच्या कोपऱ्यावर बंगालच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय आहे. १८८४ साली ते स्थापन झाले. त्यात १५ हजारावर ग्रंथ असून, ग्रंथालयात असलेली बहुतेक अरबी व पारशी हस्तलिखिते टिपू सुल्तानाच्या ग्रंथालयातून इथे भरती झाली आहेत. चौरंगी म्हणून जो कलकत्त्याचा भाग ओळखला जातो ती ब्रिटिशांपासूनची कलकत्त्याची अलिशान वस्ती. या भागातल्या राजवाड्यासारख्या राहात्या घरावरूनच कलकत्त्याला 'सिटी ऑफ् पॅलेसिस्' हे नाव पडले.

कलकत्ता शहराचे नांव जरी कालिमातेवरून पडले असले तरी गोऱ्यांची इथली वस्ती काही शतकांची. त्यामुळे चर्चिस् व कॅथेड्रल्स्‌ची क्रूसवाली निशाणी कलकत्त्यांत अनेक ठिकाणी पाहायला सापडते. आजही भारताच्या दुसऱ्या कुठल्याही शहरात नसेल एवढी गोऱ्या ख्रिस्ती लोकांची वस्ती कलकत्त्यामध्ये आहे.

कलकत्त्याच्या दक्षिणभागी टॉली नाल्याच्या काठी येतो कालीघाट. टॉलीनाला म्हणजे गंगेचे पात्र आहे. ते पार भरले होते. ते १७७५ मध्ये उपसले. मेजर टॉली याने पण हा नाला म्हणजे गंगा वाटतच नाही. पण आजही भक्त मंडळी त्यात डुबकळ्या मारतात! कालिघाटी जायचे कलकत्त्याच्या नागरदेवताला भेटायला. पण जगदंबेचे इथले रूप शक्ति आहे. भयंकर आहे. लालजीभ बाहेर काढलेला कालीचा मुखवटाच सांगतो की ती 'नॉनवेज' आहे! दररोज म्हणे ३२० पौंड तांदूळ, २४ पौंड साखर, २० शेर मिठाई, ५ शेर लोणी, दहा शेर दूध, ८०० केळी व ८ ते १० बोकडांचा नैवेद्य तिला अर्पावा लागतो. सणासुदीच्या दिवशी, विशेषतः दुर्गापूजेसारख्या उत्सवप्रसंगी पांचपन्नास रेडे आणि एक हजार बकरे एवढी तिची भूक वाढते. आजच्या अन्नटंचाईच्या काळांत ही मापे ऐकूनच कुणाचिही छाती दडपेल. कालीचे मंदिर कांही फारसे मोठे नाहीं. पण मूळ मंदिर ३५० वर्षांपूर्वी बांधले गेले असे म्हणतात. आताचे मंदिर उभारलें चौधरीनामक कालिकात्याच्या जमिनदारानें. १८०९ साली त्यानें कालिमातेचें मंदिर उभारून १९४ एकराची आपली शेतजमीन मंदिराच्या खर्चाकरता दिली. चंदीश्वर नांवाच्या एका गृहस्थाला कालिमंदिराची व्यवस्था पहाण्याकरता नेमण्यात आले. आज त्याचे वंशज स्वतःला 'हलदार' म्हणवितात. आता तेच मंदिराचे मालक म्हणायचे. नवरात्र व दसरा हे दुर्गा-

140359

पूजेचे दहा दिवस. या काळात कालीमातेचा खूप मोठा उत्सव शहरभर साजरा होतो. पुरीच्या जगन्नाथाच्या रथाचा उत्सव जसा ओरीसात महत्त्वाचा, तसाच हा दुर्गापूजेचा सोहळा. सरकारी कचेऱ्या सुद्धा त्या दहा दिवसात बंद रहातात.

दक्षिण कलकत्त्यात पाहिलेच पाहिजे असे दुसरे स्थळ म्हणजे 'व्हिक्टोरिया मेमोरियल' व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन याने ताजमहालच्या तोडीस उतरावे या दृष्टीने उभारलेले हे स्मारक. १९२१ साली त्याचे उद्घाटन झाले. पंधरावर्षे ते बांधण्याचे काम चालू होते. या वास्तूच्या शिखरावर 'विजय'देवतेची सोळा फुटी फिरती मूर्ती बसविली आहे, ३३९ फूट लांब, २२८ फूट रुंद व जवळ जवळ २०० फूट उंच अशी ही टोलेजंग इमारत पाहून व त्यातील विविध दालनात लावलेली चित्रे व पुतळे निरखून माणूस थक्क होतो. स्मारकाच्या दरबार हॉलमध्ये काळ्या पाषाणाची नबाब नझिम नामक बंगाल, बिहार व ओरिसाच्या नबाबाची 'मसनद' मांडून ठेवली आहे. १७६५ मध्ये याच मसनदीवर लॉर्ड क्लाईव्ह नबाबाच्या बरोबरीने आरुढ झाला आणि त्याने नबाबाच्या राज्याचे दिवाणी अधिकार कंपनीसरकारच्या ताब्यात घेतले.

टॉली नाला ओलांडून किदरपूर भागात शिरले की, कलकत्त्याची 'राणीची बाग' पाहून घ्यावी. वनस्पती व प्राणिसंग्रह या दृष्टीने ती राणीच्या बागेची बरोबरी करतेच, पण शिवाय 'सर्पगृह' इथेच दिसेल. हरणे, पक्षी व इतर प्राणी यांना नैसर्गिक अवस्थेत पाळलेले पाहूनही मजा वाटते. बागेच्या मध्यभागी असलेल्या बेटावर दक्षिण आशियातील 'गिब्बन' नामक माकडे व 'ओरँग उटँग' सारखे मानवसदृश प्राणी पुन्या 'नैसर्गिक अवस्थेत' पाहायला सापडतात. पण या प्राणिसंग्रहालयाची व्यवस्था 'सुविहीत' वाटत नाही !

या बागेच्या दक्षिणेला हवामान खात्याची 'अलिपूर वेधशाळा' आहे. हिमालयाच्या एवरेस्ट शिखरावर चढाई केव्हा करावी याच्या योजना या वेधशाळेच्या हवामानविषयक अंदाजावरून आखण्यात येतात; एवढे सांगितले की, या वेधशाळेचे 'डोंगराएवढे' महत्त्व जाणवावे ! वेधशाळेच्या आग्नेयेला येते कलकत्त्याची 'नॅशनल लायब्ररी' 'बेल्व्हेडेर हाऊस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूर्वीच्या 'व्हाइसरीगल लॉज' मध्ये तिने आपला संसार मांडला आहे

कलकत्त्याच्या उत्तरभागात जी. पी. ओ. जवळचे 'रायटर्स बिल्डिंग' नामक सचिवालय पाहून, चित्तरंजन ॲव्हेन्यूतील कलकत्ता विद्यापीठ पाहायला गेले

की, आधी ' बनारस विद्यापीठ ' पाहून आलेल्या माणसाची निराशा होते. भव्य–दिव्य अशा गोष्टींचा साक्षात्कार त्या भकास इमारती व वर्ग पाहून होतच नाही. तिथली काही सभागृहे पाहून मला जुनाट वखारी गुदामांची आठवण का झाली न कळे ! विद्यापीठाचे ग्रंथालय खूप मोठे आहे. भिंतीवरील चित्रे मन वेधून घेणारी आहेत.

जैनांचा दहावा तीर्थंकर सितलनाथजी यांना अर्पण केलेली. बद्रिदासाच्या बागेतील संगमरवरी जैन मंदीरे व त्या सभोवतालच्या बागा म्हणजे कलकत्त्यातील एक रमणीय व पवित्र स्थान आहे; अप्पर सर्क्युलर रस्त्यावरील महर्षी जगदीशचंद्र बोसांची प्रयोगशाळा व संशोधनसंस्था पाहून प्रत्येक भारतीयाची छाती अभिमानाने फुगून यावी.

कलकत्त्याचा यात्रिक हुगळीच्या पश्चिमतीरावर १७८६ साली कर्नल किड नामक गृहस्थाने आखून जोपासलेली वनस्पतीबाग पाहायला चुकत नाही. २७० एकर एवढ्या भूभागावर पसरलेली ती विस्तीर्ण बाग म्हणजे एक सुविहीत जंगलच आहे. बागेतील कालवे, त्याच्यावरील छोटे पूल, मोहाची, पामची आणि अनेक हजारो तऱ्हेची लहान मोठी झाडे यांच्या सान्निध्यातून फिरताना अशा स्थळांना सदैव वंचित असलेल्या मुंबईकरांना तरी विशेष आनंद वाटतो. या वनस्पती बागेतील जुनाट जुगादीचा वटवृक्ष अड्यारच्या बागेतील वटवृक्षापेक्षा मोठा आहे. त्याची उंची ८८ फूट असून १२५१ फुटाच्या परिघात त्याच्या फांद्या पसरल्या आहेत. त्याच्याकडे पाहून मला मिल्टनच्या ' पॅरॅडाइज लॉस्ट ' मधील ओळी आठवल्या.

" The bended twigs take root and daughters grow
About the mother tree, a pillar'd skade,
Ligh over-arched and echoing walks between "

हिमालयाच्या उतारावर आणि आसामच्या टेकड्यांच्या पाठीवर चहाच्या मळ्यांची जी अफाट लागवड झाली, आणि जो चहा या देशाला परदेशी चलन मिळवून देणारा ' हुकमी एक्का ' मानला जातो, त्या लागवडीचे मूळ प्रयोग या बागेतले. इथल्या वनस्पतिसंग्रहात चाळीसहजार वनस्पतिप्रकार आढळतात. वनस्पतिशास्त्राचे इथले ग्रंथालयही आवर्जून उल्लेखावे असे आहे.

कलकत्त्याचा यात्रिक विवेकानंदांच्या वेलूरमठाला भेट द्यायला विसरत नाही. हुगळींच्या पश्चिमतीरी, बेलूर नामक उपनगरात, रम्य वनश्रीच्या सान्निध्यात विवेकानंदजींनी आपल्या गुरुदेवांचे, स्वामी रामकृष्ण परमहंसांचे मंदिर उभारले. त्याच आवारात इतर अनेक मंदिरे आणि रामकृष्ण मिशनची कचेरी आहे. विवेकानंदांच्या अमेरिकन शिष्यांनी उभारलेल्य रामकृष्ण मंदिराचे शिल्प फारच सुंदर आहे. मंदिरातील रामकृष्णांची प्रेमळ मूर्ती अचेतन आहे असे मुळी वाटतच नाही. मंदिराच्या आवारात स्वामी विवेकानंद व त्यांचे गुरुबंधू स्वामी ब्रह्मानंद यांच्या सुबक मूर्ती असलेलीही दोन मंदिरे आहेत. बेलूरमठाचे सारे वातावरणच शांत, शुचिर्भूत आणि गंभीर आहे.

वेलूरच्या पैलथडी आहे दक्षिणेश्वराचे मंदिर. तिथे पोचायला नौकाजवळ करावी वा बसने नदीवरला लांबलचक पूल ओलांडावा. दक्षिणेश्वराचे मंदिर तसे फार भव्य नाही. सभामंडपही जरा दूर बसल्यासारखा मंदिरापासून अलग आहे. याच मंदिरात रामकृष्णांनी आई कालीमातेच्या दर्शनाचा ध्यास घेतला आणि इथेच त्यांना तिचे दर्शन झाले. दक्षिणेश्वर पाहताना स्वामी रामकृष्णांचे सारे चरित्र डोळ्यांपुढे साकार झाले. त्यातले विविधप्रसंग प्रत्यक्ष घडताहेत असे वाटले. पण बसच्या भोंग्याने भानावर आलो आणि पुढच्या मार्गाला लागलो.

आझाद हिंद फौजेचे सरसेनापती बाबू सुभाषचंद्र बोस यांचे एल्जिन रस्त्यावरील घर म्हणजेही आज एक यात्रास्थान बनले आहे. जुन्या पद्धतीचा गढीवजा दिसणारा हा एक लांबच लांब वाडा आहे. त्याच्या पहिल्या माळ्यावर सुभाषबाबूंची खोली आहे. दुसऱ्या महायुद्धकाळात स्थानबद्धतेतून आपली सुटका करून सुभाष फरारी झाले तेव्हा होती तीच त्यांच्या खोलीची स्थिती आजही दृष्टीस पडते. पलंग कॉटवरील बिछाना, चादरी, टेबलावरचे घड्याळ, निरनिराळी मानपत्रे, छत्र्या, बुटाचे जोड, कपाटांतील ग्रंथ सारे जिथल्या-तिथे आहे. त्यांच्या खोलीत वावरताना माणूस अवाक् बनतो.

ऐतिहासिक काळांतले कलकत्ता गोऱ्या साहेबांचे, नबाबांचे, जमीनदारांचे, चहाच्या मळेवाल्यांचे आणि गिरणी मालकांचे शहर होते. मध्यमवर्गीय, मजूर व श्रमिक तिथे चोरून वावरत. त्यामुळे कलकत्त्याचे सांस्कृतिक दृष्ट्या भाग पडल्यासारखे वाटतात. उत्तर भाग सनातन्यांचा तर डलहौसी भाग

पैसेवाल्या गुलहौशींचा, एल्गिन रोडचा भाग मध्यमवर्गीयांचा तर त्याच्या दक्षिणेचा भाग आणि राशबेहारी ॲव्हिन्जूचा परिसर साम्यवादी, प्राध्यापक, दाक्षिणात्य पंडित, सिनेनट व नट्या, दुकानदार यांच्या वस्तीचा भाग आहे.

उन्हाळी व हिवाळी असे दोन पावसाळे कलकत्त्याला झोडतात. हवा कुंद करतात. धुरकट तर ती आहेच. मग कॉलरा, विषमज्वर यांच्यासारख्या साथी कलकत्त्याच्या कार्पोरेशनच्या कर्तबगारीवर ओरखाडे उठवीत ५० । ६० लाखांची वस्ती काबूत ठेवायला तिला मदत करतात. आणि कालिघाटचे अद्ययावत् 'कैलास भवन' पुढची व्यवस्था चोख बजावते !

कलकत्ता नगराचे व्यक्तिमत्त्व चार व्यवच्छेदक लक्षणांद्वारा व्यक्त करता येईल. बंगाली स्त्री, टागोर, बंगाली लग्नातील मेजवान्या आणि कुत्र्यांच्या छत्र्यांप्रमाणे कलकत्ताभर उगवलेल्या संस्थांमधून चालणाऱ्या 'फ्री स्टाईल' चर्चा ही ती चार लक्षणे.

पतीच्या मागून सहाफुटावरून चालणारी, अबोल, सुंदर, नम्र पण आकर्षक दिसणारी भांगामधून सिंदूर मिरविणारी कृष्णवर्णी अशी बंगाली स्त्री. हळु आवाजात व मृदु स्वरात ती बोलेल. ( हा स्त्रीचा मोठा गुणच म्हटला पाहिजे ! ) पण त्या बोलण्यातूनही आपला निश्चय जाणवील. तिचे मन घरातच रमत असले तरी ती बुद्धिवान् पण भावनाप्रधान, नम्र पण निश्चयी, कार्येषु मंत्री, करणेषु दासी असते. गुरुदेव म्हणतात त्याप्रमाणे ती अभिसारिका प्रेयसीही आहे आणि ममतेची मूर्ती माताही आहे. बंगाली स्त्रीने बंगालची संस्कृती राखली आहे.


कुठल्याही बंगाली माणसाचे मन काबीज करायचे असेल तर एक सोपा मार्ग सांगतो. तुम्ही त्याच्याजवळ 'टागोर' बोला टागोरांना न ओळखता बंगाली माणसाच्या पोटात तुम्हांला शिरता यायचे नाही. कलकत्याच्या माणसांची पोटदुखी आहे ती ही की, टागोरांनी अर्धे आयुष्य या कलकत्यात काढले पण तरीही त्यांच्या कवितेत म्हणावे तसे कलकत्त्याला स्थान नाही. कलकत्त्याची माणसे जहाल आहेत, क्रांतिकारी आहेत, स्वाभिमानी आहेत, भावनाप्रधान आहेत, कविमनी आहेत, सहज रागावणारी आहेत, कल्पनेच्या साम्राज्यात रमणारी आहेत. म्हणून असे म्हणतात की एकटा कलकत्तेवाला कवी बनतो. दोघे एकत्र आले तर ते वादविवाद सुरू करतात आणि तिघे जमले

की ते एखादे मासिक काढायचे ठरवितात. पण चौघे जमले की दंगलीला सुरवात झालीच म्हणून समजावे! १४४ कलमान्वये ५ माणसांच्या सभेला बंदी घालतात. कलकत्त्यांत हे कलम लागू करताना हा आकडा चारावर आणायला हवा!

पुण्याप्रमाणेच कलकत्ताही लग्नी मेजवान्याकरता प्रसिद्ध आहे. जिभेचे च्चोचले कलकत्त्याच्या मसालेदार पदार्थांनी भागतात. आणि ही संधी लग्नाच्या सोहळ्यात मिळणारच. चर्चा तर चौवीस तास कुठे न् कुठे चालूच असतात. मग ते 'कॉफीगृह' असू दे की नाट्य गृह असू दे, दोन माणसे रस्त्यात भेटोत अगर धाकुरीया तलावाकाठी फिरायला जावोत. तलावाकाठच्या बाकड्यावर बसलेल्या तरुण प्रेमी जीवांची पर्वा न करता ही माणसे तिथे चर्चाही मांडणारच.

कलकत्ता ही वंगदेशाची राजधानी अशी सुंदर आहे, चर्चाखोर आहे, दंगेखोर आहे, श्रीमंत आहे, साम्यवादीही आहे. स्वच्छ आहे तशी घाणेरडीही आहे. कालीघाटाची काली, दक्षकन्या पार्वती जशी सुंदर आहे, तशीच भयंकर नाही का? तशीच तिच्या नावाने ओळखली जाणारी ही नगरी सुंदर-भयंकर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



# निजामाचे हैद्राबाद

एके काळी निजामी राज्याची वैभवसंपन्न राजधानी असलेले आणि आत आंध्रप्रदेशाची राजधानी बनलेले हैद्राबाद म्हणजे संस्कृतिसंगमाचे प्रतीक म्हणायला हवे. उत्तर-दक्षिणी आणि पूर्व-पश्चिमी संस्कृतीचे आणि हिंदुमुस्लीम रीतिरिवाजांचे इतके खुमासदार कडबोळे तुम्हांला दुसऱ्या कुठल्याही भारतीय शहरात पाहायला सापडणार नाही. मद्रासच्या मरिना किनाऱ्यावर उभे राहिल्यावर मुंबईच्या राणीच्या कंठ्याचे निरीक्षण करीत असताना दिसते तशी नितळ क्षितिजरेषा हैद्राबादला दिसत नाही. नव्या दिल्लीप्रमाणे वा सवाई जयसिंगाच्या जयपुराप्रमाणे प्रमाणबद्ध आखीव बांधणीचेही हे शहर नाही. त्यामुळे एका विशिष्ट प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण असे शिल्पही हैद्राबादेत दिसत नाही. दिसते ती विविध प्रकारच्या शिल्पांची सरमेसळ.

पूर्वकाळी 'भागानगर' म्हणून ओळखले जाणारे हे शहर १५८९ साली बसविले गेले. गोळकोंड्याच्या कुतुबशाहीतील पाचवा राजा महंमद कुली याने मुसी नदीच्या दक्षिण काठावर या शहराची मांडणी केली. या जुन्या शहरात दिसणाऱ्या 'चारमिनार' वा 'जामी' मशिदीसारख्या वास्तू महंमद कुलीचे नाव सांगतात. साऱ्या दख्खनची दौलत पादाक्रांत करून ती मोगली साम्राज्याखाली आणण्याच्या ईर्षेने प्रेरित होऊन, दिल्लीचे मयूरासन सोडून दख्खन

पठारावर रानोमाळ युद्धाचे मोर्चे बांधणाऱ्या औरंगजेबाने १६८७ साली कुतुबशाही बुडविली आणि हैद्राबाद खानदेशच्या मोगली सुभेदाराच्या अमलाखाली गेले. भागानगराभोवती कोट उभा झाला तो या खानदेशच्या खानाच्या अमदानीत. १७२४ साली सध्याच्या निजामाच्या दहाव्या पूर्वजाने, निजाउल् मुल्क असफझाने मोगली सुभेदाराला मुसीचे पाणी पाजून हैद्राबाद आपल्या अमलाखाली आणले. पुढल्या शंभर दीडशे वर्षांच्या काळात आपली 'फेज' सलामत राखण्याकरिता हैद्राबादच्या गादीवर असणाऱ्या निजामांनी कधी फ्रेंचांशी हातमिळवणी केली तर कधी 'कुंपनी' सरकारची तळी उचलली. कधी हैदर-टिपूशी संगनमत केले तर कधी पुणेकरांना चुचकारले. त्यामुळे १८५७ साली इतर सारे राजे, महाराजे, पेशवे, इतिहासदाखल होऊन सारा भारत व विशेषतः दक्षिण प्रदेश राणीच्या जाहीरनाम्याखाली आला तरी, परवा १९४८ साली स्वर्गस्थ सरदार पटेलांनी हैद्राबादेत भारतीय सेना घुसवीपर्यंत निजाम आपल्या गादीला चिकटून होता. आपले वैभव आणि जनानखाने सांभाळून राहिला होता. जगातील सर्वांत श्रीमंत माणसांच्या गणनेत अग्रमान घेऊन झळकत होता. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी गोंडा घोळीत, त्यांचे वर्चस्व मान्य करूनही स्वतःचे अस्तित्व त्याने टिकविले होते. १९४७ साली भारत द्विखंड झाला पण स्वतंत्र झाला. तेव्हा पाकिस्तानशी संधान बांधून आणि ब्रिटिशांची संमती मिळवून आपले स्वतंत्र राज्य स्थापण्याची तयारी त्याने केली होती. रझाकारांना पाठिंबा देऊन भारतीय प्रजासत्ताकाशी दोन हात करायला तो सिद्ध झाला होता. पण या वेळी त्याचे नशीब सिकंदर नव्हते आणि त्यामुळे भारताच्या कटिप्रदेशातील ही निजामी पोटदुखी पटेलांच्या खंबीर शस्त्रक्रियेने दूर झाली आणि हैद्राबाद संस्थानचा मुलूख महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि म्हैसूर राज्यात समाविष्ट झाला व हैद्राबाद आंध्रप्रदेशाची राजधानी बनले.

या अवधीत मुसीच्या दक्षिणतीरावर महंमद कुलीने उभारलेले ते भागानगर खूपच विस्तारले. मुसीनदीच्या उत्तर तीरावर आणि त्याच्या पलिकडेही खूपच वाढत गेले आणि इतर अनेक नगरांप्रमाणे ते आता मैलोगणती पसरलेले खूपच मोठे शहर बनले आहे. बारा लक्ष एकावन्न हजार लोकांना आता त्याने सामावून घेतले आहे. अनेक शतके राजधानी राहण्याचा मान या शहराला मिळाला असूनही राजधानीचे 'खानदान' या शहरात जाणवत नाही. श्रीमंत

निजामाची रियासत इथे चालू होती तरी निजामशाहीचे आणि प्रजेचे वैभव वाढावे, आर्थिक सुबत्ता निर्माण व्हावी या दृष्टीने निजामाने कधी पाऊल उचलले नाही. त्यामुळे या पुराण्या शहराच्या आसपास कसले कारखाने धडधडले नाहीत आणि वैभवाचा, समृद्धीचा मार्ग सामान्य प्रजेला मोकळा झाला नाही. निजामाचे सरदार मोठे ' जमीनदार ' होते, त्याच्याच सारखे वैभव भोगीत होते, त्यांना सामान्य लोकांची ' कणव ' कशापायी येणार ? नाही म्हणायला कापड, गालिचे, घोड्यावर लादायच्या किनखापी बैठकी, सुती व लोकरी कपडे इथे बनत. काच, साखर, कागद आदि वस्तू बनविणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कारखानेही इथे सजले होते, तरीपण कंजुष निजामामुळे आणि मुसी नदीच्या निर्जल, रेताड पात्रामुळे ' उद्योग ' इथे सजला नाही– ही गोष्ट मान्य करायलाच हवी.

अहो, या श्रीमंत निजामाची श्रीमंती हैद्राबादेत राहो, अगदी खुद्द त्याच्या राजवाड्यांच्या परिसरांतही जाणवत नाही.... खूप मोठ्या व उंच भिंताडाआड ती दडून बसली आहे. टेकडीवर उभारलेला त्याच्या ' फलकनुमा ' नामक राजवाडा पाहायला गेलात तर मुंबईच्या खोताच्या वाडीतील गल्लीबोळांतून तसल्याच पडक्या, जुन्या इमारतींमधून आपण जात असल्यासारखे वाटते. ह्या अरुंद गल्ल्यांच्या कोपऱ्याकोपऱ्यावर साठलेले उकीरडे चुकविताना तर नाके दम होते. असला दरिद्री श्रीमंत राजा ज्या नगराला मिळाला, त्या नगरात बदलत्या काळाचे नवचैतन्य कसे भरावे ?

आज हैद्राबादेत ज्या वास्तू दिसतात वा स्थापत्य कलेचा जो थोडाफार फुलोरा दिसून येतो तो बराचसा जुन्या काळचा आहे. त्यावर उत्तरेची मोगली छाप दिसून येते. त्यामुळेच हैद्राबादेत जुन्या दिल्लीची आठवण होते; वाराणशी-सारख्या गल्लीबोळांचे चक्रव्यूह पार करायची पाळी येते. पण बहुतेक रस्ते कॉंक्रीटचे आहेत. काही कांही विभागांतील घरे हारीने मांडली आहेत. त्यांतली फारशी दुमजली आढळणार नाहीत. हुसेनसागराच्या काठावर डोंगरी-पार्श्वभूमीवर बांधलेली बांजरा टेकडीवरील घरे आणि हैद्राबादची लोकवस्ती सांभाळणारी ही घरे यांत मलबारहिल आणि परळ–लालबाग एवढे अंतर आहे.

मुसीच्या दोन्ही काठांवर हैद्राबाद वसले असे वर सांगितले. म्हणजे हैद्राबाद

शहरामधून मुसी वाहाते हे निराळे सांगायला नको. पण इथे हा उल्लेख प्रामुख्याने करायचे कारण असे, की एरवी निर्जल, रेताड असणारी, अजगराप्रमाणे शहराच्या मध्यभागी पसरलेली ही मुसी साधारणतः पावसाळ्यात थोडीशी वाहाते हे खरे, पण १९०८—९ साली या मुसीनेच हैद्राबादचे "पानशेत" केले. त्या साली ही 'मुसी' आणि 'इसी' सारख्या तिच्या सख्या या साऱ्यांनीं संगनमत करून निजामशाहीची राजधानी बुडवायचे जणू ठरविले. मुसीचा असा महापूर ना कुणी ऐकला होता की पाहिला होता. शहराच्या दोन्ही बागांना जोडणारे मुसीवरील बहुतेक पूल या जलप्रलयात वाहून गेले. नदीकाठावरील इमारतींची जबरदस्त पडझड झाली. क्रोडो रुपयांचे नुकसान संभवले. हैद्राबादची शान धुऊन निघाली. मुसीच्या महापुराचा एवढा धसका हैद्राबादच्या शासनयंत्रणेला बसला की, त्यांनी कडोनिकडिने के. एम. विश्वेश्वरैय्या या धरणऋषीला तत्काळ पाचारण केले. मुसीने हा असा 'हैदोस' पुन्हा घालू नये म्हणून तिला 'धरबंध' घालण्याच्या योजना विश्वेश्वरैय्यांनी आखल्या आणि प्रत्यक्षात आणल्या. त्यामुळे मुसीचा बंदोबस्त तर झालाच, पण हैद्राबाद शहराला एक निराळी रमणीयता प्राप्त झाली.

मुसी व इसी यांना बांधून काढल्यामुळे त्यामागे 'उस्मानसागर' आणि 'हिमायतसागर' नामक जे तलाव तयार झाले त्यांनी हैद्राबादची पाण्याची सोय तर पाहिलीच पण शिवाय हैद्राबाद म्हणजे तलावांचे शहर म्हणावे एवढा आगळेपणा त्या शहराच्या व्यक्तिमत्त्वामध्ये उत्पन्न केला.

हैद्राबाद आणि सिकंदराबाद या जुळ्या भावंडांना जोडणारा एक मैल लांबीचा रुंद रस्ता 'हुसेनसागर' नामक तिसऱ्या तलावाच्या बांधावरून गेला आहे. हैद्राबाद व सिकंदराबाद यांना जुळी भावंडे म्हणणे चूकच. कारण 'जुळी' एका मातेची असतात. इथे हैद्राबाद उभारले कुतुबशहाने तर सिकंदराबाद ब्रिटिश रेसिडेंटामुळे तयार झाले. शिवाय या जुळ्यांत म्हणण्यासारखे साम्य मुळीच नाही. उलट विषमताच फार आहे. एकाचा दिमाख मोगली आहे तर दुसऱ्याचा रुबाब खास साहेबी! हुसेन सागराच्या उत्तर दक्षिणांगास ती पसरली आहेत. शहरांच्या मध्यभागी पसरलेल्या ११–१२ मैल परिघाच्या हुसेनसागरामुळे नगराला केवढी चारुता आली आहे! १५५० साली, जवळजवळ पावणेतीन लक्ष रुपये खर्चून हा तलाव निर्मिणारा इब्राहिम कुतुबशहा

रसिक असावा. असे म्हणतात की, या कुतुबशहाने हुसेनसागर बांधून काढला, पण पहिली चार वर्षे पाण्याचे एक टिपूस त्यात जमा झाले नाही. पण नंतर मुसी नदीला एक ३६ मैली पाट फोडून तो जेव्हा तलावात आणून सोडला तेव्हा शिळासहामीच्या कथेप्रमाणे तलाव एकदम गरगरून भरून आला. जणू मुसी इथली भाग्यविधाती देवताच आहे. तिला डावलून झालेला हा प्रयत्न तिला मान्य झाला नाही! तिची पायधरणी केल्याबरोबर तलाव भरला! हुसेनसागरच्या काठावरील प्रशस्त रस्ता, बागा, नौकाविहाराची सोय करणारे क्लब्ज, बांजरा हिल्सवरील सुबक कोरी घरे, साऱ्याच गोष्टी इतक्या रमणीय आहेत की, माझ्यासारखा माणूस 'सलारजंग म्युझियम'च्या ७४ प्रशस्त खोल्यांची पायपीट करीत तासा दोन तासांत सारे पाहायची केविलवाणी धावपळ करण्यापेक्षा हूसेनसागरच्या काठावर बसून त्या निवांत जलाशयाचे सान्निध्य उपभोगीत हैदाबादच्या सर्व थरांतील नागरिकांचे निरीक्षण करणे अधिक पसंत करील. दर दहावीस फुटांवर तुम्ही एखाद्या पेन्शनराला अडखळाल. त्यांतला कुणी बडा अधिकारी असतो, कुणी जुना नबाब वा जमीनदार असतो. आपले ते वैभव गेले हे मानायलाच मुळी ही मंडळीं तयार नाहीत. त्या मैफली, ती जेवणे ते नाच, त्या पार्ट्या, विसरणे त्यांना शक्य नाही. कुठल्याही पेन्शनरांच्या टोळक्याभोवती रेंगाळलात तर ही सारी बोलणी तुम्हांला ऐकायला मिळतील. निजामाचे राज्य खालसा झाल्याचे दुःख त्याच्यापेक्षा या मंडळींना अधिक!

हैद्राबाद पाहायला येणारा माणूस इथल्या माणसांच्या हृदयाला कान न लावता इथली प्रेक्षणीय स्थळे पाहत सुटतो. 'चारमीनार' त्याला प्रथम आकर्षित करतो. पण चारमीनारभोवती इतकी गिचमिड वस्ती आज भरून राहिली आहे की देखणाऱ्याला चारमीनार नीट पाहताच येत नाही. १५९१ साली चारमीनार उभारला गेला. का? कारण माहीत आहे? त्या साली हैद्राबादमध्ये प्लेगने धुमाकूळ घातला. प्लेग थांबल्यावर त्या आनंदाप्रीत्यर्थ महंमद कुलीने ही 'प्लेगस्मृती' बांधून काढली. १८७ फूट उंचीचे चार मीनार असलेली आणि शंभर फूट लांबी रुंदी असलेली ही इमारत हैद्राबादेतील उत्कृष्ट शिल्पाचा नमुना मानली जाते. पथारघाटी नामक या रस्त्यावर वा आजूबाजूला चारमीनाराप्रमाणे ५० फूट उंचीच्या चार कमानी, 'मक्का मशीद'


नावाची शहारातील प्रमुख मशीद, चौमहल्लानामक, तेहेरानच्या शहाच्या राजवाड्याप्रमाणे दिसणारा राजवाडा इत्यादी वास्तू उभ्या आहेत.

चौमहल्लापासून दोनएकशे यार्ड अंतरावर एका गल्लीत महाराजा चंदूलाल नामक निजामी मंत्र्याची 'बारादरी' नामक इमारत दिसते. या इमारतीचे हिंदू नक्षीकाम त्या मुसलमानी मोहल्ल्यात नजरेत भरल्यावाचून राहत नाही शहराच्या पश्चिम तटाजवळ नवाब तेघ जंग याचा वाडा दृष्टीस पडतो. इथे य साडेसहा फूट उंचीच्या रुबाबदार नवाबाची भली मोठी तलवार व इतर हत्यारे पाहायला सापडतात.

अफझल गेटपासून थोड्या अंतरावर सर सलारजंगनामक निजामी मुख्य-मंत्र्याचा वाडा दिसतो. १८५३ ते १८८३ या तीस वर्षांच्या आपल्या कार-कीर्दीत या रसिक आणि कर्तबगार मुख्यमंत्र्याने हैद्राबादेची शान खूपच वाढ-विली. सलारजंग यांचा वस्तुसंग्रह इतका मोठा, वैविध्यपूर्ण आणि मौल्यवान आहे की, आशियातील नव्हे जगातील प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयांत सलारजंग म्युझियमची गणना होते. वस्तूंची योग्य तशी वर्गवारी आणि चांगल्या मार्ग-दर्शकांची जोड जर मिळाली तर हा म्युझियम 'अजबखाना' न वाटता म्युझि-यम वाटू लागेल असे मला तो पाहताना जाणवले.

शहराच्या ईशान्य अंगास असफझा निजाम-उल-मुल्कने बांधलेली 'पुराणी हवेली' दिसते. तिथे जवळच महंमद कुलीने उभारलेला 'दरुस शाफा' म्हणजे रुग्णालय म्हणून उभारलेली इमारत दृष्टीस पडते. हैद्राबादचे उस्मानिया विद्या-पीठ पूर्वी अफझल गेटजवळ होते. पण आता ते तिथून सहा मैलावर 'अडिक-मेट' या ठिकाणी गेले आहे. १५०० एकरांच्या परिसरात उभारलेल्या विद्या-पीठाच्या विविध इमारती पाहून सध्याच्या निजामाने आपल्या अमदानीत एवढे तरी पुण्यकर्म केल्याची जाणीव होते.

मुसी नदीवरचा पूर्वेकडचा ओलिफांट पूल ओलांडून चदरघाट नामक उप-नगरात गेल्यावर पाहायला मिळते ती पूर्वीच्या ब्रिटिश रेसिडेन्सीची इमारत व तिच्या सभोवती खूप जुन्या वृक्षांनी सुशोभित केलेली बाग.त्यांतल्या एका झाडाचा परिघ आहे ३० फूट. प्रचंड असे चिंचेचे झाड पाहायचे असेल तर ते इथे पाहा-यला मिळते. एक मोहाचे झाड तर या चिंचेपेक्षाही प्रचंड आहे. याच उपन-गरात पसरला आहे सुल्तान बझार. मराठी माणसाला या लोकवस्तीचे कौतुक



# निजामाचे हैद्राबाद

एके काळी निजामी राज्याची वैभवसंपन्न राजधानी असलेले आणि आत आंध्रप्रदेशाची राजधानी बनलेले हैद्राबाद म्हणजे संस्कृतिसंगमाचे प्रतीक म्हणायला हवे. उत्तर-दक्षिणी आणि पूर्व-पश्चिमी संस्कृतीचे आणि हिंदुमुस्लीम रीतिरिवाजांचे इतके खुमासदार कडबोळे तुम्हांला दुसऱ्या कुठल्याही भारतीय शहरात पाहायला सापडणार नाही. मद्रासच्या मरिना किनाऱ्यावर उभे राहिल्यावर मुंबईच्या राणीच्या कंठ्याचे निरीक्षण करीत असताना दिसते तशी नितळ क्षितिजरेषा हैद्राबादला दिसत नाही. नव्या दिल्लीप्रमाणे वा सवाई जयसिंगाच्या जयपुराप्रमाणे प्रमाणबद्ध आखीव बांधणीचेही हे शहर नाही. त्यामुळे एका विशिष्ट प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण असे शिल्पही हैद्राबादेत दिसत नाही. दिसते ती विविध प्रकारच्या शिल्पांची सरभेसळ.

पूर्वकाळी ‘भागानगर’ म्हणून ओळखले जाणारे हे शहर १५८९ साली बसविले गेले. गोळकोंड्याच्या कुतुबशाहीतील पाचवा राजा महंमद कुली याने मुसी नदीच्या दक्षिण काठावर या शहराची मांडणी केली. या जुन्या शहरात दिसणाऱ्या ‘चारमिनार’ वा ‘जामी’ मशिदीसारख्या वास्तू महंमद कुलीचे नाव सांगतात. साऱ्या दख्खनची दौलत पादाक्रांत करून ती मोगली साम्राज्याखाली आणण्याच्या ईर्षेने प्रेरित होऊन, दिल्लीचे मयूरासन सोडून दख्खन

पठारावर रानोमाळ युद्धाचे मोर्चे बांधणाऱ्या औरंगजेबाने १६८७ साली कुतुबशाही बुडविली आणि हैद्राबाद खानदेशच्या मोगली सुभेदाराच्या अमलाखाली गेले. भागानगराभोवती कोट उभा झाला तो या खानदेशच्या खानाच्या अमदानीत. १७२४ साली सध्याच्या निजामाच्या दहाव्या पूर्वजाने, निजाउल् मुल्क असफझाने मोगली सुभेदाराला मुसीचे पाणी पाजून हैद्राबाद आपल्या अमलाखाली आणले. पुढल्या शंभर दीडशे वर्षांच्या काळात आपली 'फेज' सलामत राखण्याकरिता हैद्राबादच्या गादीवर असणाऱ्या निजामांनी कधी फ्रेंचांशी हातमिळवणी केली तर कधी 'कुंपनी' सरकारची तळी उचलली. कधी हैदर-टिपूशी संगनमत केले तर कधी पुणेकरांना चुचकारले. त्यामुळे १८५७ साली इतर सारे राजे, महाराजे, पेशवे, इतिहासदाखल होऊन सारा भारत व विशेषतः दक्षिण प्रदेश राणीच्या जाहीरनाम्याखाली आला तरी, परवा १९४८ साली स्वर्गस्थ सरदार पटेलांनी हैद्राबादेत भारतीय सेना घुसवीपर्यंत निजाम आपल्या गादीला चिकटून होता. आपले वैभव आणि जनानखाने सांभाळून राहिला होता. जगातील सर्वांत श्रीमंत माणसांच्या गणनेत अग्रमान घेऊन झळकत होता. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी गोंडा घोळीत, त्यांचे वर्चस्व मान्य करूनही स्वतःचे अस्तित्व त्याने टिकविले होते. १९४७ साली भारत द्विखंड झाला पण स्वतंत्र झाला. तेव्हा पाकिस्तानशी संधान बांधून आणि ब्रिटिशांची संमती मिळवून आपले स्वतंत्र राज्य स्थापण्याची तयारी त्याने केली होती. रझाकारांना पाठिंबा देऊन भारतीय प्रजासत्ताकाशी दोन हात करायला तो सिद्ध झाला होता. पण या वेळी त्याचे नशीब सिकंदर नव्हते आणि त्यामुळे भारताच्या कटिप्रदेशातील ही निजामी पोटदुखी पटेलांच्या खंबीर शस्त्रक्रियेने दूर झाली आणि हैद्राबाद संस्थानचा मुलूख महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि म्हैसूर राज्यात समाविष्ट झाला व हैद्राबाद आंध्रप्रदेशाची राजधानी बनले.

या अवधीत मुसीच्या दक्षिणतीरावर महंमद कुलीने उभारलेले ते भागानगर खूपच विस्तारले. मुसीनदीच्या उत्तर तीरावर आणि त्याच्या पलिकडेही खूपच वाढत गेले आणि इतर अनेक नगरांप्रमाणे ते आता मैलोगणती पसरलेले खूपच मोठे शहर बनले आहे. बारा लक्ष एकावन्न हजार लोकांना आता त्याने सामावून घेतले आहे. अनेक शतके राजधानी राहण्याचा मान या शहराला मिळाला असूनही राजधानीचे 'खानदान' या शहरात जाणवत नाही. श्रीमंत

निजामाची रियासत इथे चालू होती तरी निजामशाहीचे आणि प्रजेचे वैभव वाढावे, आर्थिक सुबत्ता निर्माण व्हावी या दृष्टीने निजामाने कधी पाऊल उचलले नाही. त्यामुळे या पुराण्या शहराच्या आसपास कसले कारखाने धडधडले नाहीत आणि वैभवाचा, समृद्धीचा मार्ग सामान्य प्रजेला मोकळा झाला नाही. निजामाचे सरदार मोठे ' जमीनदार ' होते, त्याच्याच सारखे वैभव भोगीत होते, त्यांना सामान्य लोकांची ' कणव ' कशापायी येणार ? नाही म्हणायला कापड, गालिचे, घोड्यावर लादायच्या किनखापी बैठकी, सुती व लोकरी कपडे इथे बनत. काच, साखर, कागद आदि वस्तू बनविणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कारखानेही इथे सजले होते, तरीपण कंजुष निजामामुळे आणि मुसी नदीच्या निर्जल, रेताड पात्रामुळे ' उद्योग ' इथे सजला नाही– ही गोष्ट मान्य करायलाच हवी.

अहो, या श्रीमंत निजामाची श्रीमंती हैद्राबादेत राहो, अगदी खुद्द त्याच्या राजवाड्यांच्या परिसरांतही जाणवत नाही.... खूप मोठ्या व उंच भिंताडाआड ती दडून बसली आहे. टेकडीवर उभारलेला त्याच्या ' फल्कनुमा ' नामक राजवाडा पाहायला गेलात तर मुंबईच्या खोताच्या वाडीतील गल्लीबोळांतून तसल्याच पडक्या, जुन्या इमारतींमधून आपण जात असल्यासारखे वाटते. ह्या अरुंद गल्ल्यांच्या कोपऱ्याकोपऱ्यावर साठलेले उकीरडे चुकविताना तर नाके दम होते. असला दरिद्री श्रीमंत राजा ज्या नगराला मिळाला, त्या नगरात बदलत्या काळाचे नवचैतन्य कसे भरावे ?

आज हैद्राबादेत ज्या वास्तू दिसतात वा स्थापत्य कलेचा जो थोडाफार फुलोरा दिसून येतो तो बराचसा जुन्या काळचा आहे. त्यावर उत्तरेची मोगली छाप दिसून येते. त्यामुळेच हैद्राबादेत जुन्या दिल्लीची आठवण होते; वाराणशी-सारख्या गल्लीबोळांचे चक्रव्यूह पार करायची पाळी येते. पण बहुतेक रस्ते काँक्रीटचे आहेत. काही कांही विभागांतील घरे हारीने मांडली आहेत. त्यांतली फारशी दुमजली आढळणार नाहीत. हुसेनसागराच्या काठावर डोंगरी-पार्श्वभूमीवर बांधलेली बांजरा टेकडीवरील घरे आणि हैद्राबादची लोकवस्ती सांभाळणारी ही घरे यांत मलबारहिल आणि परळ–लालबाग एवढे अंतर आहे.

मुसीच्या दोन्ही काठांवर हैद्राबाद वसले असे वर सांगितले. म्हणजे हैद्राबाद

शहरामधून मुसी वाहाते हे निराळे सांगायला नको. पण इथे हा उल्लेख प्रामुख्याने करायचे कारण असे, की एरवी निर्जल, रेताड असणारी, अजगराप्रमाणे शहराच्या मध्यभागी पसरलेली ही मुसी साधारणतः पावसाळ्यात थोडीशी वाहाते हे खरे, पण १९०८—९ साली या मुसीनेच हैद्राबादचे " पानशेत" केले. त्या साली ही ' मुसी ' आणि ' इसी ' सारख्या तिच्या सख्या या साऱ्यांनीं संगनमत करून निजामशाहीची राजधानी बुडवायचे जणू ठरविले. मुसीचा असा महापूर ना कुणी ऐकला होता की पाहिला होता. शहराच्या दोन्ही बागांना जोडणारे मुसीवरील बहुतेक पूल या जलप्रलयात वाहून गेले. नदीकाठावरील इमारतींची जबरदस्त पडझड झाली. क्रोडो रुपयांचे नुकसान संभवले. हैद्राबादची शान धुऊन निघाली. मुसीच्या महापुराचा एवढा धसका हैद्राबादच्या शासनयंत्रणेला बसला की, त्यांनी कडोनिकडिने के. एम. विश्वेश्वरैय्या या धरणऋषीला तत्काळ पाचारण केले. मुसीने हा असा ' हैदोस ' पुन्हा घालू नये म्हणून तिला ' धरबंध ' घालण्याच्या योजना विश्वेश्वरैय्यांनी आखल्या आणि प्रत्यक्षात आणल्या. त्यामुळे मुसीचा बंदोबस्त तर झालाच, पण हैद्राबाद शहराला एक निराळी रमणीयता प्राप्त झाली.

मुसी व इसी यांना बांधून काढल्यामुळे त्यामागे ' उस्मानसागर ' आणि ' हिमायतसागर ' नामक जे तलाव तयार झाले त्यांनी हैद्राबादची पाण्याची सोय तर पाहिलीच पण शिवाय हैद्राबाद म्हणजे तलावांचे शहर म्हणावे एवढा आगळेपणा त्या शहराच्या व्यक्तिमत्त्वामध्ये उत्पन्न केला.

हैद्राबाद आणि सिकंदराबाद या जुळ्या भावंडांना जोडणारा एक मैल लांबीचा रुंद रस्ता ' हुसेनसागर ' नामक तिसऱ्या तलावाच्या बांधावरून गेला आहे. हैद्राबाद व सिकंदराबाद यांना जुळी भावंडे म्हणणे चूकच. कारण ' जुळी ' एका मातेची असतात. इथे हैद्राबाद उभारले कुतुबशहाने तर सिकंदराबाद ब्रिटिश रेसिडेंटामुळे तयार झाले. शिवाय या जुळ्यांत म्हणण्यासारखे साम्य मुळींच नाही. उलट विषमताच फार आहे. एकाचा दिमाख मोगली आहे तर दुसऱ्याचा रुबाब खास साहेबी ! हुसेन सागराच्या उत्तर दक्षिणांगास ती पसरली आहेत. शहरांच्या मध्यभागी पसरलेल्या ११–१२ मैल परिघाच्या हुसेनसागरामुळे नगराला केवढी चारुता आली आहे ! १५५० साली, जवळजवळ पावणेतीन लक्ष रुपये खर्चून हा तलाव निर्मिणारा इब्राहिम कुतुबशहा

रसिक असावा. असे म्हणतात की, या कुतुबशहाने हुसेनसागर बांधून काढला, पण पहिली चार वर्षे पाण्याचे एक टिपूस त्यात जमा झाले नाही. पण नंतर मुसी नदीला एक ३६ मैली पाट फोडून तो जेव्हा तलावात आणून सोडला तेव्हा शिळासहामीच्या कथेप्रमाणे तलाव एकदम गरगरून भरून आला. जणू मुसी इथली भाग्यविधाती देवताच आहे. तिला डावलून झालेला हा प्रयत्न तिला मान्य झाला नाही! तिची पायधरणी केल्याबरोबर तलाव भरला! हुसेनसागरच्या काठावरील प्रशस्त रस्ता, बागा, नौकाविहाराची सोय करणारे क्लब्ज, बांजरा हिल्सवरील सुबक कोरी घरे, साऱ्याच गोष्टी इतक्या रमणीय आहेत की, माझ्यासारखा माणूस 'सलारजंग म्युझियम'च्या ७४ प्रशस्त खोल्यांची पायपीट करीत ताशा दोन तासांत सारे पाहायची केविलवाणी धावपळ करण्यापेक्षा हूसेनसागरच्या काठावर बसून त्या निवांत जलाशयाचे सान्निध्य उपभोगीत हैदाबादच्या सर्व थरांतील नागरिकांचे निरीक्षण करणे अधिक पसंत करील. दर दहावीस फुटांवर तुम्ही एखाद्या पेन्शनराला अडखळाल. त्यांतला कुणी वडा अधिकारी असतो, कुणी जुना नबाब वा जमीनदार असतो. आपले ते वैभव गेले हे मानायलाच मुळी ही मंडळी तयार नाहीत. त्या मैफली, ती जेवणे ते नाच, त्या पार्ट्या, विसरणे त्यांना शक्य नाही. कुठल्याही पेन्शनरांच्या टोळक्याभोवती रेंगाळलात तर ही सारी बोलणी तुम्हांला ऐकायला मिळतील. निजामाचे राज्य खालसा झाल्याचे दुःख त्याच्यापेक्षा या मंडळींना अधिक!

हैद्राबाद पाहायला येणारा माणूस इथल्या माणसांच्या हृदयाला कान न लावता इथली प्रेक्षणीय स्थळे पाहत सुटतो. 'चारमीनार' त्याला प्रथम आकर्षित करतो. पण चारमीनारभोवती इतकी गिचमिड वस्ती आज भरून राहिली आहे की देखणाऱ्याला चारमीनार नीट पाहताच येत नाही. १५९१ साली चारमीनार उभारला गेला. का? कारण माहीत आहे? त्या साली हैद्राबादमध्ये प्लेगने धुमाकूळ घातला. प्लेग थांबल्यावर त्या आनंदाप्रीत्यर्थ महंमद कुलीने ही 'प्लेगस्मृती' बांधून काढली. १८७ फूट उंचीचे चार मीनार असलेली आणि शंभर फूट लांबी रुंदी असलेली ही इमारत हैद्राबादेतील उत्कृष्ट शिल्पाचा नमुना मानली जाते. पथारघाटी नामक या रस्त्यावर वा आजूबाजूला चारमीनाराप्रमाणे ५० फूट उंचीच्या चार कमानी, 'मक्का मशीद'

नावाची शहारातील प्रमुख मशीद, चौमहल्लानामक, तेहेरानच्या शहाच्या राजवाड्याप्रमाणे दिसणारा राजवाडा इत्यादी वास्तू उभ्या आहेत.

चौमहल्लापासून दोनएकशे यार्ड अंतरावर एका गल्लीत महाराजा चंदूलाल नामक निजामी मंत्र्याची 'बारादरी' नामक इमारत दिसते. या इमारतीचे हिंदू नक्षीकाम त्या मुसलमानी मोहल्ल्यात नजरेत भरल्यावाचून राहत नाही शहराच्या पश्चिम तटाजवळ नवाब तेघ जंग याचा वाडा दृष्टीस पडतो. इथे य साडेसहा फूट उंचीच्या रुबाबदार नवाबाची भली मोठी तलवार व इतर हत्यारे पाहायला सापडतात.

अफझल गेटपासून थोड्या अंतरावर सर सलारजंगनामक निजामी मुख्यमंत्र्याचा वाडा दिसतो. १८५३ ते १८८३ या तीस वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत या रसिक आणि कर्तबगार मुख्यमंत्र्याने हैद्राबादेची शान खूपच वाढविली. सलारजंग यांचा वस्तुसंग्रह इतका मोठा, वैविध्यपूर्ण आणि मौल्यवान आहे की, आशियातील नव्हे जगातील प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयांत सलारजंग म्युझियमची गणना होते. वस्तूंची योग्य तशी वर्गवारी आणि चांगल्या मार्गदर्शकांची जोड जर मिळाली तर हा म्युझियम 'अजबखाना' न वाटता म्युझियम वाटू लागेल असे मला तो पाहताना जाणवले.

शहराच्या ईशान्य अंगास असफझा निजाम-उल-मुल्कने बांधलेली 'पुराणी हवेली' दिसते. तिथे जवळच महंमद कुलीने उभारलेला 'दरुस शाफा' म्हणजे रुग्णालय म्हणून उभारलेली इमारत दृष्टीस पडते. हैद्राबादचे उस्मानिया विद्यापीठ पूर्वी अफझल गेटजवळ होते. पण आता ते तिथून सहा मैलावर 'अडिकमेट' या ठिकाणी गेले आहे. १५०० एकरांच्या परिसरात उभारलेल्या विद्यापीठाच्या विविध इमारती पाहून सध्याच्या निजामाने आपल्या अमदानीत एवढे तरी पुण्यकर्म केल्याची जाणीव होते.

मुसी नदीवरचा पूर्वेकडचा ओलिफांट पूल ओलांडून चदरघाट नामक उपनगरात गेल्यावर पाहायला मिळते ती पूर्वीच्या ब्रिटिश रेसिडेन्सीची इमारत व तिच्या सभोवती खूप जुन्या वृक्षांनी सुशोभित केलेली बाग.त्यांतल्या एका झाडाचा परिघ आहे ३० फूट. प्रचंड असे चिंचेचे झाड पाहायचे असेल तर ते इथे पाहायला मिळते. एक मोहाचे झाड तर या चिंचेपेक्षाही प्रचंड आहे. याच उपनगरात पसरला आहे सुल्तान बझार. मराठी माणसाला या लोकवस्तीचे कौतुक

विशेष, कारण हैद्राबादची सारी महाराष्ट्रीय माणसे इथे राहतात. या भागातून फिरताना आपण महाराष्ट्रातच असल्यासारखे वाटते. सिकंदराबादच्या काही भागांतून फिरताना ज्याप्रमाणे आपण तामिळनाडमध्ये आहोत की आंध्र प्रदेशातून भटकत आहोत की गुजरातमधल्या कुठल्या शहरात वावरत आहोत असे पाहणाऱ्याला वाटते, किंवा हैद्राबादच्या इतर काही भागांतून फिरताच आपण आग्र्याच्या वा अलिगडच्या मोहल्ल्यातून फिरल्यासारखे वाटते. तद्वत् सुलतानबझार म्हणजे मराठी मुलूख. हैद्राबादेचे विविध भाग अशा विविध लोकवस्त्यांकरिता प्रसिद्धच आहेत. 'चिक्कडपल्ली' म्हटले की आंध्र वस्ती 'जीरा' म्हटले की गुजराथी विभाग. जेम्स स्ट्रीट पारशांची तर लालगुडा भाग गावठी साहेबांचा. प्रत्येकाने त्या त्या भागात आपले निराळे राज्य मांडले आहे. भारतातील दुसऱ्या कुठल्याही शहरात आपल्याला असे आढळत नाही. तामिळ, तेलगू, पंजाबी, मराठी, इंग्रजी, उर्दू कुठल्याही भागाचे हैद्राबादला वावडे नाही.

सुलतानबझारमध्ये 'पेस्तंजीची कोठी' नामक एक बडी इमारत आहे. सन १८३९ ते १८४५ या ७ वर्षांत वऱ्हाडचा जमीनमहसूल वसूल करणाऱ्य 'पेस्तंजी ॲन्ड् को.' नामक पतपेढीची ही स्मृती! सध्या निजाम राहतो ती 'किंग कोठी' सुल्तानबझाराच्या जवळच आहे. पण त्या राजवाड्याची द्वारे सर्वांना खुली नाहीत.

पण वर उल्लेखिलेला 'फल्कनुमा' राजवाडा फार सुंदर आहे. त्या राजवाड्याकडे जाताना गल्ल्यांचा चक्रव्यूह पार करावा लागत असला तरी शहराच्या नैर्ऋत्य टोकाच्या टेकडीवर सर विकार – उल् – उमारा नामक निजामी मंत्र्याने बांधलेला व १८९७ साली निजामाने विकत घेतलेला हा राजवाडा रेखीव आहे. त्याच्या वरच्या मजल्यावरून साऱ्या हैद्राबाद शहराचे विहंगम दृश्य मोठे सुरेख दिसते. फल्कनुमा राजवाडा म्हणजे निजामचे 'गेस्ट हाउस'च आहे. स्वतः अगदी कंजुषी राहणारा निजाम पाहुण्यांची आणि विशेषतः गोऱ्या पाहुण्यांची बडदास्त किती उत्तम ठेवीत असे याची कल्पना राजवाड्यातील व्यवस्था, फर्निचर, खोल्यांची मांडणी यावरून करता येते. राजवाड्याच्या गवाक्षातून एका बाजूला 'मरिजुम्ला' तलाव दिसतो तर दुसऱ्या बाजूलाही 'मीरआलम' तलाव आपले लक्ष वेधतो.

हैद्राबादच्या ब्राड गेज रेल्वे स्टेशनाच्या उत्तरेला 'नम्पल्ली गार्डन' नावाची

जी प्रशस्त बाग आहे त्या बागेत काही दुर्मिळ वनस्पती जशा जोपासल्या आहेत तद्वत् दुर्मिळ पुराणवस्तूंचा सुंदर संग्रहही तिथे केला आहे. या बागेच्या उत्तरेला 'काळा पहाड' म्हणून जे ठिकाण आहे तिथून मोगल बादशहाचे सारे हुकूम दवंडी पिटून जाहीर करण्याची पूर्वकाळीं पद्धत होती. त्यामुळे काळ्या पहाडाला 'नौबत पहाड' असेही म्हणतात. जवळच आहे फासे मैदान. तिथे हैद्राबादचा रेसकोर्स आहे, पोलो ग्राऊंड आहे आणि क्रिकेट ग्राऊंडही आहे.

सिकंदराबाद म्हणजे हैद्राबादचे कॅन्टोन्मेंट म्हणून बांधलेला भाग. पण आज त्यानेच एवढे मोठे स्वरूप घेतले आहे की, सिकंदराबादेला आपण निराळी नगरी मानू लागलो आहोत. हुसेनसागराच्या पश्चिम काठच्या प्रशस्त रस्त्याने उत्तरेला जायचे. हैद्राबादच्या अधिकारी लोकांची खैराताबाद नामक लोकवस्ती पार करून बिदरकडे जाणारा रस्ता सोडून नबाब फक्र-उल्-मुल्कचा टेकडीवरील राजवाडा डाव्या अंगाला टाकून सरळ उत्तर दिशा धरायची, वाटेत निजामाची वेधशाळा लागते, वाडी-हैद्राबाद रेल्वे रस्ता लागतो, तो ओलांडायचा आणि पूर्व दिशा धरायची हा रस्ता आपल्याला सिकंदराबादेत पोचवितो. चिल्कल-गुडा, बॉवेनपल्ली, बेगमपेठ, त्रिमलगिरी, बोलारम, लालगुडा, या सिकंदराबादच्या विविध लोकवस्त्या. इतर अनेक शहरांतील कॅन्टॉन्मेन्ट्स्प्रमाणेच रुंद, आखीव रस्ते, नेटक्या इमारती, स्वच्छता, टापटीप, ही सिकंदराबादेची वैशिष्ट्ये. बेगमपेठ, विमानतळाकरता आणि बोलारमचा पूर्वीचा ब्रिटिश रेसिडेंटाचा वाडा, निळा महाल, आपल्या राष्ट्रपतींचा पावसाळीं निवास वा दक्षिणेतील राष्ट्रपतिभवन म्हणून प्रसिद्ध आहे.

हैद्राबाद अशा विविधतेने नटलेले शहर आहे. त्या विविधतेत एकात्मकता जाणवत नाही, कारण ती तशी निर्माण व्हावी असे एखादे संकट या लांबवर पसरलेल्या शहरावर अलीकडच्या काळात कोसळले नाही. हैद्राबादच्या झोपड-पट्ट्या, फेरीवाले, रिक्शावाले, आपल्याच नशेत असणारे जवान, आपापली वारुळे उभारून धंदाउदीम करणारे परप्रांतीय लोक, विविध वस्तूंची भांडारे, गलिच्छ गल्ल्या, भरगच्च बाजार, खैरताबाद, बांजराहिल्ससारख्या श्रीमंत वसाहती, चारमीनार, मक्का मशीद, हायकोर्ट, हॉस्पिटल्स, सार्वजनिक वाच-नालये या साऱ्या गोष्टींत निजामाच्या राजवाड्यांचा तो अलिप्तपणा सूक्ष्मपणे वावरतांना जाणवतो.

महंमद कुली कुतुबशहाने आपली प्रिय राणी भागमती हिच्या नावाने बांधलेले हे भागानगर वा भागनगर खरे भागा-नगरच आहे याची दखल घेऊनच यात्रिक ते शहर सोडतो.



# उद्योगराजधानी बंगलोर

म्हैसूर राज्याची राजधानी असलेल्या बंगलोर शहराविषयी लिहायला कागद पुढे ओढला आणि मनाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. " अरे, या या शहराविषयी लिहायचे खरे. पण इथे इतिहास काय घडला ? डोळ्यांना दिपविणाऱ्या मनाला क्षणभर बेचैन करणाऱ्या ऐतिहासिक वास्तू इथे कुठे आहेत ? ज्यांची उंच दिव्य, अन् भव्य शान पाहून आपले खुजेपण जाणवावे, ज्यांची आजची भग्नावस्था पाहून लक्ष्मीचे आणि राजवैभवाचे चंचलत्व प्रतीत व्हावे आणि अखेर शेवटी मानवाच्या साऱ्या गोष्टी म्हणजे वाळूतील किल्लेच आहेत हे पटावे, अशा गतकाळाच्या खुणा इथे कुठे दिसताहेत ? आपल्या हातीं हुकमाचा एक्काच नाही ! "

नाही म्हणायला एका किल्लेवजा गढीतील टिपू सुलतानच्या राजवाड्याचे अवशेष आणि ' मागडी केम्पेगौडा ' नामक या भागाच्या पाळेगाराने उभारलेले ' इथे बंगलोर संपते ' असे दर्शविणारे छोटे मनोरे याच काय त्या ऐतिहासिक वास्तू इथे दिसतात. पण त्यांना काही कुणी प्राचीन म्हणणार नाही. कारण टिपूचा इतिहास तर तसा परवापरवा घडलेला आहे.

पण म्हणूनच बंगलोरला एक निराळे महत्त्व आहे. अगदी नजीकच्या काळातच हे शहर उदयाला आले आणि अगदी निराळ्या कारणामुळे भरभरा-

टीलाही आले. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स', 'टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट', म्हैसूर विधानसभेत गाजलेला 'विधान सौध' आदि डोळ्यांत भरण्यासारख्या इथल्या साऱ्या वास्तू नजीकच्या भूतकाळात उभारल्या गेल्या, पण त्यांचे नाते या देशाच्या वर्तमानाशी आणि भविष्यकाळाशीच अधिक आहे. त्यामुळे बंगलोरी नागरिकाला वैभवशील भूतकाळाचा अभिमानाने उल्लेख करता येत नसला तरी वैभवशील वर्तमानभविष्यासंबधी तो मान ताठ करून बोलू शकतो.

त्यामुळेच भूतकाळाचा ठसा या शहरावरही नाही आणि जनमनावरही नाही. खऱ्या अर्थाने कुणा राजाची राजधानी होण्याचा प्रसंग बंगलोरवर आलाच नाही. बंगलोर या नावाचा शब्दशः अर्थ 'टाऊन ऑफ बेंगलू' म्हणजे एका प्रकारच्या घेवड्याकरीता या गावाची प्रसिद्धी असावी. घेवड्याकरिता प्रसिद्ध असलेल्या या गावचे लोक 'बोलघेवडे' नसते तरच नवल! त्यामुळे या शहरात 'लोकशाहीचा विकास' अगदी कळसाला पोचला आहे. म्हैसूरसारखे राजधानी असलेले शहर जवळच असल्याने दरबारी लांगूलचालन न करताही दरबारी रीतीरिवाजाची माहिती मात्र बंगलोरकरांना झाली. म्हैसुरी पगडी, पुण्याच्यापगडीसारखी भारतभर गाजलेली! या म्हैसुरी पगडीची खरी शान बंगलोरकरांनी सांभाळली असा त्यांचा दावा आहे.

समुद्रसपाटीपासून तीन हजार फुटांची उंची या शहराला निसर्गाने बहाल केली आहे. त्यामुळे बंगलोर थंड हवेकरिता प्रसिद्ध आहे. त्यामुळे भारतातील कुठल्याही संस्था आपल्या 'कॉन्फरन्सेस' बंगलोरला घ्यायला उत्सुक असतात. भर उन्हाळ्यात, अगदी मे महिन्यातही बंगलोरचे उष्णतामान ९५ फॅरनहाईटची मर्यादा उल्लंघून जात नाही. पण या एवढ्या उष्म्यानेच बंगलोरी अैय्या, हशहुश करून घरातले विजेचे पंखे चोवीस तास चालवीत सुटतो! कुठल्याशा परीकथेतील त्या राजकन्येला परांच्या सात गाद्यांखाली असलेल्या वाटाण्यामुळे रात्रभर झोप लागली नाही, तद्वत् या एवढ्या उष्म्यानेही बंगलोरी माणूस कोमजतो! त्याला जर सांगितले की, 'बाबा, दिल्लीला या क्षणी ११८ उष्णतामान आहे. तिथे लोक कसे राहत असतील?' यावर तो म्हणेल, 'राहोत बापडे आपल्याला तर हीच उष्णता जाळून टाकीत आहे?' पण यात त्याचा काही दोष नाही. निसर्गच जर बंगलोरचे असे लाड करीत असेल तर त्याबद्दल बंगलोरी माणसाला नावे ठेवण्यात काय हशील आहे.

बंगलोरी अतिथ्यशीलता वाखाणण्यासारखी आहे. अगदी अनोळख्या माणसालाही त्याचा प्रत्यय येऊ शकतो. त्यामुळे उन्हाळ्यात, पुण्याप्रमाणेच बंगलोरात घरच्यापेक्षा दारच्या पाहुण्यांचीच संख्या अधिक होते! कदाचित या अतिथ्यशीलतेपोटीच कानडी राज्याच्या या राजधानीत तामीळ, तेलगु, हिंदी मराठी आदि विविध भाषा बोलणाऱ्यांची संख्या कन्नडिगांपेक्षा जास्त आहे!

उत्तरेस म्हैसूरच्या महाराजांच्या राजवाड्यापासून दक्षिणेस 'कोरामंगल' तलावापर्यंत आणि पश्चिमेच्या पेट्टा नामक मूळ गावठाणापासून पूर्वेच्या सॅपर्स प्रॅक्टिसिंग ग्राऊंडपर्यंतच्या २५ चौरस मैलांच्या परिसरांत बंगलोर आणि बंगलोर कॅन्टोन्मेंट पसरले आहे. शहरात दोन रेल्वेस्टेशने आहेत. विमानतळ आहे. त्यामुळे रेल्वे व हवाई वाहतुकीचे बंगलोर केंद्र बनले आहे.

बंगलोर शहरांतील, ॲव्हिन्यू रोड व चिकपेट या नावांनी ओळखले जाणारे गल्लीबोळांचे जाळे म्हणजे इथली बाजारपेठ. शहराच्या सगळ्या व्यापारी उलाढाली इथे पार पडतात. हिऱ्यामोत्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांपासून तर पान, बिडी, काडीपर्यंत काय वाटेल ती वस्तू या बाजारात मिळू शकते.

बंगलोरचा हा भाग एके काळी वस्तूच्या व्यापारापेक्षा ज्ञान व संस्कृतीच्या व्यापाराकरिता प्रसिद्ध होता. टिपूच्या किल्ल्याजवळ त्या वेळी एक संस्कृत विद्यामंदिर होते. कर्नाटकी विद्वानांची ती ज्ञानपेठ होती. "फोडिले भांडार धन्याचा हा माल" ही वृत्ती बाळगून कन्नडिग पंडित तिथे ज्ञानदान करीत. निरपेक्ष बुद्धीने होणारी ती देववेव होती. कर्नाटकी संगीत म्हणजे खऱ्या अर्थी भारतीय क्लासिकल संगीत. ती सूरसाधना करणारे ही वरील विद्यामंदिरात आपल्या बैठकी रंगवीत. सप्तसुरांच्या उसळलेल्या गर्दीत क्षितिजावर उसळलेल्या सहारंगांच्या पहाटेचे भान बंगलोरी रसिकांना राहत नसे. म्हैसूरच्या जाणकार महाराजांपुढे हजेरी लावायला जाणारे कलावंत त्या राजाश्रयापेक्षा बंगलोरच्या लोकाश्रयाला जास्त महत्त्व देत. गायक, नर्तकी, नट, तंतकार, पंडित यांची बूज बंगलोर राखी. कलेची 'दाद' देताना बंगलोरने कधी कंजुषी केली नाही. आजही चिकपेट तीच आहे. पण बंगलोरी रसिक आता बंगलोरी उपनगरात पसरले आहेत. त्यामुळे रसिकांच्या मागोमाग सांस्कृतिक चळवळ तिकडे गेली तर नवल नव्हे.

पूर्वीची उपनगरेही आता उपनगरे राहिली नाहीत. वाढता वाढता बंगलोर

त्या उपनगरापलीकडेही खूपच पसरले आहे. पण बसवगुंडीकडे नेणारा तो राजरस्ता अजूनही झाडांच्या गर्द राईतून आपली वाट काढतो आणि बसवगुंडीमधील कित्येक घरांसभोवती जोपासलेल्या बागा अजूनही बंगलोरचे रसिक मन दाखवितात. चुना, विटा आणि सिमेंट यांनी घडलेली नवी संस्कृती, त्या बागातील फुलवेली आणि झाडावरच परिणाम करू शकली. सुगंधाऐवजी सुरंगाला अवाजवी महत्त्व देऊन बसली पण बंगलोरी मंडळींचे चाफ्यावरील प्रेम अजून शाबूत आहे. चाफा बोलतोही आणि खंत करण्यासारखे कारण बंगलोरी मंडळींनी त्याला अजून दिलेले नाही! बसवंगुडी म्हटले की म्हैसूरच्या चामुंडेश्वरी टेकडीवरील प्रचंड नंदीच्या जोडीचा दुसरा नंदी इथे आहे, याची प्रवाशाला आठवण होते. नंदीचे देऊळ असे मीही तिथेच पाहिले. पण बसवंगुडीचे मंदिरे आणि हा नंदी एवढेच काही महत्त्व नव्हे. बसवंगुडी आणि मल्लेश्वरम् ही उपनगरे बंगलोरच्या नृत्यनाट्य आणि संगीत या त्रिविध कलांची माहेरघरे आहेत.

बंगलोर शहराचा दुसरा अर्धा भाग म्हणजे कॅन्टोन्मेंट. म्हैसूरच्या महाराजांशी झालेल्या करारानुसार हा भाग म्हणजे ब्रिटिशांची मिरासदारी म्हणून ओळखला जाई. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी तिथे आपले इंग्लंडच स्थापिले होते. खिस्ती प्रार्थनालये पाश्चात्य खेळांची मैदाने, नव्या धर्तीची बाजारपेठ, गुत्ते (त्याला बार्स म्हणायचे!) नाचण्याचे क्लब्ज, पार्कसारख्या बागा, वस्तुवर संग्रहालये आदि साऱ्या गोष्टी त्यांनी तिथे निर्माण केल्या. कॅन्टोमेंन्ट म्हणजे एक निराळे नगर. त्याचा बंगलोर शहराशी तसा काही संबंध नव्हता. उच्चभ्रू भारतीयही त्या भागात राहत. पण ती मंडळी पुरी आंग्लाळलेली होती. चिकपेट आदि शहरीभागात पायधूळ झाडणे म्हणजेही पाप केल्यासारखे मानणारी होती. बंगलोर शहरातील खानदान मंडळींही कधी कधी कॅन्टोनन्मेंटमध्ये जायची. साऊथ परेड वा कमर्शिमल स्ट्रीट वरील दुकानांशिवाय आपल्याला हवे ते कपडे मिळायचे नाहीत असे मानणारी ही श्रीमंत मंडळी. कुणाला तिथल्या क्लबांचे आकर्षण असे, कुणाला सिनेमागृहांचे असे तर कुणाला साऊथ परेडवरील बारमध्ये चोरून दारू प्यायची असे! पण ही अपवादात्मक मंडळी सोडली तर शहरातील सामान्य माणसाला कॅन्टॉन्मेन्टबद्दल आत्मीयता वाटत नसे, हे मात्र खरे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ब्रिटिशांची भारतातूनच उचलबांगडी झाल्याने त्यांची इथली मिरासदारीही संपली. आता बंगलोर म्हणजे दोन शहरे राहिली नाहीत. व्यापार उद्योगामुळे, सामाजिक ऋणानुबंधांमुळे बंगलोरी माणसाला कॅन्टोन्मेन्ट बद्दल वाटणारा दुरावा आता संपला आहे.

केम्पेगौडा नामक ज्या कर्नाटकी पाळेगाराने १५३७ साली बंगलोर नव्हे 'बेंगळूर' (मूळ बेंदेकाळूरू) वसविले त्याने गावाच्या वाढीच्या मर्यादा चार मनोऱ्यांनी दर्शविल्या होत्या. ते चार मनोरे म्हणजे भविष्यलेखच होते. आज बंगलोर त्या मनोऱ्यांच्या सर्व बाजूंना पसरले आहे आणि त्या पसाऱ्याखाली हरवले आहे. काही वर्षांपूर्वी काही मैल दूर असलेली खेडी आज शहराच्या पंखाखाली आहेत. जुन्या फळबागांच्या जागी आता घरे लगडली आहेत. जुनी 'विल्सन गार्डन' आता 'गार्डनच' राहिली नाही. तिचा 'धोबीतलाव' झाला आहे. आजूबाजूच्या टेकड्यांवरील मंदिरे अजून उभी आहेत, पण त्या टेकड्यांचे 'हरिततृणांच्या मखमली'चे उगले आता चुन्याविटांनी आणि सीमेंटाने हिरावून घेतले आहेत. जुन्या आमराया, नारळींच्या बागा व खुली मैदाने हळूहळू नाहीशी होत आहेत. कापड, लोकर, रेशीम, कमावलेली चामडी, तंबाखू यापासून निरनिराळ्या वस्तू बनविणाऱ्या कारखान्यांप्रमाणे बंगलोरच्या परिसरात विमाने, यंत्रसाधने, विद्युतसाधने, दूरवाणीसंच निर्मिणारे सरकारी कारखाने आता रुजले आहेत. त्यांनी बंगलोरला ऐहिक संपत्ती आणि वैभव प्राप्त करून दिले.

पण इतके औद्योगीकरण होऊनही, बंगलोरची भौगोलिक परिस्थितीच अशी अनुकूल आहे, की आपली ग्रामीण शान पुष्कळशी टिकवूनही औद्योगीकरणाला मोकळी वाट करून देणे बंगलोरला शक्य झाले. यामुळे बंगलोरचा पसारा इतका वाढला की, दिल्लीप्रमाणेच महाभयंकर पायपिटी वा चाकपिटी करायला लागणारे १२ – १३ लाख वस्तींचे ते शहर बनले आहे. पण दिल्ली, कलकत्ता व मद्रास शहराशी तुलना करता इथले रहदारी नियंत्रण कितीतरी उत्कृष्ट आहे. बंगलोरच्या प्रशस्त डांबरी रस्त्याचौकांतून धावणाऱ्या बसेस व वाहतुकीतील त्यांची कार्यक्षमता वाखणण्याजोगी आहे. बंगलोरची आजची सुव्यवस्था, आखणी, रस्तेबांधणी इतकी नीटस आणि सुबक बनविली सर मिर्झा इस्माइल यांनी. ते म्हैसूरचे दिवाण असताना बंगलोर आणि म्हैसूर या दोन्ही शहरांना

आगळेच सौंदर्य त्यांनी प्राप्त करून दिले.

शहराच्या वायव्य भागात म्हैसूरच्या महाराजांचा राजवाडा आहे. तिथून दोन मैलावर ' टाटा इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी ' नामक विज्ञान संशोधक संस्था उभी असून बंगलोरचा तो गर्वबिंदू म्हणावा लागेल. प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. सी. व्ही. रामन् यांची प्रयोगशाळाही जवळच उभी आहे. कॅन्टो-न्मेंटच्या पूर्वसीमेवर ' उलसूर ' नामक एक मोठा तलाव आहे. या तलावातील बेटावर ' केन्सिंग्टन पार्क ' नावाची बाग ब्रिटिश अमदानीत उभी राहिली. नौकाविहार करावयाची लहर आली तर बंगलोरच्या यात्रिकाला तिथे जायला हवे.

कॅन्टोन्मेंटमधील ' कब्बन पार्क ' हा भागही अतिसुंदर आहे. आज तिथे सार्वजनिक ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय आणि काही सरकारी कार्यालयांबरोबर चैत्यधर्तीच्या कमानी, मोगली पद्धतीचे घुमट आणि बुद्धकालीन अशोक-चिन्हांकीत सिंह आदि भारतीय स्थापत्यपद्धतीचा मागोवा घेत, अनेक अडचणींना आणि प्रखर विरोधाला तोंड देत, म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. हनुमन्तैय्या यांनी बांधून काढलेला विधानसौदही उभा आहे. या शतकात दिल्लीतील राष्ट्रपतिभवनानंतर एवढे मोठे सुंदर आणि भव्य बांधकाम या देशात कुठेच झाले नाही असे जाणकार म्हणतात.

मुंबईची लालबाग नुसती नावाचीच. बंगोलरची लालबाग म्हणजे या शहराचा दुसरा गर्वबिंदू आहे. बंगलोरातील ही वनस्पतीबाग हैदरअल्लीने निर्माण केली. हैदर व त्याचा मुलगा टिपू यांचे फ्रेंचांशी जे संधान होते त्याचा उपयोग करून फ्रेंच तज्ज्ञांकडून या बागेची आखणी झाली आणि बागेत उष्ण-कटिबंधातील आणि समशीतोष्ण कटिबंधातील अनेक वनस्पतींची जोपासना करण्यात आली. वर उल्लेखिलेल्या मागडी केम्पेगौडाने उभारलेल्या मनोऱ्या पैकी एक लालबागेजवळ आहे. बंगलोरच्या ओद्योगीकरणाने या लालबागेची शान कमी न होता वाढली. दर रविवारी वा सुटीच्या दिवशी कितीतरी बंगलोरी कुटुंबे या विस्तीर्ण उद्यानाच्या गवतीमैदानात सहलीसाठी जातात. बागेच्या आजूबाजूला मोटारसारख्या वाहनांना बंदी करून शांततामय पट्टा निर्माण कर-ण्यात बंगलोर नगरपालिकेने फार मोठे औचित्य साधले आहे आणि रसिकताही प्रकट केली आहे.

बंगलोरला पूर्वी प्लेग मधूनमधून भेटी द्यायचा त्यामुळे लालबाग, माल्लेश्वरम् ,

राजाजीनगर आणि कम्पाम्बुधी तलाव या चार ठिकाणी केम्पेगौडाने उभारलेले चार मनोरे ( त्यांतले दोन आता पडले आहेत ) उल्लंघून बंगलोरच्या आजूबाजूला वसाहती निर्माण झाल्या. अलीकडच्या काळात इतर अनेक उद्योगांबरोबर सरकारी अर्थक्षेत्रातील ' हिंदुस्थान मशीन टूल्स् ', ' भारत इलेक्ट्रॉनिक्स् ', ' हिंदुस्थान एअर क्रॅफ्टस ', ' इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज् ' या नावाचे चार महाउद्योग बंगलोरच्या परिसरात उभारल्याने बंगलोर भरमसाट वाढले; आकाराने कीर्तीने आणि प्रतिष्ठेनेही. हे सारे कारखाने म्हणजे भारत सरकारचे ' शो पीसेस् ' आहेत. त्यामुळे सर्व परदेशी भारतयात्री बंगलोरला भेट देतातच. बंगलोरातील जयनगर वसाहतीतील ' मेन्टल रिसर्च इन्स्टिटयूट ' आणि दुसऱ्या एका भागातील ' सेन्ट्रल डेअरी रिचर्स इन्न्स्टिटयूट ' या भारतातील अग्रगण्य संशोधन संस्था आहेत.

बंगलोरी नागरिक आतिथ्यशील व शांतताप्रिय आहेत. त्यामुळे तुम्ही कधी बंगलोरातील दंगलीबद्दल अगर दंग्याबद्दल वाचले नसेल. ही माणसे उत्सवप्रियही आहेत आणि मराठी सोडून इतर दक्षिणी मंडळींप्रमाणे धर्मपरायणही आहेत. बंगलोरातील मंदिरांची सुस्थिती पाहून हे जाणवते. चिकपेटजवळ धर्मराजाचे मंदिर आहे. ' तिगळरू ' जातीच्या लोकांचा धर्मराजावर फार जीव. प्रतिवर्षी चैत्री पौर्णिमेला ते त्याचा मोठा उत्सव करतात. ' करगा ' या नावाने तो प्रसिद्ध आहे. त्यात बृहन्नडेच्या रूपातील अर्जुनाच्या डोक्यावर सात सुशोभित मडक्यांची उतरंड देऊन त्याची गावभर मिरवणूक काढण्यात येते.

बंगलोरच्या आरोग्यदायक हवेमुळे पुण्याप्रमाणेच निवृत्त मंडळींचा बंगलोरात स्थायिक होण्याकडे कल दिसतो. भारतरत्न सर मोक्षगुंडम् विश्वेश्वैरय्या, डॉ. सी. व्ही. रामन्, सुप्रसिद्ध सिनेनटी देविकाराणी यांचे रशियन चित्रकार पती श्री. रोरिच अशा मोठ्या नावांनी अशा लोकांची यादी करता येईल.

जाता जाता एक दंतकथा सांगायचा मोह मला आवरत नाही. ही दंतकथा आहे बंगलोरच्या उत्पत्तीसंबंधी. वर उल्लेखिलेला मागडी केम्पेगौडा हा या भागातील 'गौडा' म्हणजे राजा होता. एकदा तो घोड्यावर बसून आपल्या राज्याची हालचाल पाहायला निघाला असता एका छोट्या खेड्यात पोहोचला. चाळीस मैलांच्या रपेटीमुळे त्याला फार भूक लागली. गावातील समोर दिसले त्या घरी तो थांबला. तिथे एक म्हातारी राहात होती. गौडा म्हातारीला हाक

मारून म्हणाला,

" मला फार भूक लागली आहे अम्मा, काहीतरी खायला द्या." त्याचा राजवेश पाहून त्याला ओळखून, डोळ्यांत पाणी आणून म्हातारी म्हणाली,

"बाबा, तू या देशाचा गौड. भुकेला होऊन माझ्या दारी आलास, पण तुला या माझ्या गाडग्यामडक्यांत काही नाही रे!"

" असे म्हणू नको. जे काय असेल ते दे."

" नुसती शिजवलेली घेवड्याची डाळ आहे चालेल ?"


" चालेल."

म्हातारीने त्याला घरात बोलाविले. पाट मांडून पान घेतले. आणि त्यात शिजवलेली डाळ वाढली. विदुराघरच्या कण्यांच्या चवीने गौडाने ते भोजन केले. तृप्त होऊन तो म्हातारीला म्हणाला,

" तुझे हे गाव गरीब राहू देणार नाही मी अम्मा, इथे मी माझी राजधानी आणतो. शिजवलेली डाळ वाढून तू या प्रदेशाच्या गौड्याला तृप्त केलेस. म्हणून या नवीन नगरीचे नांव ' बेंदेकाळुरू ' म्हणजे शिजविलेली डाळ असे राहील."

केम्पेगौडाने आपले वचन खरे केले. ' बेंदेकाळुरू ' बांधून काढले. तिथे आपला किल्ला बांधला. आपली राजधानी तिथे आणली.

या ' बेंदेकाळुरू ' चेच अपभ्रष्ट रूप ' बेंगळूर. ' ब्रिटिशांनी त्याला ' बंगलोर ' बनविले.



# मद्रासपटनम् मद्रास

मद्रास म्हटल्याबरोबर डोळ्यांपुढे उभा राहतो मद्रासी. कितीही सुधारला, ब्रिटिश संस्कृतीत रुळला तरी आपली लुंगी न सोडणारा, गंध, टिळे, माळा यांना जपणारा, पृथ्वीच्या पाठीवर कुठेही गेला तरी आपला धर्म टिकवून धरणारा मद्रासी! नव्या सुधारणा आत्मसात् करूनही स्वतःची संस्कृती राखणारा; जाईल तिथे आपले ' वारुळ ' उभे करणारा मद्रासी! मद्रास म्हटल्याबरोबर लुंगी, इडली, सांभार, रसम् , डोसा या वस्तू , पार्थसारथी, व्यंकटरमण, कपालीश्वर अशी मालगाडीच्या डब्यासारखी नावे असणारे देव, भारतनाट्यम् , कथाकली आदि नृत्यप्रकार, कर्नाटकी संगीतातील ललकाऱ्या, दागिन्यांच्या संभाराखाली जडसौंदर्यवती पुरंध्रीप्रमाणे भासणारी मंदिराची गोपुरे, भडक रेशमी वस्त्राव-गुंठित देह असणाऱ्या सुकेशा कृष्णरमणी अशा कितीतरी गोष्टी सरमिसळ होऊन डोळ्यांत भरतात. दक्षिण भारताच्या ' गोपुरी ' संस्कृतीचे ' महागोपुर ' म्हणून जग मद्रासला ओळखते. तमीळ, तेलगु, मल्याळम् , कानडी इत्यादी विविध भाषा बोलणाऱ्या विविधपंथी, विविधधर्मी दाक्षिणात्य मंडळींना ' मद्रासी ' या सामान्य नामाने आम्ही परप्रांतीय ओळखतो. त्यांच्यातील शैव-वैष्णवी भिंती, वेदान्तदर्शनावरून त्यांच्यामध्ये पडलेले भेद वा भाषाभगि-नींच्या संघर्षातून निर्माण झालेले तिथले संघर्ष या साऱ्या गोष्टी आम्हाला

माहित नसतात. आर्यांच्या भारतविजयापूर्वी या देशात दृढ झालेली द्राविड संस्कृती. पण आर्यांची संस्कृत भाषा तिला परकी असल्यामुळे आर्यांनी या मंडळींना ' असंस्कृत ' ठरवून त्यांना संस्कृतीच नाही, असा डांगोरा पिटला. पुढे आर्यांनाच द्राविडबंधूंशी जमवून घ्यावे लागले. आद्य शंकराचार्यांनी प्रसृत केलेल्या पंचायतनी महापूजेच्या प्रकारात हा संस्कृतिसंगम करण्याचा प्रयत्न जरूर दिसतो. पण तो उत्तर-दक्षिण वाद अजूनही संपला आहे असे नाही.

मद्रास म्हटल्याबरोबर एवढा हा सारा प्रपंच उभा करण्याचे कारण मद्रास म्हणजे या साऱ्या संघर्षांचे, संस्कृतीचे मूळपीठ आहे, फार प्राचीन शहर आहे असे सामान्यपणे आपल्याला वाटते. माझा एक मित्र तर एक दिवस मला म्हणाला, " पांडवांची माता ' माद्री ' ही मद्रदेशाची राजकन्या होती. आणि तो मद्र देश म्हणजे आजचे मद्रास वा ' तमिळनाडू ' नावाचे राज्य. " भारतीय एकात्मता साधण्याच्या दृष्टीने भारतीय राजेमंडळी विविध राज्यांतून स्त्रीरत्ने जमवीत, हे मला मान्य. पण माद्री मद्र देशाची आणि मद्रास राज्य हाच तो मद्रदेश यातला तर्क माझ्या लक्षात येईना. कारण आजचे मद्रास शहर हे इतके प्राचीन नाही; गेल्या तीन चारशे वर्षांत वसलेले ते शहर आहे, हे मला माहीत होते. मी माझ्या मित्राला सांगितले,

" गृहस्था, या तुझ्या तर्कटाला काही विशेष अर्थ आहे असे मला वाटत नाही. प्राचीन काळी राहो, पण इतिहासकाळात हा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्याखाली वा अर्काटच्या नबाबाच्या अमलाखाली असताना मद्रास शहर अस्तित्वात नव्हते. आज मद्रासमध्ये अंतर्भूत होत असलेले मैलापूर, ट्रिप्लिकेन यांसारखे कित्येक भाग म्हणजे छोटी छोटी नगरे होती. आज ' अडयार ' आणि ' कूम ' या दोन खाड्यांच्या दुआबात आणि दोहो बाजूंला ५० चौरस मैलांपेक्षा अधिक भागात पसरलेले मद्रास शहर त्या काळी कुणाच्या स्वप्नीही नव्हते. इतिहास काळात पूर्वेकडील देशात नशीब काढण्याकरिता आणि साम्राज्य स्थापण्याकरिता व्यापारी वा धार्मिकी मिषाने जी पाश्चिमात्य मंडळी या देशात आली, त्यांत पोर्तुगीज लोक अग्रेसर होते हे आपल्याला माहीत आहे. मद्रासच्या दक्षिण भागात, किनाऱ्यावर सॅनेथोम नामक जे प्रार्थनालय आहे, ते आणि त्या भोवतालची वस्ती सर्वप्रथम प्रस्थापित करणारी हीच पोर्तुगीज मंडळी. त्या वस्तीभोवती हळूहळू जे नगर वसू लागले त्याला या पोर्तुगीज वसाहतीचा

'मद्रा' नामक कोणी संस्थापक होता, त्याचेच नाव मिळाले आणि या वाढत्या नगराला मद्रासपटनम् म्हणू लागले. पटनम् म्हणजे नगर. 'मद्रा'चे नगर ते मद्रासपटनम्. मग या 'मद्रा'ची मुलगी, म्हणून 'माद्री' पोर्तुगीज होती असेही तर्कट तू चालव की!"

सतराव्या शतकात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 'मैलापूर' आणि ट्रिप्लिकेन या दोन प्राचीन नगरांच्या मध्यभागी 'चेन्नापटनम्' या ठिकाणी आपली वखार स्थापन केली. सन १६३९ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या सर फ्रॅन्सिस डे या गृहस्थांनी विजयनगरच्या धुगधुगत्या राज्याचा वारस राजा चंद्रगिरी याच्याकडून चेन्नापटनम्. या खेड्याची भूमी मिळविली. तिथे उभी राहिलेली ब्रिटिश वखार हीच आजच्या मद्रास शहराची 'कोनशिला' असे म्हणायला हवे. सर फ्रॅन्सिस डे याने तिथे एक छोटा किल्ला बांधून काढला. १६५३ साली तो किल्ला उभा झाला. त्याचे नाव 'फोर्ट सेन्ट जॉर्ज.' या किल्ल्याच्या उत्तरेस, दक्षिणेस आणि पश्चिमेस आजचे मद्रास हळूहळू वसत गेले. वाढता वाढता ते इतके वाढले, की आज १७-१८ लक्ष लोकवस्तीचे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर म्हणून ते ओळखले जाते.

आज या शहरात ज्या अनेक वास्तू दिसतात त्यांतील, काही मंदिरांशिवाय इतर साऱ्या वास्तू ब्रिटिश अमदानींत उभ्या झाल्या आहेत. "मद्रास ईज अ डायरिया ऑफ डोम्स" हे अल्डस हक्सले' यांचे उद्गार अगदी खरे आहेत, असे मद्रासला प्रथमच भेट देणाऱ्याच्याही प्रत्ययाला येते. कुणा राज्यकर्त्यांच्या लहरीप्रमाणे काही वर्षांत योजनाबद्ध रीतीने बांधून काढलेले वा नगररचनाकारांच्या मदतीने म्युनिसिपालिटिने जोपासलेले हे शहर नाही. त्यामुळे या शहरातील कॉलेजे, सरकारी दप्तरे, जुन्या पेढ्यांची कार्यालये, प्रार्थनालये, ग्रंथालये आदी गोष्टी असलेल्या इमारती काही खूपच सुंदर आहेत, काही कमानी, जाळ्या व नक्षीकाम यांनी 'जडावलेल्या' आहेत तर काही अगदीच बेंगरूळ दिसणाऱ्या आहेत. पण तुम्हाला ती विशिष्ठ दृष्टी असली तर त्या इमारती तुमच्याशी बोलत्या होतील आणि गेल्या चार साडेचारशे वर्षांचा इतिहास तुमच्यापुढे जिवंत करतील.

मध्यरात्री उठून शांतपणे निद्रिस्त झालेल्या जॉर्ज टाऊनमधून वा सेंट जॉर्जच्या आसपासच्या पुळणीतून निवांतपणे चक्कर मारलीत, वा बीचरोडवरून सॅन थोम

माहित नसतात. आर्यांच्या भारतविजयापूर्वी या देशात दृढ झालेली द्राविड संस्कृती. पण आर्यांची संस्कृत भाषा तिला परकी असल्यामुळे आर्यांनी या मंडळींना ' असंस्कृत ' ठरवून त्यांना संस्कृतीच नाही, असा डांगोरा पिटला. पुढे आर्यांनाच द्राविडबंधूंशी जमवून घ्यावे लागले. आद्य शंकराचार्यांनी प्रसृत केलेल्या पंचायतनी महापूजेच्या प्रकारात हा संस्कृतिसंगम करण्याचा प्रयत्न जरूर दिसतो. पण तो उत्तर-दक्षिण वाद अजूनही संपला आहे असे नाही.

मद्रास म्हटल्याबरोबर एवढा हा सारा प्रपंच उभा करण्याचे कारण मद्रास म्हणजे या साऱ्या संघर्षांचे, संस्कृतीचे मूळपीठ आहे, फार प्राचीन शहर आहे असे सामान्यपणे आपल्याला वाटते. माझा एक मित्र तर एक दिवस मला म्हणाला, " पांडवांची माता ' माद्री ' ही मद्रदेशाची राजकन्या होती. आणि तो मद्र देश म्हणजे आजचे मद्रास वा ' तमिळनाडू ' नावाचे राज्य. " भारतीय एकात्मता साधण्याच्या दृष्टीने भारतीय राजेमंडळी विविध राज्यांतून स्त्रीरत्ने जमवीत, हे मला मान्य. पण माद्री मद्र देशाची आणि मद्रास राज्य हाच तो मद्रदेश यातला तर्क माझ्या लक्षात येईना. कारण आजचे मद्रास शहर हे इतके प्राचीन नाही; गेल्या तीन चारशे वर्षांत वसलेले ते शहर आहे, हे मला माहीत होते. मी माझ्या मित्राला सांगितले,

" गृहस्था, या तुझ्या तर्कटाला काही विशेष अर्थ आहे असे मला वाटत नाही. प्राचीन काळी राहो, पण इतिहासकाळात हा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्या-खाली वा अर्काटच्या नबाबाच्या अमलाखाली असताना मद्रास शहर अस्तित्वात नव्हते. आज मद्रासमध्ये अंतर्भूत होत असलेले मैलापूर, ट्रिप्लिकेन यांसारखे कित्येक भाग म्हणजे छोटी छोटी नगरे होती. आज ' अड्यार ' आणि ' कूम ' या दोन खाड्यांच्या दुआबात आणि दोहो बाजूंला ५० चौरस मैलांपेक्षा अधिक भागात पसरलेले मद्रास शहर त्या काळी कुणाच्या स्वप्नीही नव्हते. इतिहास काळात पूर्वेकडील देशात नशीब काढण्याकरिता आणि साम्राज्य स्थापण्याकरिता व्यापारी वा धार्मिकी मिषाने जी पाश्चिमात्य मंडळी या देशात आली, त्यांत पोर्तुगीज लोक अग्रेसर होते हे आपल्याला माहीत आहे. मद्रासच्या दक्षिण भागात, किनाऱ्यावर सॅनथोम नामक जे प्रार्थनालय आहे, ते आणि त्या भोवतालची वस्ती सर्वप्रथम प्रस्थापित करणारी हीच पोर्तुगीज मंडळी. त्या वस्तीभोवती हळूहळू जे नगर वसू लागले त्याला या पोर्तुगीज वसाहतीचा

'मद्रा' नामक कोणी संस्थापक होता, त्याचेच नाव मिळाले आणि या वाढत्या नगराला मद्रासपटनम् म्हणू लागले. पटनम् म्हणजे नगर. 'मद्रा'चे नगर ते मद्रासपटनम्. मग या 'मद्रा'ची मुलगी, म्हणून 'माद्री' पोर्तुगीज होती असेही तर्कट तू चालव की!"

सतराव्या शतकात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 'मैलापूर' आणि ट्रिप्लिकेन या दोन प्राचीन नगरांच्या मध्यभागी 'चेन्नापटनम्' या ठिकाणी आपली वखार स्थापन केली. सन १६३९ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या सर फ्रॅन्सिस डे या गृहस्थांनी विजयनगरच्या धुगधुगत्या राज्याचा वारस राजा चंद्रगिरी याच्याकडून चेन्नापटनम् या खेड्याची भूमी मिळविली. तिथे उभी राहिलेली ब्रिटिश वखार हीच आजच्या मद्रास शहराची 'कोनशिला' असे म्हणायला हवे. सर फ्रॅन्सिस डे याने तिथे एक छोटा किल्ला बांधून काढला. १६५३ साली तो किल्ला उभा झाला. त्याचे नाव 'फोर्ट सेन्ट जॉर्ज.' या किल्ल्याच्या उत्तरेस, दक्षिणेस आणि पश्चिमेस आजचे मद्रास हळूहळू वसत गेले. वाढता वाढता ते इतके वाढले, की आज १७-१८ लक्ष लोकवस्तीचे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर म्हणून ते ओळखले जाते.

आज या शहरात ज्या अनेक वास्तू दिसतात त्यांतील, काही मंदिरांशिवाय इतर साऱ्या वास्तू ब्रिटिश अमदानींत उभ्या झाल्या आहेत. "मद्रास ईज अ डायरिया ऑफ डोम्स" हे अल्डस हक्सले' यांचे उदगार अगदी खरे आहेत, असे मद्रासला प्रथमच भेट देणाऱ्याच्याही प्रत्ययाला येते. कुणा राज्यकर्त्यांच्या लहरीप्रमाणे काही वर्षांत योजनाबद्ध रीतीने बांधून काढलेले वा नगररचनाकारांच्या मदतीने म्युनिसिपालिटिने जोपासलेले हे शहर नाही. त्यामुळे या शहरातील कॉलेजे, सरकारी दप्तरे, जुन्या पेढ्यांची कार्यालये, प्रार्थनालये, ग्रंथालये आदी गोष्टी असलेल्या इमारती काही खूपच सुंदर आहेत, काही कमानी, जाळ्या व नक्षीकाम यांनी 'जडावलेल्या' आहेत तर काही अगदीच बेंगरूळ दिसणाऱ्या आहेत. पण तुम्हाला ती विशिष्ट दृष्टी असली तर त्या इमारती तुमच्याशी बोलत्या होतील आणि गेल्या चार साडेचारशे वर्षांचा इतिहास तुमच्यापुढे जिवंत करतील.

मध्यरात्री उठून शांतपणे निद्रिस्त झालेल्या जॉर्ज टाऊनमधून वा सेंट जॉर्जच्या आसपासच्या पुळणीतून निवांतपणे चक्कर मारलीत, वा बीचरोडवरून सॅन थोम

प्रार्थनालयाकडे चालत गेलात तर डाव्या हाताच्या घोंघावत्या पूर्वसमुद्राच्या साक्षीने या साऱ्या वास्तू पूर्वकाळातील धाडसी लढायांची आणि व्यापारी चढायांची मोठी सुरस आणि चमत्कारिक हकीकत तुम्हाला ऐकवतील.

फोर्ट सेंट जॉर्ज या ब्रिटिश ठाण्याच्या गव्हर्नरपदी विराजमान झालेल्या पाच गृहस्थांची नावे सांगितली तरी या वखारीला वा ठाण्याला ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी किती महत्त्व देई हे लक्षात येईल. एलीहू येल ( पुढे अमेरिकेतील सुप्रसिद्ध येल विद्यापीठ स्थापन करणारा ) थॉमस पिट्, लॉर्ड बेंटिंग, सर थॉमस मन्रो आणि वॉरेन हेस्टिंग्ज ही ती पाच नावे. भारतीय व जागतिक राजकारणात या पाच व्यक्तींना जे महत्त्व मिळाले ते लक्षात घेतले की, सेंट जॉर्जचे ऐतिहासिक महत्त्व ध्यानी यावे. सेंट जॉर्ज किल्ल्यातील सेंट मेरी नामक प्रार्थनालयात एलीहू येल व लॉर्ड रॉबर्ट क्लाईव्ह या दोघांचे विवाह पार पडले आहेत हे कळल्यावर मी मुद्दाम आत शिरून ती ऐतिहासिक वास्तू पाहून घेतली.

सन १६३९ मध्ये सर फ्रॅन्सिस डे ने चेन्नापटनम् बसविल्यावर व फोर्ट सेन्ट जॉर्ज बांधून काढल्यावर ( १६५३ ) या नववसाहतीच्या उत्तरेला 'ब्लॅक टाऊन' नामक एक वसाहत उठली. या ब्लॅक टाऊनलाच आता जॉर्ज टाऊन असे संबोधण्यात येते. आज मद्रासच्या व्यापारी घडामोडींचे हे केंद्र आहे. या जॉर्ज टाऊनच्या पूर्वेला मद्रास बंदर येते. १८७५ साली युवराजांच्या हस्ते या बंदराची कोनशिला घातली, पण १८८१ साली आलेल्या चक्री वादळाने आणि पावसामुळे त्या वेळपर्यंत उभारलेले सारे काम पाण्यात गेले. अचानकपणे चक्री वादळ आणि मुसळधार पाऊस सुरू होणे ही गोष्ट भारताच्या या पूर्वकिनारपट्टीला अनोळखी नाही. ही वादळे कधी समुद्राला मागे हटवतात तर कधी समुद्राच्या प्रलयंकारी लाटांनी किनारा धुऊन नेतात. कधी खोल समुद्र एकदम उथळ करतात तर कधी उथळ समुद्राची खोली दहा दहा पुरुषांइतकी वाढवितात. वादळाच्या तडाख्यात घरांची छपरे उडून जाणे आणि घरे बोडकी बनणे हे नवीन नाही. समुद्रावरून वाहतूक करणाऱ्या जहाजांची आणि मच्छीमारी होडयांची कशी न् किती हानी केव्हा संभवेल हेही सांगता येत नाही. भारताचा पूर्वकिनाराही तसा दंतुर नाही. त्यामुळे बंदरांना योग्य अशा निवाऱ्याच्या जागाच किनाऱ्यावर आढळत नाहीत. म्हणून मद्रास बंदर बांधून काढावे लागले. उत्तर, दक्षिण व पूर्व बाजूने समुद्रात उंच व रुंद भिंती

बांधून काढाव्या लागल्या. उत्तरेच्या भिंतीजवळ पूर्वटोकाला चारशे फूट रुंदीचे द्वार राखण्यात आले आहे. भरती–ओहोटीमुळे मद्रास बंदरातील पाण्याच्या पातळीत चार फुटांपेक्षा अधिक फरक पडत नाही. त्यामुळे मोठमोठ्या आगबोटी केव्हाही धक्याला लागतात. ब्रॉड गेज व मीटर गेज दोन्ही रेल्वेचे फाटे अगदी बंदरातच आणून पोचविले असल्याने मालाच्या व प्रवाशांच्या वाहतुकीची सोय झाली आहे.

मद्रासच्या काही प्रख्यात वास्तू, हॉटेले, दुकाने, कार्यालये आहेत माऊंट रोडवर. वर उल्लेखिलेल्या फोर्ट सेन्ट जॉर्जपासून निघून हा रस्ता नैर्ऋत्य दिशा पकडतो आणि लंब तलावाच्या बाजूने गिंडी सरकारी फार्मकडे रवाना होतो. वर ज्या कूम नदीचा उल्लेख आला आहे, ती नुसती मद्रास शहरातून वाहते असे नाही, तर शहराच्या हृदयभागी द्विवेणी बनून तिने तिथे एक बेट निर्माण केले आहे आणि शहराच्या रचनेत एक प्रकारचे वैशिष्टय निर्माण केले आहे. समुद्राला मिळण्यापूर्वी ती पुन्हा एकवेणी होते व मरिना बीच रस्ता नेपियर पुलाखालून ओलांडून सर्वांगी पूर्वसमुद्राला भेटते. या बेटाच्या मध्यभागी, माऊंट रोडवर सर थॉमस मन्रो यांचा प्रचंड पुतळा उभा आहे. १८३९ साली लोकवर्गणीतून उभा झालेला या बड्या माणसाचा हा ब्राँझचा पुतळा माऊंट रोडचे सौंदर्य शतगुणित करतो

कूमच्या या बेटाच्या उत्तरेला येतो मेमोरियल हॉल. १८५७ सालच्या क्रांती-युद्धाची झळ मद्रासला लागली नाही म्हणून लोकवर्गणीतून उभारली गेलेली ही स्मृतिवास्तू!! स्वातंत्र्यसमरात न उतरता सहीसलामत राहिलेल्यांची ती जणू विजयपताका! या मेमोरियल हॉलच्या पश्चिमेला येते मद्रास सेंट्रल रेल्वे स्टेशन. स्टेशनच्या भव्य इमारतीला साजेसा १३६ फुटी घड्याळी मनोरा इथे उभा आहे. स्टेशनला लागूनच येतो 'ईव्हिनिंग बझार.' त्याच्या पलीकडेच आहे सुप्रसिद्ध 'मूर मार्केट' या मार्केटला खेटूनच 'व्हिक्टोरिया पब्लिक हॉल' उभा आहे. त्याच्या पलीकडे पश्चिमेला येते 'रिपन बिल्डिंग.' लॉर्ड रिपन म्हणजे भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक त्याच्या नावे ओळ-खल्या जाणाऱ्या इमारतीत भारतातील सर्वांत जुनी स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिष्ठापित असावी यात औचित्यही आहे. मद्रासची म्युनिसिपल कॉर्पोरेशन भारतातील सर्वांत जुनी संस्था. 'कुंपणी' सरकारच्या राज्यात ती १६८७ साली

स्थापन झाली. मद्रास शहराच्या वाढीमुळे गेल्या अडीच पावणे तीनशे वर्षांत तिचे कार्यक्षेत्र खूपच वाढले आहे. मद्रास सेंट्रलच्या घड्याळी मनोऱ्यापेक्षाही उंच घड्याळी मनोरा उभारून रिपन बिल्डिंगने या भागात आपले महत्त्व निर्देशिले आहे. रिपन बिल्डिंगला लागूनच येते 'पीपल्स पार्क.' या ११६ एकरी बागेत ॲथलेटिक असोसिएशन आहे, आणि संग्रहालय आहे; पोहोण्याचा तलाव आहे; अकरा तळी आहेत; उत्तम टेनिस कोर्टे आहेत; आणि बँड स्टँड पण आहे. 'चार्ल्स ट्रव्हेलयान' नामक गव्हर्नराच्या प्रेरणेने १९५९ साली तयार झालेली ही बाग म्हणजेही मद्रासचे एक रमणीय ठिकाण वाटते.

पूनामली रस्त्याने पश्चिम दिशा धरून काही अंतर गेल्यावर मद्रासचे स्कूल ऑफ आर्ट्स लागते. १८५० साली डॉ. अलेक्झांडर हंटर यांनी स्थापन केलेल्या या संस्थेत, चित्रकला, रंगकाम, नक्षीनाम, साचे बनविणे, लाकूडकाम, गालिचे विणणे, मातीची भांडीं बनविणे, जवाहिरी काम, धातूतील नक्षीकाम वगैरे अनेक कला शिकविल्या जातात. आर्ट स्कूल पाहून पुढे सरकल्यावर येते सेंट अँड्रूज चर्च. १८२० साली उभारलेले हे प्रार्थनालय. या इमारतीचा विशेष हा की तिच्या बांधकामात कुठे लाकूड वापरले नाही. अगदी सागालाही थारा दिलेला नाही. इमारतीच्या भिंतीना जे प्लॅस्टर केले आहे त्यामुळे भिंती इतक्या गुळगुळीत व व चकचकीत दिसतात की, प्रथमदर्शनी वाटते की इथे संगमरवर वापरला आहे! पण ही 'मयासुरी' कामगिरी आहे मद्रासच्या वैशिष्ट्यपूर्ण चुन्याची! मद्रासमध्ये अनेक इमारतींना अशी खुलावट देण्याचे काम या चुन्याने बजावले आहे.

शहर म्हटले की, बागा, म्युझिअम्स, वेड्याची इस्पिळे, वेधशाळा, खेळांचे क्लब, कॉलेजे अशा अनेक गोष्टी तिथे असणारच. माणूस आपल्या सोईकरिता अशा अनेक गोष्टी आपल्या वसतीच्या परिसरात उभ्या करतो. पण मद्रास म्हटले कीं, ज्यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा अशा काही वास्तू आहेत. फोर्ट सेन्ट जॉर्जच्या उत्तरेला असलेले मद्रासचे हायकोर्ट व लाईट हाऊस ही अशी एक वास्तू आहे. हायकोर्टाच्या लाल इमारतीच्या इंडोसेरासेनिक पद्धतीच्या वास्तुशिल्पापेक्षा मद्रास हायकोर्टाच्या न्यायनिष्ठुरतेची ख्याती अधिक आहे. हायकोर्टाच्या परिसरातील १६० फूट उंचीचा तो लाईट हाऊसचा मनोरा हायकोर्टाची हीच 'निःस्पृही ध्वजा' अस्मानांत फडकावतो असे वाटते.

जवळ जवळ चार मैलांचा सलग समुद्रकिनारा लाभल्याने मद्रासचा ' मरिना ' बीच आशियात गाजलेला. जगातील उत्कृष्ट समुद्रकिनाऱ्यांत त्याचा दुसरा नंबर लागतो. मद्रासच्या पौरजनांनी त्याची अजून ' चौपाटी ' करून टाकली नाही हाही त्याचा विशेष ! मरिना बीचवर मद्रास कॉर्पोरेशनने बालक्रीडोद्यान तयार केल्यामुळे रंग गंधांच्या त्या सरमिसळीत शैशवही सामील होते आणि आता ' काळ्या आदमींना ' खुला झालेला ' स्विमिंग पूल ' मरिनाच्या सरसतेत भर घालतो.

नेपियर पुलावरून किनाऱ्याने सॅनथोमकडे निघालात तर उजव्या बाजूला अनेक भव्य पुतळे आणि सुरेख इमारती तुमच्या दृष्टिपथात येतात. मद्रास विद्यापीठाचा घड्याळी मनोरा व विद्यापीठाचे भव्य ' सेनेट हाऊस ' यांच्या पलीकडेच दिसतो चेपॉक राजवाडा. अर्काटच्या नबाबाचा हा वाडा. पण तिथे आज मद्रास पी. डब्ल्यू. डी. चे कार्यालय ठाण मांडून बसले आहे. या वाड्याचे शिल्प अगदी आगळे आहे. ' मूरिश ' पद्धतीचे असे शिल्प क्वचितच पाहायला मिळते. काहींच्या मते मद्रासमधील ही सर्वांत सुंदर इमारत आहे. चेपॉक राजवाडा माझ्या लक्षात राहण्याचे आणखी एक कारण त्या वाड्यापाठीमागे असलेले चेपॉक मैदान. मद्रास क्रिकेट क्लबचे हे मैदान आणि स्टेडिअम म्हणजे कसोटी सामन्याचे रणक्षेत्र ! चेपॉकच्या पलीकडेच आहे मद्रासची जुनी व प्रसिद्ध शिक्षण संस्था. तिचे नाव ' प्रेसिडेन्सी कॉलेज. ' इटालिन पद्धतीचे शिल्प असलेली ती इमारत नवीनच बांधलेल्या घुमटामुळे सुरेख दिसते.

मरीना किनारपट्टीच्या अगदी दक्षिणांगाला सॅनथोम प्रार्थनालय दिसते. रोम कॅथॉलिकांचे यात्रास्थान. कारण तिथे त्यांच्या सेन्ट थॉमस या संताच्या अस्थी पुरल्या आहेत. येशू ख्रिस्ताच्या वधानंतर त्याच्या पवित्र धर्माच्या प्रसारार्थ हा साधू भारतात आला. मैलापूर येथे वास्तव्य करून आणि तिथे एक चर्च स्थापून त्याने आपल्या धर्मप्रसाराला सुरुवात केली. चमत्कार करून नमस्कार घेत त्याचे हे कार्य चालू असता हिंदू ब्राह्मणांना राग-येऊन त्यांच्या-पैकी एकाने मद्रासच्या मीनांबक्कम विमान तळाजवळ असलेल्या या सेंट थॉमस माऊंट नामक टेकडीवर त्याचा वध केला. त्यामुळे हौतात्म्य पावलेल्या या संताचे हे स्मारक. अनेकदा ते बांधले गेले. सध्याचे गोथिइक पद्धतीने बांधलेले प्रार्थनालय गेल्या शतकात बांधले गेले आहे.

ज्या मैलापूराचा वर उल्लेख आला ते मैलापूर प्रसिद्ध आहे ते कपालीश्वराच्या मंदिराकरिता. मैलापूर म्हणजे मोरांचे वसतिस्थान. सती पार्वतीने मोराच्या स्वरूपात महादेवाला प्रसन्न करून घेतले ते इथे. आता मैलापूरला मोर दिसत नसेल तरी पार्वतीची ती कथा या मंदिरात मूर्तिरूप झालेली दिसते. कपालीश्वराच्या मंदिराचे गोपुर म्हणजे द्राविडी शिल्पकलेचा एक जडावाचा दागिनाच आहे. मंदिराच्या मागे असलेले तळे तीर्थ बनले आहे. प्रतिवर्षीचा त्या तळ्यातील दीपदानाचा सोहळा इथे यात्रा गोळा करतो.

ट्रिप्लिकेन भागातील पार्थसारथी मंदिर हे कपालीश्वरापेक्षाही जुने मंदिर. आठव्या शतकात पल्लव राजांनी ते उभारले आणि विजयनगरच्या सम्राटांनी सोळाव्या शतकात त्याला शृंगारिले.

सॅन थोमवरून निघणाऱ्या राजरस्त्याने अडयार नदी ओलांडून पुढे गेले की आपण बॅझंटबाईच्या अडयार फिलॉसॉफिकल सोसायटीच्या आवारात पोचतो. अडयार नदीच्या काठी उद्यानी वातावरणात उभारलेले ते रमणीय स्थान तिथले ग्रंथालय, कलाक्षेत्र आणि जुनाट जुगादीचा वटवृक्ष साऱ्याच गोष्टी मन प्रसन्न करणाऱ्या. इथले कलाक्षेत्र म्हणजे भरतनाट्य, कथाकली आणि कर्नाटकी संगीत साधनेचे महान् पीठ मानले जाते. शिवाय विविधरंगी, विविधप्रकारची सुंदर वस्त्रे विणण्याचे शिक्षणही इथे दिले जाते. अड्यारचा क्लब गोल्फ कोर्स-करिता आणि नौकाविहाराकरिता प्रसिद्ध आहे.


मद्रास जसे सुंदर वास्तूकरिता प्रसिद्ध आहे तद्वत विद्वानांची, कलाकारांची, कवींची निवासभूमी म्हणूनही त्याचे स्थान आगळे आहे. शिवाय मद्रासचे वैशिष्ट्य हे की, या भूमीतच ही मोठी माणसे निपजली, हीच भूमी त्यांची कर्म-भूमीही झाली. एकोणिसाव्या शतकातील ' रामचंद्र कविरायर ' सारखा गायक ' रामलिंगस्वामी ' सारखे कवी आणि साधू मद्रासने निर्माण केले आहेत. इथे नुसती प्रसिद्ध माणसे जन्मली नाहीत तर सर्वार्थी थोर माणसांची पैदास इथे झाली. ही माणसे प्रसिद्धि पराङ्मुख होती, दरिद्री होती पण जगाला त्यांची कदर करावी लागली.

सामान्य मद्रासी माणूस अतिथ्यशील आहे. धार्मिक आहे. कर्मठ आहे. पण दुसऱ्यावर अन्याय करणारा नाही. लोकशाही मानणारा, बडेजाव टाळणारा, साधा, मोकळा, थोडीशी कंजुषी करून राहणारा मद्रासी. पण दुसऱ्याच्या

गुणांची कदर करताना तो कंजुषी करणार नाही. मद्रासी माणसाच्या कायदेशीर-पणामुळेच मद्रासमध्ये वकीलमंडळीचे प्रमाण जास्त असावे ! मद्रासच्या घाणेरड्या, घामेजल्या हवेमुळे, लहरी पावसा-वादळामुळे मद्रासी माणूस चिकट, चिवट, जिद्दखोर बनला असावा. दारिद्र्याचा वरदहस्त साऱ्या दक्षिण-भारतावरच आहे. पण त्यातून मार्ग काढण्याकरिता देशोदेशी वणवण करण्यात मद्रासी मंडळींनी पुढाकार घेतला. वृत्तीने ते आक्रमक नसले तरी परिस्थितीने चिवट बनले आहेत. नेपोलियनप्रमाणेच ' अशक्य ' हा शब्द त्यांच्या कोशात नसावा.

कर्नाटक आणि बकिंगहॅम गिरण्याशिवाय मद्रासच्या परिसरात परवा परवा-पर्यंत " उद्योग " रुजला नव्हता. त्यामुळेच मद्रासी माणसांना पोटासाठी घर सोडावे लागले. आता मोटारी जुळवणारे, सायकली, मोटार सायकली निर्मिणारे, आगगाड्यांचे डबे बांधणारे ( पेरांबूर ), सिगारेटी करणारे वा यांत्रिकी साधने निर्मिणारे कितीतरी कारखाने मद्रासच्या उपनगरांतून उभे राहिले आहेत. विवेकानंद कॉलेज, इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, लेदर रिसर्च लॅबोटररी, अशा अनेक संस्था गेल्या दहा-वीस वर्षांत मद्रासला आल्या आहेत. या सर्वांमुळे मद्रासचे स्वरूप खूपच पालटले असले तरी या औद्योगीकरणाच्या गदारोळात मद्रासचे व्यक्तिमत्त्व हरवलेले नाही; आणि ते हरवायचेही नाही. कारण मद्रासची परंपराच तशी चिवट आहे.

१५०२८



# पुण्यपत्तन पुणे

‘ अिन्किलाब जिंदाबाद ’ ‘ महात्मा गांधी अमर रहे ’ यांसारख्या घोषणा करीत लोकांचा तो प्रचंड जमाव रस्त्याने चालला होता. बऱ्याच लोकांच्या हातांत कॉंग्रेसची निशाणे होती. डोक्यावर गांधी टोप्या होत्या. तोंडाने ते ‘ ब्रिटिशांनो, हा देश सोडून द्या ’ असे आदेशीत होते. आणि एकाएकी काय झाले नकळे. क्षणार्धात तो सारा जमाव पांगला. आजूबाजूच्या दुकानांत, गल्ली-बोळात दिशेनासा झाला. काय होते आहे हे कळण्याअगोदरच माझ्या ढुंगणा-वर व पोटऱ्यांवर एका राक्षसी पोलिसाच्या हातातील वेत उठले. दोन-चार छड्या खाऊनही मी रस्त्यातच उभा पाहून त्याने माझा बकोटा धरला व शेजारच्या दुकानाच्या फळीवर मला आदळीत तो उद्‌गारला, ‘ बेवकूफ, भागता भी नही ! ’

आठ ऑगस्ट १९४२ या दिवशी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर महात्माजींनी ‘ चलेजाव ’ची घोषणा करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जे रणशिंग फुंकले त्याचेच पडसाद पुण्यात उठत असता बावीस वर्षांपूर्वी मी एका शाळ-करी दोस्ताचे बोट धरून पुण्यात प्रथम पाऊल ठेवले. पुण्याच्या निरनिराळ्या वास्तू पाहत फिरत असता सहजगत्या आम्ही दोघे वरील ‘ अिन्किलाब जिंदा-बाद ’ मध्ये सामील झालो. अंगात वीरश्री संचारली. विजयी मराठ्यांची सेना

पुणेरी रस्त्यातून चालावी तसे आम्ही घोषणा करीत निघालो आणि वर वर्णिलेला प्रकार घडला.

मला कळेना. ब्रिटिशांना पळवून लावायला निघालेली ती सारी पुणेकर मंडळी पोलिसांनी लाठीहल्ला केला म्हणून अशी पळत का सुटली? शिवरायाचा 'लाल महाल' जिथे खडा होता, जिथे शाहिस्तेखानाची बोटे तोडून शिवरायाने त्याला खडे चारले; हिंदूपदपातशाही स्थापन करण्याचे मनोरे जिथे रचले गेले, मस्तानीबहादूर रणधुरंधर बाजीरावाचे नाव जिथला शनवारवाडा सांगतो, दर दसऱ्याला मराठी सैन्य दिग्विजयाकरिता ज्या पुण्यातून बाहेर पडे, त्या पुण्यातले लोक तो आपला वारसा विसरून साडेतीन फुटी बांबूना आणि आगओक्या पिटुकनळ्यांना पाहून गल्लीबोळांतून पळत सुटले. दुसऱ्या रावबाजीच्या काळातील आपल्या वारशाला जागले! हे क्षणभर मला खरेच वाटेना. अंगावरील वळ चोळीत मी बराच वेळ त्या फळकुटीवर बसलो होतो. मनात सारखे येत होते हे 'ते' पुणे नव्हे!

मुळा आणि मुठा या दोन नद्यांचा जिथे सुरेख संगम झाला आहे, त्या संगमाच्या परिसरात, आणि पर्वती, हनुमान टेकडी, फर्ग्यूसन टेकडी आणि चतुःशृंगी या चार डोंगर रांगांनी जिथल्या आसमंताला वैविध्य प्राप्त करून दिले आहे त्या आसमंतात वसलेल्या पुण्याबद्दल मला वेगळेच आकर्षण वाटत आले आहे. आज पश्चिमेच्या वेताळ टेकड्यापासून तो पूर्वेच्या घोरपडीपर्यंत आणि दक्षिणेच्या पर्वतीपासून उत्तरेस असलेल्या खडकीपर्यंत जवळ जवळ २५ चौरस मैलांच्या परिसरात पसरलेले पुणे पूर्वी फार छोटे होते पण त्याची कीर्ती दिगंतात गाजत होती.

सतराव्या शतकात शहाजीराजांची जहागीर म्हणून पुणे-सुपे इतिहासात नमूद झाले. शिवाजीच्या बाळपणामुळे त्याच्या कीर्तीला इथे बाळसे प्रात झाले. पहिल्या बाजीरावाने पेशवाईची राजधानी करून पुण्याला व्यक्तिमत्त्व प्राप्त करून दिले. इथेच त्या उमद्या पेशव्याच्या 'मस्तानी' नामक प्रेमप्रकरणाचा मोठा दुःखद इतिहास घडला. पेशव्यांच्याच शनिवारवाड्यात पुढे भाऊबंदकीमुळे नारायणरावाचा खून पडला. पेशव्यांनाही देन्हात प्रायश्चित्त सुनावणारा निःस्पृह न्यायाधीश रामशास्त्री, "नानांत नाना, फडणीस नाना" म्हणून जो नानाप्रकारे गाजला तो नाना फडणीस, छोट्या वयात महान् कामगिरी बजावून

अकाली निधन पावलेला समर्थ पेशवा माधवराव, बापू गोखला, हरिपंत फडका, भीमथडी तट्टांना अटकेचे पाणी पाजणारा राघोभरारी अशी कितीतरी नररत्ने या पुणे नामक खाणीत निर्माण झाली. पण त्याच खाणीत पेशव्यांचा गणेश-महाल तमाशातल्या बाजिंद्या बायकांसाठी मोकळा करणारा रावबाजी निर्माण झाला, घरबुडव्या बाळाजीपंत नातू निर्माण झाला आणि मराठी साम्राज्याचा तळपता स्वातंत्र्यसूर्य १८१८ साली अस्ताला गेला.

पेशवाईचा अस्त म्हणजे पुण्याच्या प्रतिष्ठेला आणि कीर्तीला लागलेले ग्रहण. खरे म्हणजे या ग्रहणकालातच पुणे खलास व्हायचे. भारतातील इतर अनेक शहरांचे असे झाले आहे. पण पुण्याचा ' मोक्ष ' काल पुण्यानेच केला आणि अव्वल इंग्रजीच्या काळात महादेव गोविंद रानडे, ज्योतिबा फुले, प्रिन्सिपल आगरकर, अण्णासाहेब कर्वे, चिपळूणकर पितापुत्र, आदी कितीतरी नररत्नांनी ' थंड गोळा ' होऊन पडलेल्या पुण्याला पुन्हा एकदा चेतवले. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' म्हणणारे लोकमान्य टिळक, मवाळाग्रणी गोपाळ कृष्ण गोखले, ज्वलजहाल शिवराम महादेव परांजपे असे एक ना दोन शेकडो भारतमातेचे सुपुत्र इथे निर्माण झाले आणि त्यांनी पुण्याची ध्वजा पुनश्च भारतीय आकाशात फडकत ठेवली.

समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण, ज्वलज्जहाल राजकारण, उत्कृष्ट साहित्य अशा कितीतरी अंगांनी या काळात पुण्यात प्रबोधन युग अवतरले. हरी नारायण आपटे, राम गणेश गडकरी, नाट्याचार्य खाडिलकर, चिपळूणकर, डॉ. केतकर शिवरामपंत परांजपे या सगळ्यांनी इतकी नवलाईची ' अहेवलेणी ' मराठी सरस्वतीला चढविली की, वाटले राज्यश्री गेली तरी पुण्यात सरस्वती अवतरली.

पुण्याचे राज्यपीठ गेले तरी विद्यापीठ आले. पुणे शिक्षणाचे केंद्र बनले. राजकीय चळवळींचे हृदय बनले. भारतीय वृत्तपत्रांच्या शीर्षकी ते झळकू लागले. पुण्याचे आकर्षण वाटावे असे पुण्यात कितीतरी आहे. पण तुम्ही टूरिस्ट म्हणून पुण्यात शिरलात तर इथे ताजमहाल, गोल घुमट, जुम्मा मशीद, मदुरेसारखे आकाशाला भिडलेले सुंदर मीनाक्षीमंदिर असले काही दिसेल का ? नाही. शंभर वर्षे राजधानीचे शहर असूनही ' मरावे परी वास्तुशिल्पे उरावे ' असे इथल्या राज्यकर्त्यांना कधी वाटलेच नाही. पेशव्यांचा शनवारवाडा हीच इथली मोठी वास्तू. आता तो जळून गेला असला तरी तो सातमजली वाडा

उभा होता तेव्हाही वेड लावणारे सौंदर्य त्याने धारण केले नव्हते असे जाणकार लिहितात. इथली पर्वती, म्हणजे राजदेवी घेतली, तरी ती सुद्धा अगदी साधी सुधी. आजचा पर्वतीच्या पायथ्याशी असलेला तळ्यातला गणपती तोही बिचारा साधा. आता तर बिचारा तळ्यातही राहिला नाही. ते तळेही आता नामशेष झाले आहे. असे का ? याला उत्तर एकच. ती 'चैन ' पेशव्यांच्या वा मराठी राज्यकर्त्यांच्या रक्तातच नाही.

अगदी अलीकडच्या काळातही पुणे म्हणजे अरुंद रस्त्यांचे, गलिच्छ गल्ली-बोळांचे, अंधारभरल्या वाड्यांनी भरलेले एक गचाळ शहर होते. लोक घरे बांधीत गेले होते आणि त्यांना वळसे घेऊन पुणे नगरपालिकेने रस्त्यांचा गुंता आखला होता की, रस्त्यांच्या मधोमध देवळांच्या घुमट्या उभ्या होत्या. पुणेकर मंडळींना व्यक्तिगत स्वच्छता समजत होती, पण सार्वजनिक आरोग्य ही चीज त्यांना ठाऊक नव्हती. त्यामुळे नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे प्लेग, कॉलरा, विषमज्वर आदी रोग पाळीपाळीने शहराला भेट देत. पण आता पुणे सुधारले आहे. गेल्या दहा-वीस वर्षांत पुण्याचे रस्ते रुंदावले. त्यावर डांबरी आवरण चढले. दुकानांची कळा बदलली. नागरी स्वच्छतेकडे अधिक लक्ष दिले जाऊ लागले. पुण्यात कांही नगर-उद्याने निर्माण झाली. जिमखाना, पुरंदरे कॉलनी, हिराबाग आदी भागांत छोटेमोठे बंगले उठलेले दिसू लागले. त्यांच्याभोंवती हिरवळ जोपासलेली नजरेत भरू लागली. पुण्यात जरा श्रीमंती आल्यासारखे वाटू लागले. कदाचित् ती खरोखरीच आली असावी. कारण पुण्याचा आसमंत, आज अनेक गिरण्या-कारखान्यांनी धडधडू लागला आहे. 'नॅशनल डिफेन्स अकादमी, ' नॅशनल केमिकल लॅब्रोरेटरी, ' 'फिल्म इन्स्टिटयूट ऑफ् इंडिया ', ' आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज, ' 'मिलिटरी इंजिनियरिंग कॉलेज ', 'डेनोव्हिली कॉलेज, ' ' वॉटर अॅन्ड पॉवर रिसर्च स्टेशन ' ' महाराष्ट्र व्यायाम मंडळ, ' ' डेक्कन कॉलेजातील स्कूल ऑफ लिंग्विस्टस्, ' येरवड्याचा तुरुंग आणि वेड्यांचे इस्पितळ आदी नव्या व जुन्या संस्थांमुळे पुण्याला आंतरभारती महत्त्व प्राप्त झाले आहे.

पण या सुधारलेल्या श्रीमंत पुण्याच्या पेठांची नावे मात्र दरिद्री आहेत तशीच आहेत. पेशव्यांच्या काळीं राजवैभवाचा हत्ती दारी झुलत असताही या पुणेरी वस्त्यांची नावे वारांच्या नावांनी का पडावी समजत नाही. पेशव्यांचा

राजवाडाही म्हणे शनवार वाडा! हा खास पुणेरी थाट आहे! इथे देवांची नावेसुद्धा 'पासोड्या', 'गवत्या', 'पत्र्या', 'सोन्या', 'खुन्या', 'निवडुंग्या' अशा विशेषणांनी युक्त आहेत. देवाला अशी विशेषणे एक पुणेकरच लावू जाणेत!

पुण्यात राजवैभव नांदले, पण खानदानीपणा, ऐषआराम, वागण्यातील आदब, विशाल दृष्टिकोन, सहानुभूतिपूर्ण वागणूक आदि गोष्टी इथे रुजल्याच नाहीत. पुणेकर उद्दाम वागले. कारण तसे केले नाही तर दुसरा आपल्याला कमी लेखील असे त्याला वाटले. भावनावेग असह्य झालाय. मनातील भावना प्रेम, आनंद, कारुण्य व्यक्त करायला शब्द सापडत नाहीत म्हणून चेहरा पारदर्शक झालाय, असे पुणेरी व्याख्यात्याचे कधी व्हायचे नाही. स्पष्ट, थंड, मुद्देसूद पण आलिप्त राहून केलेले ते भाषण. दुसऱ्यांच्या गुणांच्या प्रशस्ती-ऐवजी त्यांची उपरोधी हुर्रेवडी पुणेकरानेच करावी. पुणेरी माणूस ऐषआराम उपभोगू शकतच नाही. ऐपत असली तरीही फर्निचर, कपडे, घराची सजावट आदी कुठल्याच बाबतीत थोडा सढळ हाताने खर्च करणे त्याला जमतच नाही. पुणेकर कधी 'ब्रीफ केस' वापरीत नाही. झोळी (भाजीची!) घेऊन तो फिरतो नागपूरकरांसारखा धोतरावर हॅट घालून फिरतो! पुणेकरांसारखे 'घटना'वादी भारतात इतरत्र सापडणे दुर्मिळ! पुण्याच्या निरनिराळ्या व्यासपीठांवर वाद-विवाद जसे रंगले वा रंगतात तसे दुसरीकडे कुठे आढळत नाही. पण वादावरून गुद्यावर येण्याचे प्रकार पुण्यात अलीकडेच आढळले तर!

सायकल हे पुण्याचे मुख्य वाहन. रिक्षा, टॅक्सीज्, बसेस् यांना या सायकलींना चुकवून आपला रस्ता काढायचा असतो! अनेक योगासने करीत गर्दीतून वाट काढणारे पुणेरी सायकलस्वार पाहिले की का कोण जाणे, मला नाथ गोडबोल्यांची आठवण येते. एका वेळी एका सायकलवरून शंभर शंभर जेवणाचे डबे ८–१० मैल वाहून नेणारे पुण्याचे डबेवाले धन्य होत!

पुणे म्हणजे संस्थांचे गाव आहे. इतक्या विविध प्रकारच्या, विविधोद्देशी, विविधरंगी, विविधढंगी संस्था जगाच्या पाठीवरील कुठल्याही एका शहरात असणे शक्य नाही. या सगळ्याच संस्था फार मोठे कार्य करीत असतात असे नव्हे; पण सर्व संस्थाचालकांना तसे वाटत मात्र असते. कितीही सूक्ष्म कंटाळ-वाणे, किचकट, जिकिरीचे काम असू दे. ते करायला तुम्हांला पुण्यात विद्वा-


नांचा तुटवडा पडायचा नाही. काम करताना दिसणारा उत्साह भाडोत्री नसतो. पोटाला चिमटा घेऊन, रात्रंदिवस प्रामाणिकपणे राबून काम करणारी माणसे इतरत्र आढळणार नाहीत. पुण्यात अशी माणसे झाली आणि त्यांनी अशा आपल्या संस्था चालविल्या म्हणूनच राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत पुणे नेहमी आघाडीवर राहिले आहे. भांडारकर इन्स्टिटयूट, गोखले इन्स्टिटयूट, भारत इतिहास संशोधक मंडळ, सर्व्हन्टस् ऑफ इन्डिया सोसायटी, सेवासदन, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था यांसारख्या संस्थांना या देशात व काहींना परदेशांत ही कीर्ती लाभली आहे.

पुणें विद्वानांचे आगर आहे. केतकरांनी श्रीधर व्यंकटेश ज्ञानकोश तयार केल्यापासून कोशवाङ्मयावर पुण्याच्या विद्वानांचा भर दिसतो. अलीकडे अनेक मराठी लेखक पुण्यात स्थायिक झाल्याकारणाने पुणे म्हणजे एक साहित्यिक अड्डाही बनला आहे. पुस्तक-प्रकाशनाचा धंदाही पुण्यात स्थायिक झाला आहे. यातले कोण कुणामुळे इथे आले हे सांगणे मात्र कठीण आहे. शंभर वर्षे राजवैभव नांदूनही पुण्याने कुठलीही कला जोपासली नाही. नामवंत चित्रकार, यशवंत वास्तुशिल्पकार, कीर्तिवंत तंतकार वा गायक, वा नृत्यकार पुण्यात पैदा झाला नाही. पण रसिकांची पुण्यात वाण नाही.

अगदी परवा परवापर्यंत पुणे म्हणजे पेन्शनरांचा आणि विद्यार्थ्यांचा गाव होता. पुण्याची हवा थंड, आल्हादायक, पाऊस बेताचा. एप्रील-मे मध्ये गारांचा शिडकावा करणारा, पाणी उत्तम. त्यामुळे आयुष्याची सायंकाळ कंठायला असे ठिकाण शोधू जाता गवसले नसते 'श्रमसाफल्य' 'विश्रांती' असल्या नावांच्या बंगल्यांत राहणारी निवृत्त माणसे इथे खूप होती. त्यामुळे इथे दोन महत्त्वाचे उद्योग चालत. एक म्हणजे शाळा कॉलेजातील मुलांकरिता क्लास चालविणे. पुण्यातील विद्यार्थी शाळा-कॉलेजात जाणार नाहीत पण या क्लासात हजेरी लावायला चुकायचे नाहीत! इथले क्लासवाले आता खूपच गबर झाले आहेत. पुण्यातील दुसरा उद्योग लग्नांचा. पुणे म्हणजे महाराष्ट्राची 'लग्नबाजारपेठ' आहे. नागपूरचा मुलगा व सोलापूरची मुलगी यांचे लग्न पुण्यातच लागायचे. सीझनमध्ये कित्येकदा एका दिवशी तीन तीन हजार लोक इथे चतुर्भुज होतात. लग्ने आली की मांडववाले, रोषणाईवाले, बँडवाले, आचारी, पाणके, वाढपी आले, दलाल आले. साऱ्यांचीच चलती. या प्रत्येक धंदेवाल्याने पुण्यात

घरे उठविली आहेत. प्रत्येक धंद्याच्या अडल्या पुण्यात चालतात. लग्नांची एवढी मोठी बाजारपेठ पृथ्वीच्या पाठीवर दुसरी नसेल.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आणि विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुण्याला उद्योगवसाहतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे इथली वस्ती आज साडेसात लाखांवर गेली आहे. पुण्याचे वातावरण थोडे बहुजनवादी बनले आहे. " पुढल्या आठवड्यात माझेकडे येऊ नका. मी चार दिवस रोमला जाऊन येणार आहे. " असे सांगणारी माणसे ( मोठी ) आता पुण्यात भेटू लागली आहेत. आता पुणे बदलते आहे; बदलू घातले आहे. पुण्याचा सदाशिवपेठी छाप आता राहणार नाही. पण औद्योगीकरणाचा लोंढा आला तरी पुणे आपले पुणेपण सोडणार नाही अशीच त्याची परंपरा आहे. पानशेतचा लोंढा ज्या पुण्याने पचविला त्याला हेही शांकरीकर्म करता येईल. पुणेरी जिद्द, पुणेरी निष्ठा, पुणेरी स्वातंत्र्य प्रेम, पुणेरी घटनाप्रियता, पुणेरी ज़िवटपणा, चोखंदळपणा हे सारे गुण इतके लोभसवाणे आहेत की पुण्याने पुणेच राहावे, बदलूच नये, असेच कुणालाही वाटेल.



# सवाई जयसिंगाचे जयपूर

राजस्थानच्या उजाड, उदास, रेताळ, मरुभूमीतून प्रवास करीत असताना, दूरवर पसरलेले ते राखी, किरमिजी रंगाचे वाळवंट पाहून प्रवाशाचे डोळे शिणतात. पण त्या शिणलेल्या डोळ्यांवर सुगंधी गुलाबपाण्याचा शिडकावा व्हावा असा आल्हाद त्याची गाडी जयपूर स्टेशनात पोचल्याबरोबर त्याच्या प्रत्ययाला येतो. 'याचसाठी केला होता अट्टाहास' असे क्षणार्धात त्याच्या मनाला उमगते आणि उल्हसित अंतःकरणाने तो जयपुरात शिरतो.

या जयपुराबद्दल त्याने खूप ऐकलेले असते. दोनशे छत्तीस वर्षांपूर्वी, (म्हणजे १७२८ साली) ज्या वेळीं भारतातच नव्हे तर पाश्चात्य देशांतही नगररचनाशास्त्र प्रगतावस्थेला पोचले नव्हते त्या काळीं इतके आखीव, रेखीव आणि सुंदर शहर उभारणाऱ्या सवाई जयसिंगाबद्दल मनात आदराची भावना बागवून तो तिथे आलेला असतो. ज्या काळीं जयसिंगाने हे चित्रवत विनटलेले 'आश्चर्य' बांधून काढले, त्या काळीं भारतीय राजकारण म्हणजे एक रणधुमाळी होती. औरंगजेब औरंगाबादेजवळ विसावला होता. मोगलांच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे, दिल्लीच्या गादीवर हक्क सांगणारे सारे वारसदार एकमेकांना कंठस्नान घालायला सदैव सज्ज होते. परकीय आक्रमणे होत होती. दक्षिणेचे मराठे उत्तरेत आपले हातपाय पसरीत होते. अशावेळी आपल्या

स्वप्नीचे हे नगर प्रत्यक्षात उतरवायला जयसिंग धजावला तरी कसा ? अस्थिर राजकारणाच्या त्या वावटळीत इतक्या भव्य, रेखीव, सुखसोईपूर्ण नगराची आखणी करणे त्याला जमले तरी कसे ? आपली अंबेर नामक पहिली राजधानी सोडून, या नव्या ठिकाणी स्थायिक व्हायचा निर्णय त्याने घेतला तरी कसा ? आणि इतके सारे असताही त्या काळी या स्थितप्रज्ञाने, देखणाऱ्याला स्तिमित करणाऱ्या जयपुरी वास्तू निर्माण तरी कशा केल्या ? ही सारी प्रश्नचिन्हे म्हणण्यापेक्षा, प्रवाशाच्या मनातील 'उद्‌गार' चिन्हेच म्हणणे बरे. कारण त्याच्या जयपूर निरखण्यात प्रश्नापेक्षा कौतुकच असते.

सवाई जयसिंगाला नगराची ती विशिष्ट रचना सुचली तरी कशी ? कल्पनेचे वारू मोकाट सोडून कुणी म्हणतो, 'अकबराची फतेपूर शिक्री त्याने पाहिली असेल.' कुणी म्हणतो, 'नाही महाराज, लक्झेंबर्गहून एक फार मोठा शिल्पकार जयसिंगाने इथे बोलावला होता.' जणू हे 'महाराज' त्या वेळी, त्या स्थळी उपस्थित होते ! एकाने तर सर्वांत वरकडी केली. त्याच्या माहिती-प्रमाणे जयसिंगाने पेकिंगहून एक चिनी शिल्पी या कार्यार्थ बोलावला होता. नगरावरील काहीशी मोगली छाप पाहून कुणी म्हणतात, दिल्लीकर बादशहाने, राजा भारमल (१५५६) पासून जयसिंगाच्या घराण्याचा 'ऋणानुबंध' जो अकबराशी व मोगली मसनदीशी जुळला होता, तो लक्षात घेऊन कुणी पर्शियन कारागीर जयपूर उभारण्यासाठी पाठविला होता. कुणी हा कारागीर बंगाली होता म्हणतात. कुणी काही. कुणी आणखी काही. जयपूरच्या बांधणीशी संबंध जोडायला इतके 'क्लेम्स्' येतात याचे कारण जयपूर सुंदर आहे !

रामाची अयोध्या प्रत्यक्ष मनूने उभारली. तिची रचना जयपूरासारखीच लंब चौकोनी होती (असे म्हणतात). अयोध्येतील पूरक रस्तेही जयपूरा-प्रमाणेच पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे धावत होते. सुंगधी फल-पुष्पदाई वृक्ष आणि आमराया यांनी अयोध्येतील बागा प्रफुल्लित असत. हे सारे जयपुराला इतके तंतोतंत लागू पडते की, वाटते जयपुराचा प्लॅन अयोध्येनेच पुरविला असावा !

कविश्रेष्ठ ग. दि. माडगूळकरांनी केलेले हे अयोध्येचे वर्णन पाहा.

शरयूतीरावरी ,
अयोध्या मनुनिर्मित नगरी ।
या नगरीच्या विशालतेवर
उभ्या राहिल्या वास्तू सुंदर
मधुनि वाहति मार्ग समांतर
रथ, वाजी, गज, पथिक चालती
नटुनी त्यांच्यावरी ॥

आणि ते शक्यही आहे. जयसिंग विद्वान होता. हुशार होता. भारतीय इतिहास व संस्कृती यांचा कसून अभ्यास त्याने केलेला होता. तो गणिती तर होताच पण खगोलशास्त्रज्ञही होता. त्याची दृष्टी शास्त्रज्ञाची होती आणि नगर-रचना शास्त्रातील बारकावे त्याला अवगत होते. जयपुराची मांडणी, त्याची सौंदर्यदृष्टी दाखविते.

जयपुरातील आडवे उभे धावणारे १११ फूट रुंदीचे प्रशस्त सरळ रस्ते आणि अफाट चौक पाहिले की, आजच्या गाजत्या पाश्चात्त शहरांची आठवण होते. प्रवासी ' मॅक्स लर्नर ' याने जयपुराला व्हेनिस व पॅरिस यांच्या पाठोपाठ तिसरा क्रमांक बहाल केला आहे, यावरून बांधणीनंतर दोनशे छत्तीस पावसाळे गेल्यानंतरही जयपूरचे ताजेपण कायम आहे याचीच ग्वाही मिळते. जयपुरातील बागा, बाजारपेठा, राजवाडे, हवामहल, जंतरमंतर साऱ्याच वास्तू इतक्या टवटवीत आहेत की, हे शहर चंदीगडप्रमाणे नुकतेच बांधून काढले असावे असे वाटते. पण प्रश्न पडतो तो हा की, जयसिंगाच्या कलासक्तमनाने जयपूरचा हा लंबचौकोनी भौमितिक आराखडा कसा पसंत केला ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. रणधुमाळीच्या काळात सरंजामशाहीतील राजधानी अशीच हवी. मग त्याभोवती जयसिंगाने बांधला तसा वीस बावीस फूट उंचीचा तट बांधता येतो. शहराबाहेर पडायला तटातून बुरुजासारखे ' पोळ ' म्हणून संबोधले जाणारे सात दरवाजेही ठेवता येतात आणि शत्रूच्या हल्ल्याच्या वेळी ते बंद करून एखाद्या गढीसारखे शहर लढविताही येते. जयसिंगाने व्यवहार आणि सौंदर्या-सक्ती यांचा सुंदर समन्वय साधून जयपूर उभारले.

जयपूरचे राजकर्ते, मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्र याच्या कुश नावाच्या मुलाशी, आपले नाते सांगतात. राजपुतान्यातील इतर अनेक महाराजांप्रमाणे

या घराण्यानेही सुरुवातीला मोगलांशी दोन हात केले. पण पुढे आपली शक्ती ओळखून अकबराच्या धोरणाला त्यांनी पाठिंबा दिला आणि १५५६ साली राजा भारमल याने आपली मुलगी अकबराला देऊन त्याच्याशी समझोता केला. हीच जहांगीराची आई. पुढे या भारमल महाराजांच्या नातवाने अकबराचे सेनापतिपद स्वीकारले. अकबराच्या सर्वश्रुत नवरत्नांपैकी राजा मानसिंग तो हाच. याच मानसिंगाच्या वंशजांकडे मोगलांचे सेनापतिपद असायचे, असा जणू रिवाजच त्यानंतर पडला. त्यामुळे मोगली अमलाच्या भरभराटीच्या काळात हे राज्य स्थिरावले, नव्हे त्याची शान वाढलीच. या गादीवर सन १६९९ मध्ये महाराजा दुसरा जयसिंग ऊर्फ सवाई जयसिंग हा आला. तो शूर तर होताच पण शिवाय विद्वान, गणिती, ज्योतिषज्ञ, नगररचनाकार, रसिकाग्रणी म्हणूनही इतिहास त्याचा उल्लेख करतो. या जयसिंगाने अंबेर नामक डोंगराळ भागात असलेली व पुष्कळदा पाण्याभावी तडफडणारी आपली राजधानी तेथून हलवायचे ठरविले आणि नव्या राजधानीकरता ५।७ मैलांवरील माळरान निवडले. जयसिंगाला आपला राजवाडाच फक्त तिथे न्यायचा नव्हता. राजधानीवासी साऱ्या प्रजेची सोय त्याला या नव्या नगरात करायची होती. त्यामुळे नगराचा आराखडा तयार करताना त्यात बाजारपेठा, उद्याने, राहती घरे, कारागिरांच्या वस्त्या, मंदिरे, तळी, विहिरी या सर्व गोष्टींची स्थाननिश्चिती करावी लागली आणि सहा विभागांमध्ये त्याने नगराची आंखणी केली.

जयपूरचे रस्ते आजही इतके रुंद आहेत की, एखाद्या मोटारवाल्याने निष्काळजीपणे मोटार हाकायची असे ठरविले तरीही अपघात व्हायचा नाही. जयपुरातील रस्त्यातून उंटांचा तांडा प्रशस्तपणे चाललेला असतो, पण त्यामुळे रहदारीला अडथळा होत नाही. जयपूरचे रंगारी, रंगविलेल्या कापडाची टोके धरून रस्त्यावरून ते वाळवीत असतात. चांभार, कुंभार कित्येकदा रस्ता वा पदपथ अडवितात पण जयपुरातील रहदारी निरोधिली जात नाही. रस्त्याच्या दुतर्फा एकाच रंगाची, एकाच साच्याची साधारण सारख्याच उंचीची घरे हारीने मांडली आहेत. विविधतेस सौंदर्य असते ही गोष्ट खरी; पण अशा एकजिनसीपणातही एक आगळे सौंदर्य असते हे जाणून घेण्याकरता जयपूर पाहायला हवे. त्रिपोली बाजारासारखा खूप मोठा बाजार जवळजवळ तीन मैल चालले तरी संपता संपत नाही. जवाहिरे, रंगीबेरंगी छापील कापड व वायल, गिलिटाची भांडी

( जयपूरसारखे गिल्टिचे काम भारतात कुठेच होत नाही ), चंदनी सामान, हस्तीदंती नक्षीकाम, रंगीबेरंगी लाकडी वस्तू एक ना दोन-हजारो कला कुसरीच्या वस्तू इथले कारागीर तयार करतात व विक्रीला मांडतात. या मारवाडी बाजारातून मारवाड्यासारखे खिशावर हात ठेऊन फिरलात तरच पुढच्या प्रवासाकरता खिशात पैसे उरतील !

जयपूरच्या मध्यभागी जयसिंगाने राजवाडा बांधला. राजवाडा व बालेकिल्लाही. एकंदर जयपुराच्या एक सप्तमांश भागावर हा राजवाडा उभा आहे. राजवाड्याभोवती सर्व बाजूंनी कोट उभारून त्यात चारी बाजूला चार दिंड्या राखल्या आहेत. आज या कोटात एवढ्या इमारती उभ्या आहेत की त्यांतली कोणती, कुणी, केव्हा बांधली हे सांगणे कठीण. मुख्य राजवाडा लाल संगमरवराचा असून त्याचे प्रवेशद्वार सोनेरी आहे. ही भव्य इमारत कमानी, नक्षी, रंगकाम यांनी इतकी सुशोभित केलेली आहे की, मती क्षणभर गुंग होते. राजवाड्याचा बराचसा भाग म्हणजे वस्तुसंग्रहालय आहे. या राजवाड्याचा एक भाग असलेला सात मजली चंद्रमहाल म्हणजे या वाड्याचे भूषण आहे. त्याच्या वाड्याच्या मजल्यावरून सारे जयपूर दिसते. वाड्यातील दिवाण-ई-आम, दिवाण-ई-खास, घड्याळघर, आर्मरी वगैरे भाग प्रेक्षणीय आहेत.

चंद्रमहालाच्या पूर्वेला जयसिंगाची ' जंतरमंतर ' म्हणून ओळखली जाणारी वेधशाळा आहे. जयसिंगाने दिल्ली, वाराणशी, उज्जैनी व मथुरा अशा आणखी चार ठिकाणी ' जंतरमंतर ' वेधशाळा बांधून काढल्या आहेत. त्यांपैकी मथुरेची पडून गेली. इतर ठिकाणच्या उभ्या आहेत. पण या सर्वांत जयपूरच्या राजवाड्याच्या कोटातील ही वेधशाळा सर्वांत मोठी आहे. या वेधशाळेच्या आवारात स्वकल्पित विविध यंत्रे, जयसिंगाने चुन्याविटांनी बांधून काढली. १७१८ पासून १७३४ सालापर्यंत तो ही बांधीत होता. या वेधशाळेत आकाशस्थ ग्रहनक्षत्रांची उंची मोजणारी रामयंत्रे आहेत, राशिवलये आहेत. वेलामापक सम्राट यंत्र आहे, दक्षिण भित्तियंत्र आहे, खगोलाचा नकाशा आहे, क्रांती, कपालि, चक्र या नावांनी ओळखली जाणारी आणखीही काही यंत्रे आहेत. त्या यंत्रांच्या पसाऱ्यातच राजा जयसिंगाचे आसन दाखवितात. तिथे बसून तो ज्योतिषज्ञ आकाशस्थ ग्रहताऱ्यांचे वेध घेत असे त्या काळीं. या जंतरमंतर मधील यंत्रांचे आकार भूमिती पद्धतीने काटेकोरपणे ठेवले आहेत.

जयसिंग सौंदर्यभोक्ता असूनही इथल्या वर्तुळांना, अर्धगोलांना वा लंबचौकोनांना 'सुशोभित' करण्याचा मूर्खपणा त्याने केला नाही. प्लेटोप्रमाणेच नुसत्या रेषेच्या सौंदर्यावरही त्याची श्रद्धा होती.

जाळीदार कमानींच्या पाच मजली भिंतींच्या साहाय्याने, वाळवंटावरून वाहून येणारी हवा थंड करून राजवाड्यात सोडण्याच्या कल्पनेने बांधलेला "हवामहल" जयपुरातील एक आकर्षण मानले जाते. पहिल्या महाराजा माधवसिंगाने १७६० च्या दरम्याने ही भिंत उभारली. फक्त तळमजल्यातच या भिंतीला रुंदी आहे. वर ती निमुळती होत गेली आहे. 'हवामहल' म्हणजे राजस्थानी शिल्पकलेचा एक अप्रतिम नमुना आहे.

जयपूरच्या बागा मोगली थाटाच्या आहेत. त्यांतील शहराच्या तटा बाहेरील रामबाग, ३६ एकर भूभागावर पसरली आहे. ती बाग आहे व प्राणिसंग्रहालयही आहे. तिच्या मध्यभागी ब्रिटिश युवराजांच्या आगमनाची स्मृती म्हणून उभारलेला संगमरवरी वाडा आहे. आज तिथे वस्तुसंग्रहालय आहे. त्यात जयपूरचे सारे अधिपती चित्ररूपाने उभे आहेत. जयपूरच्या जामदारखान्याची झलकही तिथे मिळते. अनेक नक्षीदार वस्तू डोळे खेचून घेतात. पण सगळयांत महत्त्वाची कलावस्तू म्हणजे मिर्झा राजे जयसिंग यांनी मिळवलेला जगातील एक उत्कृष्ट गालिचा. ज्याच्या घोड्याच्या टापांखाली आपल्या शरीराचा गालिचा अंथरायला श्री शिवाजी महाराज तयार झाले होते तो हाच मिर्झा राजा जयसिंग!

जयपुरात रामबागेशिवाय 'ट्रॅन्स्पोर्ट गार्डन' वा 'नया घाट' बाग आहे. शिवाय नगर राजवाड्याचा साराच परिसर वृक्ष, वेली, गवती उद्याने आणि कारंजी यांनी भरलेला आहे. १८४४ साली स्थापन झालेले महाराजा कॉलेज आता जयपूरच्या तटाबाहेर स्वतंत्र भव्य इमारतीत आहे. जयपुरी कला कुसर जिवंत राहावी व वाढावी म्हणून उभे केलेले 'स्कूल ऑफ आर्ट' गिलिटाचे काम भरतकाम, विणकाम आदि खास जयपुरी कला शिकविते.

नगराबाहेर, ईशान्येला, जयपूरच्या राजघराण्यातील व्यक्तींच्या समाध्या आहेत. त्यांच्या भोवती असलेली बाग फारच सुंदर जोपासली असल्याकारणाने हेही ठिकाणी रमणीय अन एकदा पाहिलेच पाहिजे अशा सदरात मोडते. या समाध्यांपैकी, शुभ्र संगमरवरी, घुमटाकार असलेली, २० नक्षीदार खांबांनी

पेलून धरलेली आणि पुराणातील प्रसंग चित्रित करून विनटलेली समाधी सवाई जयसिंगाची.

नंदनवनिचा अनिल वाहतो स्वच्छंदपणे ज्या स्थळीं
समाधि त्याची पाहुनि वाटे रसिक विसावे जगी ॥

जयपुराच्या उत्तरेला आणि पूर्वेला डोंगररांगा आहेत. या डोंगररांगांच्या माथ्यावर, पूर्वकाळी जयपूरचे संरक्षणकर्ते असलेले अनेक किल्ले विराजमान झाले आहेत. शहराच्या वायव्य दिशेने जयपुरात डोकावून पाहताना दिसतो तो नहरगड वा शार्दूल किल्ला. अशाच एका किल्ल्याच्या आश्रयाने जयपुराआधीची या राज्याची अंबेर नामक राजधानी वसली होती. जयपुराहून मोटारने वा टांग्याने ती गाठता येते. अंबेरचा राजवाडा राजा मानसिंगाने आणि मिर्झा राजे जयसिंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या पहिल्या जयसिंगाने बांधला. वाड्याच्या दारात असलेल्या सरोवरात आपले प्रतिबिंब पाहत आज तो शांतपणे पहुडला आहे. वाड्याचे शिल्प, नक्षी, कलाकुसर प्रेक्षणीय नव्हे तर मन सुखावणारी आहे. राजवाड्यातले 'सोहाग मंदिर', 'जय मंदिर', 'जस मंदिर', 'आरसे महाल', 'सुखनिवास' आदि भाग या राजघराण्याच्या ऐश्वर्याची साक्ष देतात. वाड्याच्या आवारात असलेले शितळादेवीचे वा मानेश्वरीचे मंदिर सुबक व श्रीमंत तर आहेच पण तिथली सजावटही मन वेधून घेते. जयपूरवाल्या राजघराण्याची ही कुळदेवता. कुठेलेही काम अंगावर घेताना वा प्रवासाला निघताना जयपूरच्या राजगादीवरचे पुरुष हिचे दर्शन प्रथम घेत आले आहेत.


जयपूर असे सुंदर आहे म्हणूनच परदेशचा कुणी बडा पाहुणा भारतात आला की, त्याची भारतभेट जयपूरभेटीविना सफल होत नाही. मग ती राणी एलिझाबेथ असो, मिसेस केनेडी असो की एखादा मंत्री, मुख्यमंत्री असो. जयपूरच्या राजरस्त्यातून हत्तीवरील सुशोभित, अलंकारित अंबारीतून त्याची मिरवणूक निघणारच.

पण यात जयपुरी लोकांचाही मोठा वाटा आहे. भली मोठी भडक रंगाची पागोटी वाहणारे हे पुरुष आणि त्यांच्या रंगीबेरंगी घागरा पेहेनलेल्या आणि जगातील यच्चयावत धातूंचे अलंकार अंगावर घालणाऱ्या स्त्रिया, ही मंडळी गबाळी दिसली तरी त्यांनी आपले शहर कसे लख्ख ठेवले आहे दोन सव्वादोनशे वर्षे झाली तरी ! जयपुराची वस्ती चार साडेचार लाख झाली तरी ! जय-

पूर उभारणाऱ्या सवाई जयसिंगालाच सौंदर्यदृष्टी होती असे नव्हे तर या त्याच्या प्रजाजनांनाही ती आहे. अयं विशेषः ! जयपुरातील घरांच्या भिंतींवर देवाङ्किांची चित्रे दिसतात. त्यांत गोपाळकृष्ण प्रामुख्याने दिसला तरी विघ्नहर्ता गणेशही दिसतो. अलीकडे, प्रवाशांचे पाहून पाहून जयपुरातील स्त्रीपुरुषांना " फोटु " काढून घ्यायचे वेड लागले आहे. जयपुरी लोकांनी जुने ते सर्व नीट जतन करून ठेवले असले तरी जयपुरी घराण्याचे खास ' कथ्थक नृत्य ' आणि नृत्यकार मात्र इथून परागंदा का झाले कळत नाही.

जयपुरावर कितीही लिहिले तरी थोडेच. जयपूर पाहून मी थक्क झालो, स्तिमित झालो, आणि ही जयपूरस्तुती करायला उद्युक्त झालो. भाट बनून स्तुतिपाठ गाणे हा तर खास जयपुरी घाट ! जयपूर पाहून माझ्यावर त्याचा परिणाम न झाला तरच नवल !

इतर सर्व भारतीय शहरांप्रमाणे जयपुरावरही औद्योगीकरणाची लाट येऊ घातली आहे. यांत्रिक शेती, गौळीवाडे, आणि लहान मोठे उद्योग जयपुराच्या परिसरात रुजले आहेत. राजस्थान राज्याच्या या राजधानीने भारतातील पंचायत राज्याचा प्रयोग प्रथम अंगीकारला. राज्यकर्त्यांच्या प्रत्येक योजनेला उचलून धरण्याची जयपूरची परंपरा आहेच ! आज जयपुराचे लक्ष लागलंय राजस्थान काल्व्याकडे. तो आला की जयपुराचे आजचे मरुवेटाचे स्वरूप दूर होईल आणि थरचे वाळवंट ' गिळू ' म्हणत असलेली ही भूमी सस्य शामल होईल. मग आज फक्त जयपुराच्या परिसरात दिसणारे मोर या सर्व राजस्थानी भागात पसरतील आणि ' म्या ओ म्या ओ ' अशी साद घालीत जगाला सांगतील " हे पाहा इथे खरोखरीचे नंदनवन फुलले आहे. "



# इंद्रप्रस्थ दिल्ली

इंद्रप्रस्थ दिल्ली ! भारतीय राजकारणात नेहमीच बडे प्रस्थ म्हणून गणली गेलेली दिल्ली. प्रातःस्मरणीय राजा युधिष्ठिराचे ते इंद्रप्रस्थ. खांडव-वन-दाह करून यमुनेच्या काठी उभारलेले ते नगर. ईशान्येस ६५ मैलांवर असलेल्या हस्तिनापुराशी फाळणी करावी लागल्याने उभे झालेले व धर्मराज द्यूत हरल्यानंतर, इंद्रप्रस्थ की वानप्रस्थ या प्रश्नातून जिथे भारतीय रण माजले राजनीतीमध्ये सूक्तासूक्त मार्गाच्या अवलंब करण्याचा पायंडा, म्हणजे ' देहली ( उंबरठा ) पडला, गीता सांगितली गेली आणि विसरलीही गेली ती दिल्ली. '

विक्रमादित्य, चंद्रगुप्त, अशोक, हर्षवर्धन इत्यादि महापराक्रमी सम्राटांच्या राज्यांची शान वाढविणारी ती दिल्ली. राजा अनंगपाल तोमराची दिल्ली. दिलदार अन् बेदरकार पृथ्वीराज चौहानाचा तो ' रायपिठोरा '. सहा मुसलमानी वंशांचे ते राजपीठ. एकाच आसमंतात, कुतुब, सिरी, तघलखाबाद, जहांपनाह, फिरोजाबाद, पुराणा किल्ला, शहाजहानाबाद अशा नावांनी सात वेळा पुन्हा पुन्हा वर उठलेले आणि जमीनदोस्त झालेले ते नगर. भारतीय साम्राज्याचे ते शक्तिपीठ. आज जागतिक राजकारणाचे केंद्र बनलेली ती दिल्ली.

भारताची राजधानी होण्याकरिताच जणू तिचा जन्म झाला—एकदा नव्हे अनेकदा. याचे कारण तिची रुधिरप्रियता. दिल्ली ही समाध्यांनी आणि थडग्यांनी व्यापिलेली अशी मोठी स्मशानभूमीच आहे. समाध्या अन् मकबरे

उभारले जातात ते पुरुषर्षभांच्या अस्थींवर. ही गोष्ट लक्षात घेतली की, इथल्या मातीत मिसळलेल्या राजपुरुषांच्या संख्येची कल्पना यावी. या दिल्लीच्या राजपीठावर ५३ बादशहा अहमहमिकेने विराजमान झाले. पण इतिहास असे सांगतो की, त्यांपैकी अठ्ठावीसांना तुरुंगवास पत्करावा लागला अगर त्यांचे खून झाले. दोघे रणमैदानात कामी आले. अशोकपुत्र कुणालाची गत आणखी दोघांच्या नशिबी आली; तर कित्येकांना सिंहासनावरून जबरदस्तीने पदच्युत करण्यात आले. १८५७ सालचा रणसंग्रामही इथे मोठ्या अटीतटीने लढला गेला. एका माथेफिरूने ४८ साली राष्ट्रपित्याची हत्या केली ती इथेच. या रुधिरप्रिय नगरीने अनेक राजवंशांचा फन्ना उडविला. इथली वास्तुदेवता रक्तपिपासू असावी. म्हणूनच या देशाची अधिसत्ता हाती आल्यानंतर सनातनी ब्रिटिश राज्यकर्ते दिल्लीला आपली राजधानी आणायला काकू करीत होते !

दिल्लीच्या दिल्लीश्वरांनी आसमंतात कुरुक्षेत्री सांगितलेली गीता विस्मृतीत जमा केली, तरी दिल्लीने तिला शिरोधार्य मानले असे म्हणायला हवे. इतके राजवंश इथे नांदले; इतके वैभव इथे उभे राहिले आणि मातीत मिळाले; इतके राजनैतिक विचार आणि आचार, कला आणि कुसरी इथे जोपासल्या गेल्या; पण कुणाचाही तसा ठसा दिल्लीवर उमटला नाही. फ्लॉरेन्स शहरातून वावरणाऱ्या स्त्रियांचे चेहरे, प्रबोधनकाळात, बॉट्टिसेली की बॉसेली नामक चित्रकाराने काढलेल्या चित्रांतील रमणींसारखे आजही वाटतात. ( असे म्हणतात ! ) पण दिल्लीवर अधिपत्य करणाऱ्या कुठल्याही राजवंशाचा असा ठसा दिल्लीकरांवर वठला नाही. दिल्लीसारखेच, जगातील दुसरे पुरातन नगर म्हणजे रोम. पण रोमच्या संस्कृतीत व्हर्जिल व मायकेल ॲन्जेलो, नीरो, मुसोलिनी आणि जस्टीनियन या साऱ्यांच्या आचारांचा, विचारांचा वा कलेचा जो सुंदर मिलाफ प्रत्ययाला येतो; जुन्याचा सन्मान आणि नव्याचे आदरपूर्वक स्वागत करण्याची जी वृत्ती दिसून येते, त्याचे दिल्लीला वावडे आहे. कायमचे, कुणाला डोक्यावर घेऊन बसायला ती तयार नाही. “ men may come and men may go but I go on forever ” या टेनिसनच्या ओळी म्हणणारा ‘ ब्रुक ’ आणि ही दिल्ली, यांची कमलपत्री वृत्ती सारखीच !

दिल्लीला मी तीन चार वेळा गेलो आणि दिल्लीच्या या विचित्र वृत्तीची जाणीव माझ्या मनावर प्रकर्षाने ठसली. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीचे हे केंद्र. योजनांचे निळे कागद मोठ्या प्रमाणावर निर्माण करणारा हा कारखाना! इथे कागदांच्या फायली कबुतरी कोनाड्यातून जितक्या जपून ठेवण्यात येतात, तितक्या आस्थेने इतिहासाच्या समक्षा जपल्या जात नाहीत. काळाच्या उदरात गडप झालेल्या 'काल'पेक्षा 'आज'ची चिंता जनमनाला अधिक. लाल किल्ला, जुम्मा मशीद, कुतुबमीनार वा हुमायुन बादशहाच्या थडग्यापेक्षा राजघाट, शांतिवन त्यांना अधिक जवळचे वाटते. आज ते तेथे श्रद्धेने जाताना दिसतात.

आणि हे असे व्हावे अशीच दिल्लीची परंपरा आहे. 'गेलेल्याचा शोक फुका' करण्याची दिल्लीला सवयच नाही. सारे कसे 'राजे'शाही! वागण्यात अदब आहे पण शिस्त नाही. दिसण्यात डौल आहे पण चालण्यात रुबाब नाही. कुठल्याही गोष्टीची ना खंत ना खेद! माणसे आहेत शांत, तशी सुस्वभावी पण भारीच गबाळी. गणवेष नसलेले, फाटक्या पायजम्यांत आणि रकट्या कोटांत वावरणारे बसड्रॉयव्हर्स आणि कंडक्टर्स तुम्हांला दिल्लीलाच भेटतील. बिचारे भाजीच्या पिशवीत पैसे गोळा करीत असतात आणि हातात धरलेल्या तिकिटांच्या चवडीतून तिकिटे वाटीत असतात! पण वागण्यात अदब मोठी. प्रत्येक पुरुष तिथे जनाब, बाबूजी, भाईजी बनतो, तर वय-विचार लक्षात न घेता प्रत्येक स्त्री बेहेनजी, माताजी या पदवीला पोचते. "क्यू" ही युद्धोत्तर काळातील नागरी चीज दिल्लीला ठाऊक नाही. बस असो, सिनेमा असो, रेल्वेची खिडकी असो, ऐतिहासिक पद्धतीनेच इथे सारे सारे प्रश्न धसाला लावले जातात.

सायकल हे पुणेकराप्रमाणेच दिल्लीकराचे 'व्यवच्छेदक लक्षण.' पण सायकलीला तो एकाच माणसाला वाहून नेणारे वाहन मानीत नाही. आपली बायको, मुले, बाजले, पिशव्या, कोंबड्या ठेवायच्या टोपल्या, डबे आदि विविध वस्तू एकाच वेळीं वाहून नेण्याचे ते एक बहुगुणी वाहन आहे, असा त्याचा समज असतो! हे सारे 'बिऱ्हाड' घेऊन तो रस्त्याने आगेकूछ करीत असता रहदारीनियंत्रक पोलिसाचा त्रास त्याला कधी होत नाही. त्याचा हात तोडूनही स्वारी गाडी पुढे रेटील! त्याने हटकलेच तर, 'माफ करो भाई' असे निगर-

गड्डपणे म्हणून पठ्या मोकळा होईल. पण तरीही कायदा तोडण्याबद्दल पोलीस त्याला काही सुनावू लागला तर उलट आपल्या अस्तन्या मागे सारून तो पोलिसाजवळ हमरीतुमरीवर यायला कमी करणार नाही. तोंडाने पालुपद हेच की, ' एक दफे माफ कर दो बोला, फिर क्या ? ' या वादावादीमुळे गर्दी जमली, आणि ती तशी जमतेच, तर साऱ्या बघ्यांना तो आपले म्हणणे जोरजोराने सांगत सुटेल. दिल्लीकर गर्दीवालेही बेटे असे की, यावर त्यांच्यापैकी एखादा पोलिसालाच विचारतो, ' उसने एक दफे माफ कर दो कह दिया न, और फिर क्या ? '!

एका खेपेला दिल्ली पाहण्याकरता मी एक टांगा ठरविला होता. जुन्या दिल्लीतील अनेक स्थळे पाहता पाहता संध्याकाळ झाली. तो दिवस गुरुनानकजयंतीचा होता. दिल्लीसारखी या शिखधर्म संस्थापकाचीजयंती इतरत्र क्वचितच साजरी होत असेल. आम्ही परतू लागलो तर सारे रस्ते शिखांच्या प्रचंड मिरवणुकांमुळे चिक्कार भरून वाहत होते. ' आता घर कसे गाठणार ? ' या माझ्या प्रश्नचिन्हाला टांगेवाल्याने आपल्या कृतीने उत्तर दिले. त्याने रस्त्याच्या कडेच्या फुटपाथवरून आमचा टांगा हाणायला सुरुवात केली. मी थक्क झालो. ' असे करून कसे चालेल ? ' असे विचारता, तो घोडा दामटीत आणि फूटपाथवाल्या पादचाऱ्यांना हटकीत म्हणाला, ' उसमें क्या हुवा बाबूजी ? उधर जगा नहीं तो कैसे जावें ? '

आपले घोडे असे दामटणाऱ्यांचीच दाद दिल्लीत चटकन लागते. तुम्ही कायद्याने चालू म्हणालात तर तिथे तुम्हांला बसमध्ये चढता यायचे नाही. टांगा ठरविता यायचा नाही. रिक्षा वा टॅक्सी मिळायची नाही. ' वजन ' खर्ची घातले नाहीत तर लोकसभेच्या प्रेक्षकांच्या गॅलरीतही तुम्हांला शिरकाव करून घेता यायचा नाही. राजवटी बदलल्या, टोप्या बदलल्या, पण दिल्ली आहे तशीच आहे.

एके काळी दिल्लीचे नवी आणि जुनी असे दोन भाग मानले जात. पाहणाऱ्याला जाणवतही. जुनी दिल्ली म्हणजे शहाजहान बादशहाने वसविलेले शहाजहानाबाद. आणि तिच्या दक्षिणेस सर एडविन ल्युटेन्स् ( Lutyens ) या नगर-रचनाकाराने आखून बांधून काढलेली, अंतरिक्षातून कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे वाटणारी ती नवी दिल्ली. ती ब्रिटिशांनी बांधली. या नव्या दिल्लीच्या

दक्षिणेला आणि पूर्वेला जवळ जवळ ७० चौरस मैलांच्या परिसरात जुन्यात जुन्या दिल्लीचे अवशेष विखुरलेले दृष्टीस पडतात.

या अवशेषांना वाट पुशीत, इतिहासाचा मागोवा घेत, भरल्या अंतःकरणाने पण विचक्षण दृष्टीने हा आसमंत फिरलात तर प्रथम भेटेल फिरोझाबाद. शेरशहाची राजधानी. इथेच फिरोजशहाचा कोटला म्हणजे किल्ला दृष्टीस पडेल. शेरशहाच्या या राजधानीची बरीचशी हद्द पुढे शहाजहानने आपल्या नगरात सामावली. आणखी पुढे दक्षिणेला गेलात की भेटेल 'पुराणा किल्ला'. त्याला बोलता आले असते तर त्याने पाचापांडवांच्या राणीची–द्रौपदीची करुण कहाणी तुम्हांला ऐकविली असती. पण पुराणा किल्ल्यात काय किंवा त्याच्या आसमंतात काय, पांडवांची नावनिशाणी सांगणारी एकही वास्तू आजवर उत्खननातही गवसलेली नाही. लोककथा सांगते की, ही मूळची पांडवांची वास्तू. हा किल्ला आणि आसमंत प्रदेश या भागात पांडवांची वैभवशाली राजधानी विसावली होती. इतिहासकाळात इथे घडलेली महत्त्वाची घटना म्हणजे किल्ल्याच्या वास्तूत शेरशहाने उभारलेल्या दोन मशिदींपैकी एकीच्या म्हणजे शेरमंडलाच्या जिन्यावरून उतरताना बादशहा हुमायून घसरून पडला आणि दोन तीन दिवसांतच त्याचा अंत झाला.

दिल्ली–मथुरा रस्त्याने आणखी पुढे दक्षिणेला सरकलात की, हुमायूनची कबर लागेल. मोगल राजवंशातील शेवटला पुरुष आणि १८५७ सालच्या रणसंग्रामातील एक प्रमुख व्यक्ती ब्रिटिशांनी इथेच कैद केली. तिचे नाव बहादुरशहा. हुमायुनाच्या कबरीच्या पश्चिमेस भेटतो निझामुद्दीन औलियाचा दरगा. तघलखाबादच्या शहाशी या औलियाचे वैर निर्माण झाले. दंतकथा असे सांगते की, यामुळे चिडलेल्या शहाने या औलियाला दिव्यात जाळण्याकरता तेलच मिळू नये अशी आज्ञा केली. पण काय आश्चर्य ! जवळच्या तळ्याचे पाणीच तेलासारखे दिव्यात जळू लागले. हे शहाला कळले. त्याने अवलियाला शिव्यांची लाखोली वाहिली. यावर या औलियाने तघलखाबाद नगरालाच असा शाप दिला. "या बसे गुजर, या रहे उजड़" 'तुझ्या या शहरात फक्त गुजरांचीच वस्ती राहील किंवा ते ओसाड तरी पडेल.' मधल्या काळात ग्यासुद्दिन तघलख बंगालची बंडाळी मोडण्याकरता तिकडे गेला होता. तो परतला आणि यमुनेच्या पलीकडच्या तीरावर येऊन पोचला. नगरात त्याच्या स्वागताची

तयारी चालू होती. औलियाचा शाप त्याच्या कानी पोचला होता आणि औलियावर तो फार रागावला होता. आता बादशहा शहरात परतला की आपल्या गुरूची धडगत नाही असे औलियाच्या शिष्यांना वाटले. आपला दरगा सोडून औलियाने दुसऱ्या कुठे तरी निसटून जावे म्हणून ते घाई करू लागले. यावर औलिया म्हणे उद्गारला, 'हनोज देहली दूर अस्त.' ( दिल्ली तो बहोत दूर है। ) दुसऱ्या दिवशी बादशहा त्याच्या स्वागतार्थ उभारलेल्या मंडपात पोचला तोच तो मंडप कोसळून त्यात तो मारला गेला. राज्यलोभाने शहाच्या मुलानेच, महम्मदशहानेच आपल्या बापाचा हा मृत्यू घडवून आणला असे इतिहास सांगतो. पण औलियाच्या वरील उद्गारांच्या अनुरोधाने कुणी म्हणतात या खुनात त्याचाही हात होता. खरे काय असावे खुदा जाने! 'हनोज देहली दूर अस्त' ही औलियाची उक्ती मात्र एक वाक्प्रचार बनली आहे.

औलियाच्या या दरग्याच्या आसमंतात कितीतरी कबरी, मशिदी व इतर वास्तू दिसतात. त्यांतली चौसाठखंबा नामक चौसष्ट खांबी इमारत अकबराच्या एका दूधभावाची. इथून सरळ पश्चिमेला ३–४ मैल आलात की, लागेल सफदरजंगाची कबर. आज तिथे जवळच रेसकोर्स आहे आणि विमानतळही आहे. मोगली काळातील वास्तुशिल्पाचा १७५३ साली उभारलेला सफदरजंगाची कबर हाच शेवटचा नमुना. या कबरीच्या दक्षिणेला असलेल्या रणभूमीवर तैमूरलंगाने महम्मदशहा तघलखाचा पराभव केला. लाखो माणसे ठार करून त्यांच्या मुंडक्यांची उतरंड त्याने इथेच पलीकडे लावली होती! पुढे दक्षिणेला मैलभर गेल्यावर, पूर्वेच्या बाजूला अल्लाउद्दिन खिलजीने उभारलेल्या 'सिरी' नामक ऐतिहासिक नगरीचा तट लागतो. जवळच अनेकघुमटी बेगमपूर मशीद दिसते. रस्त्याच्या पश्चिमेला झाडांच्या शेंड्यांतून डोकावणारा एक मोठा घुमट आपल्याला बोलावतो. ती फिरोजशहा तघलखाची दफनभूमि! 'हौज़ खास' नामक तलावाच्या नैर्ऋत्य टोकावर ती उभी आहे.

मैलाचा नववा दगड ओलांडला की, 'जहापनाह' नामक वास्तूचे अवशेष दिसतात. तिथून पुढे मैलभर दक्षिणेला गेले की, पृथ्वीराज चौहानांचा 'रायपिठोरा' किल्ला दिसतो. पृथ्वीराजाला त्याची प्रजा प्रेमाने 'राय पिठोरा' म्हणायची. रायपिठोरा किल्ल्याच्या तटावरून कुतुबमीनार, कुतुबमशीद,

लोहस्तंभ, अलाईमीनार सांभाळणारी 'लालकोट' नामक मूळची पृथ्वीराजाची पण मग मुसलमानी बनलेली वास्तू दिसते. सारा लालकोटच रायपिठोऱ्याच्या हिंदू मंदिरांवर उभारला गेला. आज या भागात जमिनीखाली ५–१० फुटांवर त्या मंदिरांचे अवशेष दृष्टीस पडतात असे म्हणतात. कुतुबमशिदीचे बरेचसे भाग हिंदू व जैन मंदिरांच्या अवशेषांचे बनले आहेत हे सहज लक्षात येते. एक दावा असा की, ही मशीदच रायपिठोऱ्याच्या विष्णूमंदिरावर उभारली गेली. तिच्या पुढचा २३ फूट ८ इंच लांबीचा आणि १६ इंच व्यासाचा भव्य लोहस्तंभ म्हणजे लोहशुद्धीकरण शास्त्रातील एक आश्चर्यच म्हटले जाते. तो इथे कुणी उभारला याबद्दल दुमत आहे. पण त्यावरील लेख सांगतो की, तो चौथ्या शतकातील 'चंद्र' नावाच्या राजाने बाल्हीक राष्ट्रांवरील आपल्या विजयाचे चिन्ह म्हणून तो विष्णुपदी अर्पिला. पूर्वी हा स्तंभ 'गरुडध्वज' असावा. हा प्रचंड लोहस्तंभ त्या काळी ओतला तरी कसा गेला ? की भारतात लोहशुद्धी-करण तंत्र एवढे प्रगत होते ? 'या लोहामध्ये कच्च्या लोखंडात आढळणारे मॅंगेनीज् मुळीच सापडत नाही हे आश्चर्य होय.' असे उद्‌गार सर रॉबर्ट हॅडफील्ड या ब्रिटिश संशोधकाने काढले. त्यामुळे हा लोहस्तंभ भारताचा खूप मोठा व महत्त्वाचा वारसा ठरला आहे.

जी गोष्ट लोहस्तंभाची; तीच कुतुबमीनाराची. कुणी म्हणतात, तो पृथ्वीराजाने आपल्या पत्नीला वा मुलीला घरबसल्या यमुना-दर्शन व्हावे म्हणून उभारला. कुणी म्हणतात, तो तोमर राजघराण्याचा विजयस्तंभ आहे. आज मात्र तो नाव सांगतो कुतुबुद्दिन ऐबकाचे. २३८ फूट उंचीचा हा पाच मजली विजयस्तंभ. दोघातिघा मुसलमान राजांचा तो उभारण्यात हातभार लागला असे सांगितले जाते. त्याचे पहिले तीन मजले आहेत लाल दगडाचे तर वरचे दोन मजले आहेत संगमरवराचे. ही इमारत मोठी डौलदार दिसते. आज धाडसी आत्म-हत्या आणि चोरट्या खुनांचे माहेरघर म्हणून दिल्ली या भागाला ओळखते ! कुतुबमीनारावरून दिल्लीच्या साती वास्तूंचे विहंगम दृश्य मोठे नयनमनोहर दिसते.

कुतुबजवळच 'इस्सेभी ज्यादा' मोठा मीनार उभारण्याचा अर्धवट सोडून दिलेला एक प्रयत्न दिसतो. 'अलाई मीनार' म्हणून तो प्रसिद्ध आहे. ८७ फूट उंचीचा तो मीनार पुरा झाला असता तर पाचशे फूट उंच झाला

असता असे त्याचा आवाका जाणवून देतो. कुतुबमीनाराच्या पश्चिमेचे योग-मायेचे मंदिर या भागाच्या पुरातन हिंदुत्वाची साक्ष देते. आणखी काही दरगे आणि काही मशिदीही या भागात विखुरल्या आहेत.

पूर्वेस पाच मैलावर तघलखाबादचा किल्ला दिसतो. चार मैल घेराचा हा प्रशस्त किल्ला प्रचंड शिळांनी बांधला आहे. त्यातील मोठ्या शिळा १४ फूट लांब, दोन-सव्वादोन फूट रुंद आणि फूटभर जाड आहेत. त्या एकेका शिळेचे वजन ६ टन भरेल असे म्हणतात. अशी शिल्पे पाहिली आणि ती उभारली गेली तो काळ विचारात घेतला की, मन चकित होते. किल्ल्यातील बालेकिल्ला, तळीं, राहण्याच्या जागा, तटावरील शिपायांच्या खोल्या, किल्ल्याच्या दक्षिणांगास जोडून जलमंदिराप्रमाणे उभारलेले तघलखशहाचे थडगे, सारे पाहून आणि हा ओसाड मुलूख पाहून निझामुद्दीन औलियाच्या ' या रहे उजड़ ' या शापवाणीची आठवण होते आणि मन सुन्न होते. दिल्लीत अशी ठिकाणे जागोजाग विखुरली आहेत.

दिल्ली अशी सात वेळा वसली आणि उसकटली असली तरी तिची सात वेळा झालेली उभारणी नालंदाप्रमाणे वा ' ट्रॉय 'सारखी एकावर एक थर चढवून झाली नाही. उलट दिल्लीच्या सिंहासनावर एकामागून एक आलेल्या राजवंशांनी वैराण मुलूख आणि पूर्वराजधानीची गिचमिड वस्ती टाळण्याकरिता उत्तरोत्तर उत्तर दिशा पत्करली. शहराचा हा ' उत्तर दिग्विजय ' शहाजहानाबादच्या उभारणीनंतर थांबला. १८५७ साली मोगल साम्राज्याचा संपूर्ण अस्त झाल्यावर पुन्हा एकदा नवी दिल्ली वसली. पण या वेळीं तिच्यावर अधिपत्य गाजविणाऱ्या ब्रिटिशांनी या उत्तरप्रवासाला पलट देऊन शहाजहानाबादच्या दक्षिणेला आपले भूमितीतील विविधाकृतीयुक्त असे नवे नगर वसविले. गेल्या पाच पन्नास वर्षांत व विशेषतः गेल्या वीस वर्षांत नगराचा दक्षिण–पूर्व प्रवास पुन्हा सुरू झाला आहेसे वाटते.

नव्या दिल्लीच्या मानाने बेशिस्त, बकाल वाटणारी जुनी दिल्ली. या नगराला पूर्वकाळीं कोट होता आणि त्यात सात प्रचंड वेशी ठेवलेल्या होत्या. जुन्या दिल्लीच्या आजच्या वाढीला आणि सुधारणांना वाव करून देण्याच्या कामी त्यातील चारांना ' नामशेष ' व्हावे लागले.

दिल्ली हे नाव घेताच तेथील दोन मीनारी भव्य जुम्मा मशीद व चांदणी

चौक साऱ्यांना आठवतो. चांदणी चौकाच्या पूर्व टोकाला सुंदर जैन मंदिर आहे, तर दुसऱ्या टोकाला येते फत्तेपुरी मशीद. मधल्या अर्ध्या मैलाच्या रस्त्याला म्हणतात चांदणीचौक. पूर्वी म्हणे या रस्त्याच्या दुतर्फा पिंपळाची व निंबाची झाडे होती. मधून अखंड जलप्रवाह वाहत असे. त्यामुळे सारे कसे शांत, शीतल भासे. आज तिथे ती झाडेही नाहीत आणि पाण्याचा झराही नाही. दिसते ते एक कारंजे आणि एक घड्याळघर. चांदणीचौक म्हणजे दिल्लीची व्यापारी पेठ. रत्ने, सोने, रूपे व हस्तिदंत यांवरील कलाकुसरींच्या कामांकरिता फार दिवसांपासून दिल्ली प्रसिद्ध होती. आता आहे का ? म्हणून तुम्ही न विचारणेच बरे. कापूस, लोकर, रेशीम या वस्तूंच्या अडतीचा मोठा व्यापार दिल्ली करते. पाषाण, लोखंड आणि इतर धातूंची भांडी बनविणारे हे केंद्र आहे. देशातील खूप मोठा धान्यव्यापार या शहरात चालतो. ही भूगोली माहिती एवढ्याचकरिता सांगितली की, औरंगेबाच्या काळीही हे ३० लाख वस्तीचे शहर होते आणि राजधानीबरोबर व्यापारीपेठ म्हणूनही ते प्रसिद्ध होते. तो आपला वारसा आजही दिल्लीने सांभाळला आहे, हे वाचकांच्या लक्षात यावे.

या शहरात जुम्मा मशिदीसारख्या भव्य वास्तू, लाल किल्ल्यासारखी राजवैभवाची साक्ष देणारी वास्तूंची वसाहत उभारणारा शहाजहान, ‘ताजमहाल’ बांधण्याइतका रसिक, विलासी, धनबलसंपन्न आणि कलेचा भोक्ता होता. कोटी कोटी रुपये खर्चून हे सारे नगर आणि त्यातील अनेक वास्तू त्याने आपल्या अमदानीत उभ्या केल्या. लाल किल्ल्यातील दिवाण-ई-आम आणि विशेषतः दिवाण-ई-खास, म्हणजे कलेची, वास्तुशिल्पाची, धनगर्वाची, रसिक वृत्तीची साक्ष देणाऱ्या आहेत. जिथे मयूरासन असे तो दिवाण-ई-खासमधील चौथरा पाहूनच मन भूतकाळात फिरू लागते. त्यात नादिरशहा दिसतो. सदाशिवराव भाऊ येतो. महादजी शिंदा उभा राहतो. होळकरही येतात.

“अगर फिरदौस बर्‌ए-जमीं अस्त
हमीं अस्त व हमीं अस्त व हमीं अस्त”

[ जर पृथ्वीवर कुठे नंदनवन असेल, तर ते हे आहे, हे आहे, हेच आहे. ]

असे गर्वगर्भित लेखन ज्या महालाच्या कमानीवर खोदले गेले तो महाल उभारणाऱ्या शहाजहानच्या कलासक्त मनाला त्रिवार धन्यवाद द्यावेसे वाटतात.

याच खास महालाने शहाआलम बादशहाचे, गुलाम कादिर नामक नराधमाने काढलेले डोळे पाहिले आहेत. याशिवाय लालकिल्ल्यातील मोती मशीद, हयातबक्ष बाग, रंगमहाल, म्युझियम वगैरे साऱ्याच गोष्टी मन 'वेधणाऱ्या' आहेत. जुन्या दिल्लीत दर्गे आणि मशिदी खूपच आहेत. रोशनआरा बाग आहे. तेजबहादुर नामक शीख धर्मगुरुच्या, तैमूरलंगाने केलेल्या अमानुष हत्येची साक्ष देणारा 'शीशगंज' गुरुद्वारा आहे. प्रत्येक जुनी वास्तू एखाद्या करुण हत्येची वा दयनीय राजकीय व्यक्तीची आठवण करून देते.

जुनी दिल्ली म्हणजे अरुंद गल्ल्या, गलिच्छ बकाली वस्ती, रखडत चालणाऱ्या ट्रॅम्स्, डबड्यासारख्या दिसणाऱ्या ट्रॉलीबसेस, पुरीपरोठा विकणारी घाणेरडी दुकाने, दुकानातील अळूपुरी पानात घेऊन रस्त्यावर खात उभी राहणारी माणसे, उघडी गटारे, या साऱ्यांमध्ये गवताच्या तणासारखे उगवल्याप्रमाणे दिसणारे पडके वा धडके ऐतिहासिक अवशेष या साऱ्या गोष्टींची खिचडी आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात नवी दिल्ली म्हणजे कडक इस्त्रीचे कपडे घातलेल्या माणसासारखी भासायची. लांब, रुंद, आखीव आणि काटकोनाचौकोनात धावणारे, स्वच्छ डांबरी रस्ते. प्रशस्त गवती उद्यानांची वेष्टित अशी दूर दूर अंतरावर असणारी घरे. कारंजी बागा, श्रीमंत बाजार, भव्य सरकारी इमारती. साऱ्या गोष्टी जिथल्या तिथे होत्या. पण शहर अगदी शांत, सुस्त पडलेले वाटायचे. वातावरणाला सरकारी गंध यायचा. सारे आसमंत मंत्री, सल्लागार, सेंट्रल असेम्ब्लीचे मेंबर्स, बडे सरकारी अधिकारी, कारकून, शिपाई, प्यादे, गाड्या, घोडी, मोटारी यांनी भरलेले वाटे. पण त्यात कुठे मानवी सुखदुःखांशी समरस झालेले जीवन दिसत नसे. जुन्या दिल्लीचा खानदानी अस्ताव्यस्तपणा, घाण गर्दी; रडणारी, ओरडणारी वेडीविद्री माणसे इथे क्वचितच दिसायची. शहराच्या तोंडावर जणू कडक इस्त्री मारल्यासारखी वाटायची.

गेली सतरा वर्षे यादिल्लीत स्वर्गस्थ पं. जवाहरलालजी नेहरूंचे अधिराज्य चालले. त्या अवधीत इथे 'विज्ञानभवन' उभे राहिले. 'नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी' निर्माण झाली. 'अशोक' होटेल बांधले गेले आणि अशा कित्येक वास्तू उभ्या झाल्या. तीन पंचवार्षिक विकास योजना आखून पुऱ्या करण्यात आल्या. दिल्ली जगातील पंचशीली राष्ट्रांचे केंद्र बनली. जागतिक

राजकारणात दिल्लीचा सूर पडताळून पाहण्याची इतर राष्ट्रांना जरुरी भासू लागली. आशियाई राष्ट्रांचे नेतेपणही दिल्लीला बहाल झाले. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा येथे भरल्या आणि दिल्लीने जगात मानाचे पान आणि महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेतले.

दिल्लीतील लोकशाहीप्रयोगामुळे ती खरीखुरी लोकाभिमुख बनली. त्यामुळे पार्लमेंट हाऊस, सचिवालय, राष्ट्रपतीभवन, जंतरमंतर, आकाशवाणी, बिर्ला शेठजींचे लक्ष्मी-नारायण मंदिर, कॅनॉट प्लेस, इंडिया गेट, त्रिमूर्ती, अशोक होटेल अगर पालम विमानतळ अशा कुठल्याही ठिकाणी आता पूर्वीचा परकेपणा जाणवत नाही. दिल्लीत पंजाबी, शिख–मुसलमान व उत्तर प्रदेशीलोकांची वस्ती प्रामुख्याने असली तरी भारतातील प्रत्येक राज्यातील माणसे दिल्लीत भेटतात. आपापली भाषा बोलतात. आपापली संस्कृती जोपासतात. दिल्लीत सर्रास चालते ती इंग्रजी व उर्दूमिश्रित हिंदी भाषा. फाळणीनंतर सिंधी–पंजाबी निराश्रितांचा लोंढा दिल्लीवर थडकल्याने दिल्लीच्या व्यक्तिमत्त्वात आणखी काही रंग मिसळले गेले.

पूर्व काळी सवाई जयसिंगाने योजनाबद्ध रीतीने बांधून काढलेले जयपूर सोडले तर राजधानी म्हणून बांधून काढलेले अलीकडच्या काळातील नवी दिल्ली हे पहिलेच नगर. अगदी अलीकडे बांधलेले चंदीगढ हे अशा नगराचे दुसरे उदाहरण. नाहीतर भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक वा राजकीय कारणांमुळे मोठी किंवा महत्त्वाची झालेली नगरेच भारतात अनेक आहेत.

१९११ सालच्या दिल्लीदरबाराबरोबर ब्रिटिशांनी कलकत्त्याहून आपली राजधानी उचलली आणि भारताच्या ऐतिहासिक राजधानीत आणून वसविली. तसे करताना मोगल व इतर भारतीय सम्राटांनी आपली वैभवशील स्मारके जशी जुन्या दिल्लीत ठेवली आहेत, तसेच काहीसे करावे या इच्छेने त्यांनी नवी दिल्ली उभारायचे ठरविले. दिल्ली दरबारच्या वेळी केलेल्या भाषणात पंचम जॉर्ज बादशहांनी ही आपली इच्छा बोलून दाखविली. कामाला लगेच सुरुवात झाली. सर एडविन ल्युटीन्स यांच्यासारखे स्थापत्यकलाकोविद, सर ह्यू कीलिंग व सर अलेक्झांडर राऊज् यासारखे स्थापत्यतंत्रविशारद इथे आणून, नव्या शहराचे निळे नकाशे तयार झाले; आणि कागदावर आखले तसे शहर प्रत्यक्षात उभेही झाले. १५ फेब्रुवारी १९३१ रोजी या नव्या

१५०३६



शहराचे उद्घाटन झाले. त्या काळी १५ कोटी रुपये खर्च झाला त्यावर.

आता त्याचा कोरेपणा संपला आहे. वस्ती वाढली आहे. १९६१ सालच्या शिरगणतीप्रमाणे नव्या व जुन्या दिल्लीची लोकवस्ती २३ लक्ष ५९ हजार झाली आहे. त्यानुरोधाने दिल्ली सारखी वाढते आहे. पण दिल्लीचे वैशिष्ट्य हे की, राष्ट्रपतिभवन हा शहराचा केंद्रबिंदू धरला तर त्यापासून तुम्ही जसे दूर जाल तसतशी लोकवस्ती दाट व गिचमिड झालेली तुमच्या प्रत्ययाला येईल. इतर शहरात याच्या उलट परिस्थिती असते. शहराच्या त्या वस्त्या वसाहतीतून फिरू लागले म्हणजे जाणवते ती उत्पन्न आणि प्रतिष्ठावारीने केलेली घरांची व वसाहतींची वर्गवारी. कुणी शाननगरात राहत असला की, त्याचा पगार महिना दोन हजारांपेक्षा अधिक असलाच पाहिजे हे लगेच लक्षात येते. साऊथ ॲव्हेन्यूकडे निघालेला माणूस कुणा खासदाराकडे निघाला असावा असा कुणीही तर्क बांधतो. शहराची ही व्यवस्था जातिव्यवस्थेइतकी खटकते!

दिल्लीच्या वाढलेल्या वस्तीमुळे तिथली भाडी वाढली आहेत. नगरपालिकेच्या कटकटीही वाढल्या आहेत. विजेचा प्रवाह बंद पडण्याचे प्रसंग पण वाढले आहेत. नळांना पाणी नाही असे मात्र कधी होत नाही. प्रतिवर्षी 'नेमेचि' यमुनामैय्या शहराच्या काही भागात दंगल उडविते. मे-जूनमध्ये धुळीची चक्री वादळे ( आंधी ) उठतात. ऊष्मा मी म्हणतो. नको ती दिल्ली असे होते. पण दिल्ली सगळ्यांना हवी असते.

भारताची इथून तिथून धाव आहे दिल्लीकडे—दिल्लीकडे—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0015036

REFBK-0015036